# शुक्राची चान्दणी

# व

# इतर गोष्टी

( पृष्ठ संख्या १४४ )

लेखकः-विनायक दत्तात्रय साळगांवकर,
बी. ए.
( कालगति कादम्बरीचे कर्ते. )

---

प्रथमावृत्ति
( १९३८ )

प्रकाशकः—वि. द. साळगांवकर, बी. ए.
मालवण.

( सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन. )

मुद्रकः—कृ. ह. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

# निवेदन

मराठी वाङ्मयक्षेत्रांत आज कांहीं प्रथितयश साहित्यिक लघु–कथांचा मुबलक पुरवठा करीत असतां केवळ एका कलाकृतीच्या अनपेक्षित यशामुळें हा कथा–संग्रह रसिक वाचकांना सादर करण्याचा मोह लेखकाला होत आहे. परंतु याबद्दल सहृदय वाचक लेखकाला क्षमा करून हा अल्प–मूल्य संग्रह संग्रहीं ठेवतील तर लेखक त्यांचा अतिशय आभारी होईल.

ह्या कथा–संग्रहांतील ‘ गौरी कीं गोहर ’ ही गोष्ट विविधवृत्तांत, ‘ दग्धांकुर ’ व ‘ शुक्राची चान्दणी ’ या गोष्टी यशवंत मासिकांत, आणि ‘ गोड पोरगी ’ व ‘ भूताच्या भूतचेष्टा ’ ह्या दोन कथा ‘ उषा ’ मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. इतर सात गोष्टी अप्रकाशित आहे.

या संग्रहाच्या छपाईचें काम सुबक रीतीनें केल्याबद्दल मी श्रीज्ञानेश्वर प्रेसचे मालक श्री. सहस्रबुद्धे यांचा आभारी आहें. त्याचप्रमाणें पुस्तकावरील सुंदर चित्र श्री. एस्. बी. पेडणेकर यांनीं दिल्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहें. याशिवाय हा संग्रह प्रसिद्ध करण्यासाठीं ज्या माझ्या स्नेह्यांनीं मला अनेक प्रकारें साह्य केलें त्या सर्वांचा मी अतिशय आभारी आहें.

या संग्रहांतील कांहीं कथांमध्यें प्रचलित सामाजिक परिस्थितीचें व त्यामुळें व्यक्तीवर होणाऱ्या परिणामाचें यथार्थ चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळें प्रत्येक गोष्टींत कोणतें तरी तत्त्वप्रतिपादन अगर प्रचार–कार्य पहाण्याचा कोणीं प्रयत्न केला व त्यांत अपेक्षित अपयश आलें तर लेखकाला शक्य तों दोषी ठरवूं नये एवढीच नम्र विनंती करून ही कुळ–कथा पुरे करतों.


३८, हनुमान टेरेसिस्,<br>
तारा टेम्पल लेन,<br>
मुंबई ७.<br>
ता. ३।१०।१९३८

आपला,<br>
**वि. द. साळगांवकर.**

तीर्थरूप

वडिलांच्या

पवित्र चरणीं

अर्पण.

# सत्याचे प्रयोग.

बोरीबंदरहून पंजाब–मेल सुटण्यास जेमतेम दहा मिनिटांचा अवकाश होता. यामुळें जाणारे बहुतेक पॅसेंजर जागा अडवून बसले होते. प्लॅटफॉर्मवरही निरोप देण्यास आलेल्या आप्तेष्टांमुळें बरीच गर्दी दिसत होती.

इतक्यांत दोन तरुण लगबगीनें प्लॅटफॉर्मवर आले. त्यांच्यामागून हेलकरी बिछाना व बॅग घेऊन झपझप चालला होता.

" अरुण, तूं मागें जागा आहे का बघ. मी पुढं पाहून येतों. " असें म्हणून दिनकर आपल्या बुटांचा टप्टप् आवाज करीत पुढें गेला.

अरुण प्रत्येक डब्यांत खिडकींतून न्याहाळून पहात होता. परंतु सर्व डब्यांत अगदीं रेंटारेंट करून उतारू बसलेले त्याला दिसत होते. त्यांतच धूम्रपानामुळें कोंदट झालेली हवा व पॅसेंजरच्या आरडाओरडीमुळें होणारी गडबड पाहून तो पुढल्या डब्याकडे आशेनें पहात होता. परंतु सर्वत्र एकच प्रकार दिसत असल्यामुळें तो क्षणभर विचार करीत शेवटच्या डब्याकडे उभा राहिला.

" साहेब, कुठं बी चढा, सगळ्या डब्यामंदी असीच गर्दी असायची. कशी तरी जागा करायला पाहिजे. " हेलकरी शेवटीं नाईलाजानें म्हणाला.

" थांब जरा. ते येऊं देत पुढून. " अरुण हताशपणें म्हणाला.

एवढ्यांत समोरून दिनकर येत होता.

" काय रे, आहे का जागा ? " अरुणनें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" छे रे, Worse than this. Better go in for second class. At least you will get some decent company." (याहून तिकडे गर्दी आहे. मला वाटतं तूं सेकंड–क्लासनें जा. निदान चांगली सोबत तरी मिळेल. ) "

एवढें बोलतांना दिनकरच्या चेहऱ्यावर किंचित् हास्य झळकलें. परंतु अरुणचें तिकडे लक्ष नव्हतें. तो पाकीट उघडून भरपूर पैसे आहेत

कीं नाहीं याचा विचार करीत होता. "मग काय ?" दिनकर पुन्हां म्हणाला, "अरुण, गमतीखातर प्रवास करायचा असेल तो सुखानें करावा. मी आज जात असतों तर थर्ड क्लासमध्यें जागा असूनही सेकंड-क्लासनें गेलों असतों. खरंच, You are always lucky in your travels. ( प्रवासांत तुझी नेहमीं मौज असते. ) बरं, मग विचार कसला करतोस ? गाडीला पांचच मिनिटं राहिलीं."

"अच्छा, मी डिफरन्स् देऊन येतों हं. तूं जरा सामान ठेवून घे." असें म्हणून अरुण गेटवरील तिकीट-कलेक्टरकडे वळला व त्यानें तिकिट बदलून घेतलें.

दिनकरनें ज्या डब्यांत सामान ठेवण्यास सांगितलें त्या डब्यांत दोन तरुण युवती बसल्या होत्या. म्हणूनच त्यानें जरी मुद्दाम तो डबा पसंत केला असला तरी त्या तरुणींच्या अस्तित्वाचें महत्वच नाहीं अशाप्रमाणें निर्विकार चेहरा करून तो हेलकऱ्याकडून बिछाना सोडून घेत होता. एकदोन वेळां दिनकरनें सहजच म्हणून त्यांच्याकडे नजर फिरविली, तेव्हां त्या चौकस दृष्टीनें व मिष्कीलपणें हंसत आपल्याकडे पहातांना त्याला दिसल्या.

इतक्यांत अरुणही तेथें आला. कंपार्टमेंटमध्यें त्या दोघीच तरुणी पाहून तो किंचित् चपापला व दिनकरनें हा मुद्दाम फाजीलपणा केला असावा असा त्याला संशय आल्याशिवाय राहिला नाहीं. दिनकर आपल्या-शीच मंद स्मित करीत होता.

"This is your bed and here is your bag (हा तुझा बिछाना आणि ही इकडे बॅग. )" दिनकर चेहऱ्यावरील विकार दडवीत म्हणाला.

दोघेही खालीं उतरले. गाडीला एखादेंच मिनीट होतें.

"दिनू, तूं मुद्दामच हें कंपार्टमेंट choose केलंस ना ?" अरुण त्याच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाला, "गाडीला जर वेळ असता तर खात्रीनें मी दुसरा डबा पाहिला असता."

"अरे, एवढा घाबरतो कशाला ? नाहींतर दे तिकीट इकडे; तुझ्या जागीं मी जातों. मात्र अरुण, दोन्ही पात्रें जरा जास्त धीट आहेत हं. मी यांना चांगल्याच ओळखतो. इन्टर कॉलेज क्रिकेट टूर्नमेंटला नेहमीं हजर असायच्या. मला ओळखतात असं दिसतं. तुला एखाद्या वेळीं fool (गरुड)

करायचा यत्न करतील हं. पण ह्या एकट्याच कुठं चालल्या ? तयारीवरून कुठं तरी लांब चालल्या आहेत असं दिसतं. "

बोलतां बोलतां दिनकरनें सहजच त्याच्याकडे पाहिलें तों त्या आपली चेष्टा करीत कांहींतरी बोलत असाव्या असेंच त्याला वाटलें.

"अरुण, संधी आली कीं अशीं जिरव कीं कायमची तुला आणि त्यांना या प्रवासाची आठवण राहिली पाहिजे. मोठ्या वात्य पोरी आहेत. "

इतक्यांत गाडी सुटण्याची घंटा झाली. अरुणनें डाव्या हातानें दिनकरच्या खांद्याजवळ गच्च धरून प्रेमानें हस्तान्दोलन केलें.

" अच्छा दिना, Good Luck in your sport. ( क्रीकेटच्या सामन्यांत चांगलं यश मिळव. ) "

" Thanks. And Good Luck in your journey. (आणि तुझाही प्रवास मजेंत होऊं द्या. ) "

दिनकर मुद्दामच मोठ्यानें ओरडला.

दोघांनींही प्रेमभरानें एकमेकांचे हात घट्ट दाबले होते. अरुण गाडींत चढला. डोक्यावरील फेल्ट हॅट काढून बिछान्यावर टेऊन तो गाडीच्या दारापाशीं उभा राहिला. त्या दोन्हीतरुणी खिडकींतून मान बाहेर काढून पहात होत्या.

" अरुण, पत्र पाठव हो. " दिनकर गाडीच्या कडीला हात धरून फुटबोर्डवर बुटाची खोंट चाळवीत म्हणाला.

" अच्छा; जरूर. "

दिनकरनें हॅट काढून हातांत घेतली व तोंडावरून हातरुमाल फिरवीत तो कांहींतरी बोलावें म्हणून पुन्हां म्हणाला,

" तुला बरीच थंडी मिळणार. इथंच किती गारटा आहे. "

एवढ्यांत गाडीनें शीळ फुंकली व ती हळुहळू प्लॅटफॉर्मच्या पुढें सरकूं लागली. " अच्छा, Good bye. Good luck. " दिनकर हंसत कांहींसा मोठ्यानें म्हणाला.

अरुणनें आंत मान घेतली. त्या दोन तरुणींच्या अस्तित्वाची जाणीव नसल्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करतांना मनांत उत्पन्न होणाऱ्या भावनांचें आविष्करण स्पष्टपणें त्याच्या चेहऱ्यावर होत होतें. कारण अरुण

स्वभावतः लाजाळू आणि भावनाप्रधान होता. त्याला आपण अगदीं अवघड परिस्थितींत असल्याप्रमाणें वाटत होतें.

कोट काढून त्यानें बिछान्याच्या बाजूला ठेवला व अंगांत स्वेटर चढवून आपल्या बर्थवर बसून तो Evening News चा ताजा अंक वाचूं लागला.

प्रवासांत आजूबाजूंच्या उतारूंची ओळख करून वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकवस्तीची, पिकाची व उद्योगधंद्याची माहिती घेण्यांत व समाजांतील इष्टानिष्ट आचारविचारांवर चर्चा करण्यांत त्याचा नेहमीं वेळ घालविण्याचा प्रघात होता. परंतु आज मात्र त्याला सिनेमाच्या थिएटरांत अपरिचित स्त्रियांच्या मध्यें असलेल्या खुर्चीवर बसल्याप्रमाणें जखडल्यासारखें वाटत होतें. एकदोन वेळां सहाजिकपणाचा आव आणून सभोंवार त्यानें नजर फिरविली व आपल्या वागणुकींत कृत्रिमपणा असावा अशा संशयानें पुन्हां त्यानें आपली नजर वर्तमान-पत्रांतील मजकुरावर स्थिर केली.

त्या दोघी तरुणी मात्र निःशंकपणें हंसत खिदळत होत्या. यामुळें त्या आपलीच चेष्टा करीत असाव्या असा अरुणाला संशय आला होता.

" अग, थंडी बरीच लागणार ! इथंच किती गारठा आहे ! शान्ता, माझा स्वेटर कुठें आहे ग ? "

" मला काय माहीत बाई, " शांता हातांतील मासिकाचा अंक बाजूला करीत म्हणाली,

"दुसऱ्याची वस्तू पाहिली कीं तुला आपल्या वस्तूची आठवण होते."

अरुणनें चटकन् वर्तमानपत्र खालीं करून त्यांच्याकडे पाहिलें. शान्ताच्या अंगांत स्वेटर होता. यामुळें त्यांच्या भाषणाचा रोंख त्याला नक्की समजेना. तो पुन्हां वर्तमानपत्र वाचूं लागला. त्या दोघीही एकमेकांकडे पाहून मिष्कीलपणें हंसत होत्या.

" काय ग, काय वाचतेस तें ?" सुनीतीनें हंसें आवरून प्रश्न केला.

" यशोधन"चा अंक तो. अग, एका लेखकाच्या अकलेचे तारे तुटले आहेत. गोष्टीचं नांव आहे 'असूया.' एका मुलीचा एका कॉलेज-कुमाराशीं विवाह ठरलेला असतो. ती त्याच्या घरीं जाते. त्यावेळीं तो तरुण आपल्या कॉलेजांतील मैत्रिणीशीं आपल्या विवाहाविषयीं संभाषण करीत असतो. ही तरुणी तो संवाद अस्पष्टपणें बाहेरून ऐकते आणि

संशयानें आणि मत्सरानें त्याच्याशीं संबंध तोडते. झालें संपली गोष्ट. अग, ह्या लेखकांना सारखे झोडले पाहिजेत. जर आम्ही स्त्रिया संशयी आणि मत्सरी असतों तर मला वाटतें, एकाही पुरुषाचा द्वितीय विवाह झाला नसता. खरंच सुनिती, आपण दोघीनींही एकाच तरुणाशीं एकाच वेळीं विवाह करूं या आणि असल्या लेखकाची सारखी फजेति करूं या."

दोघीही खदखदां हसूं लागल्या.

अरुणच्या मनाची खात्री झाली कीं त्यांचा कटाक्ष आपल्यावरच आहे. गाडी कल्याणला आली तेव्हां राहिलेल्या एका बर्थवर आणखी एखादा उतारू येईल अशी त्याला आशा वाटली होती. परंतु ती अपेक्षा-सुद्धां फोल टरली.

त्या दोघींचा संवाद मात्र तसाच चालला होता. अरुणनें त्यांच्या-कडे धिटाईनें पाहिलें तों त्यादेखील आपल्याकडेच पहातांना त्याला दिसल्या. त्या दोघीही विशीच्या दरम्यान होत्या. दोघीही जवळ जवळ सारख्याच सौंदर्यसंपन्न होत्या. एकीची हंसतांना दिसणारी सुंदर दंतपंक्ती, तर दुसरीच्या गालावर हंसतांना पडणारी मोहक खळी व किंचित् पुढें येणारा लाल अधर यामुळें त्यांचें सौंदर्य सारखेंच आकर्षक वाटत होतें.

अरुणचें लक्ष आपल्याकडे वेधण्याचा त्यांचा सारखा प्रयत्न चालला होता. कारण अरुणदेखील तितकाच सौंदर्यशील होता. त्याची ती उंच सडपातळ पण पीळदार शरीरयष्टी, कांहींसा जास्तच रुंद भाल-प्रदेश, नाकाचा वळणदार शेंडा आणि विस्तृत पाणीदार डोळे व चेहऱ्यावर दिसणारी तेजस्विता यांमुळें मधून मधून त्या आपल्या भाषणानीं त्याचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत होत्या. अरुण मात्र आपलें लक्ष हातांतील वर्तमानपत्रांत आहे असें दाखविण्याचा प्रयत्न करीत होता. ह्यावेळीं जर सुमन असता तर त्यानें त्यांची ओळख केली असती. निदान त्यांच्या वागणुकीला तसेंच प्रत्युत्तर केलें असतें, असेंच त्याला वाटलें. त्यांचा संवाद चालू झाला.

"अग, स्त्रिया मत्सरी असतात हें पुरुषांना कसं कळलं? आणि पुरुष का कमी मत्सरी असतात?"

अरुणनें दचकून त्यांच्याकडे पाहिलें. बोलण्याच्या भरांत आपण त्या उतारूचा अपमान केला अशी जाणीव झाल्याप्रमाणें शांतानें सलज्जितपणें अरुणकडे पाहिलें. पण सुनिती मात्र तो नाईलाजानें तरी शेवटीं संभाषणांत भाग घेईल, म्हणून मुद्दाम चेहरा निर्विकार करीत म्हणाली,

" अग, पण खरं म्हणशील तर स्त्रियाना मत्सर करण्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण कुठलाही पुरुष पाहिला तरी ते सर्व एकाच नमुन्याचे आढळायचे. शांता, स्त्रिया मत्सरी असतात, याचा अर्थ काय तर त्या नवऱ्याच्या बाहेरख्याली वृत्तीकडे दुर्लक्ष करीत नाहींत. " सुनिती खदखदां हंसू लागली.

शांताला तिचें तें भाषण जरा चमत्कारिकचे वाटलें व ती हसें आवरीत म्हणाली, " पण सुनिती, पुरुषांना स्त्रिया मत्सरी वाटल्या तर त्यांत त्यांचा दोष नाहीं. "

अरुणनें अद्यापपर्यंत मौनच धारण केलें होतें. परंतु आतां मात्र त्यानें त्यांच्याशीं परिचय करून घेण्याचा निश्चय केला. समोरच्या खिडकींतून थंड गार झोंबणारा वारा आंत येत होता. अरुण त्या खिडकीपाशीं जाऊन म्हणाला,

" बंद केली तर हरकत नाहीं ना ? I hope you don't mind it."

" Certainly not." सुनितीनें उत्तर केलं व ती धीटपणें पुन्हां म्हणाली, " तुम्ही कुठं चाललां ? "

" मी ? लाहोरला. तुम्ही कुठं जातां आहांत ? "

" आग्र्याला. ताजमहाल पहायला. " शांतानें उत्तर केलं.

" एकट्याच निघालां का ? " अरुणनें पुन्हां प्रश्न केला.

" नाहीं. आमच्याबरोबर नोकर आहे, तो सर्व्हंटस् कंपार्टमेंटमध्यें बसला आहे. आणि आमची मैत्रीण आग्र्याला आहे. "

" खरंच ताजमहाल अगदीं पहाण्यासारखा आहे. तो पहातांना भावनांमुळें हृदय उचंबळून येतें. मुंबईंत तुम्ही कॉलेजांत असतां वाटतं ? "

" हो. " शांता पुढें म्हणाली " तुम्ही पण कॉलेजांत अहां वाटतं ? "

" हो, लॉ कॉलेज. " बोलतां बोलतां अरुणनें जवळचा 'यशोधन'चा अंक उचलला.

हंसत हंसत त्यानें 'असूया' गोष्टीचें पान उघडलें व पुस्तकावर तशीच नजर ठेवून त्यानें म्हटलें "तुमच्या क्रोधास हाच लेखक पात्र झाला का?"

"तुम्ही वाचली आहे का ती गोष्ट?" शांतानें प्रेमळपणें हास्य केलें.

"नाहीं. पण तुम्ही आतांच सारांश सांगितला तो ऐकला. खरंच अजून कांहीं लेखक स्त्रियांच्या वैगुण्यांचें प्रदर्शन करण्याकडेच आपली प्रवृत्ति दाखवितात."

"त्यापेक्षां स्त्रियांवर निष्कारण दोषारोप करतात." सुनिती चटकन् मध्येंच म्हणाली.

"I am sorry! तुमचं म्हणणं खरं आहे. पण किती झालं तरी लेखक आपला अनुभवच लिहीत असतो; मग तो अनुभव सार्वत्रिक (Common) असो अगर एका विशिष्ट प्रसंगाचा असो."

सुनितीला हें म्हणणें मान्य नव्हतें. यामुळें ती लगेच प्रत्युत्तरादाखल म्हणाली,

"तसं जरी कधीं कधीं असलं तरी पण पुष्कळ वेळां लेखकाच्या पक्षपाती मनोवृत्तीचाच तो परिणाम असतो. स्त्रीस्वभावांतील वैगुण्य दर्शविल्यास साधारण पुरुषवर्गाला तें हवंच असतं आणि एवढ्याचसाठीं पुष्कळ लेखक स्त्रियांची नालस्ती करीत असतात."

अरुणनें स्तब्धपणें हास्य केलें.

"बरं, मी जरा हा अंक वाचायला घेऊं का?"

"घ्या ना!" शांतानें हंसत म्हटलें. "त्यांत एवढं विचारायला काय पाहिजे?"

अरुण आपल्या बिछान्यावर बसून अंक चाळूं लागला.

रात्र झाल्यावर कांहीं वेळानें दोघींनींही फराळ करण्याचा बेत केला. हलकेच आपसांत एकमत करून एका बशींत कांहीं पुऱ्या व भाजी काढून घेऊन सुनिती अरुणला म्हणाली, "हें घ्या."

"Thank you. मला खरोखरच कांहीं नको होतं. मी निघतांनाच माझ्या मित्राबरोबर यथेच्छ फराळ करून निघालों होतों." असें म्हणून अरुणनें त्याचा स्वीकार केला.

" तुम्ही लाहोरला कशाला चाललां ?" शांतानें प्रश्न केला.

" सहज एका मित्राकडे. तेथून नागपूरला साहित्यसंमेलनाला जाण्याचा माझा बेत आहे. "

" तुम्ही लेखक अहांत असं वाटतं. "

" विशेष नाहीं. कुठं तरी थोडं थोडं लिहितों. " अरुण विनयपूर्वक हास्य करीत म्हणाला.

याप्रमाणें आपापल्या बिछान्यावर बसून तिघांचा संवाद चालला होता. फराळ संपल्यावर अरुणनें बॅगमधून तीन मोसंबीं काढलीं.

रात्रीं शांता लवकरच झोंपी गेली. अरुण बराच वेळ वाचीत पडला होता. सुनितीही झोंप येईना तेव्हां बिछान्यावर उठून बसली.

" झोंप येत नाहीं वाटतं ? तुमच्या मैत्रिणीची तर मध्यरात्र झालेली दिसते. "

" तिचं नेहमींचेंच तें." सुनिती पुढें म्हणाली, " मला मात्र गाडींत सारखी झोंप येतच नाहीं. "

" कुठल्या कॉलेजांत असतात त्या ? नांव काय बरं त्यांचं ? " अरुण शांताच्या निद्रित मुर्तीकडे पहात म्हणाला.

अरुणच्या ह्या चौकशीमुळें सुनिती कांहींशी चपापली व क्षणभरच पण तिनें त्याच्याकडे भेदक दृष्टीनें पाहिलें आणि ती अडखळत म्हणाली, " तिचं नांव? नांव शांता कुलकर्णी. एल्फीन्स्टन् कॉलेजांत जुनिअरला आहे ही. "

सुनितीला अरुण आपली चौकशी करील अशी अपेक्षा वाटली होती. पण तो पुन्हां शांताच्या मुद्रेकडे पहात म्हणाला,

" Oh, I see. त्या का त्या ? एल्फीन्स्टन मधलां माझा एक लेक्चरर् मित्र आहे तो यांची स्वभावाबद्दल व हुशारीबद्दल फारच तारीफ करीत होता. "

" आपलं नांव काय ? " सुनितीनें मुद्दाम मध्येंच प्रश्न केला.

अरुण त्या प्रश्नानें क्षणभर गोंधळला.

" माझं नांव—अरुण पंडित. " तो हंसत म्हणाला, " पण——"

सुनितीला आपलें नांव विचारण्याचा अरुण शिष्टाचार दाखवील असें वाटलें होतें; पण तो शांताच्या चेहऱ्याकडे स्निग्धपणें पहात पुन्हां म्हणाला,

" खरंच, गाडींत एवढं गाढ झोंपण्याच भाग्य थोड्याच माणसांना लाभतं. "

सुनितीनें रागानें बिछान्यावर अंग टाकलें व तोंड फिरवून तिनें झोपण्याकरतां गच्च डोळे मिटून घेतले. अरुण आपल्याशींच राज्य करीत बिछान्यावर कलंडला. हातांतील पुस्तक बाजूला ठेवून त्यानें अंगावर रग ओढला व लवकरच तो झोंपी गेला.

पहांटेला अरुण जागा झाला. त्यानें सभोंवार पाहिलें. सुनिती अजून गाढ झोंपली होती. दूरवर पसरलेल्या अफाट प्रदेशांतून गाडी जात होती. पूर्व दिशेला क्षितिजावर तांबडें फुटलें होतें. समोरच्या खिडकींतून आंत येणाऱ्या प्रकाशामुळें सुनीतीचा चेहरा आरक्त झाल्याप्रमाणें भास होत होता. डब्यांतील एका कोनांत टेंकून पायावर लोकरीची शाल पांघरून शांता टाईम्सचा अंक वाचीत होती. अरुण जागा झाला हें पाहून तिनें त्याच्याकडे पहात मधुर हास्य केलें. दोन्हीं हातांनीं केंस सारखे करून डोळे चोळींत तो म्हणाला,

" काय, बऱ्याच लवकरच उठलां वाटतं? चहाचा पहिला कार्यक्रम झालेला दिसतो. ह्या तर अगदीं गाढ झोंपल्या आहेत. आम्ही रात्रीं बराच वेळ इकडल्या तिकडल्या गप्पा करीत बसलों होतों. खरंच, तुमची मैत्रीण फार Social (मनमिळाऊ) आणि Jolly (आनंदी) आहेत. तुमची मात्र त्यावेळीं अगदीं मध्यरात्र झाली होती. "

शांता विचित्र भेदक दृष्टीनें अरुणकडे पहात होती. परंतु तिच्या नजरेंतील मतितार्थ न समजल्याप्रमाणेंच पहात तो पुन्हां म्हणाला,

" नांव काय हो त्यांचं ? कुठल्या कॉलेजांत असतात त्या ? कुठचा क्लास ? "

" सुनिती नाईक. एल्फीन्स्टन्‌ला ज्युनिअरला आहे ही. "

" अस्सं का ? ह्या कॉलेजांत फार पॉप्युलर आहेत वाटतं ? माझा एक त्या कॉलेजांतील लेक्चरर्‌ मित्र आहे तो सांगत होता ह्या Studious (अभ्यासू) असूनदेखील अगदीं Sport (उदार–वृत्तीच्या) आहेत म्हणून."

अरुणचें भाषण ऐकतांना शांताच्या चेहऱ्यावर त्रस्तपणा दिसत होता. ती त्याच्या चेहऱ्याकडे तीक्ष्णपणें पहात होती. पण त्या गोष्टीची जाणीव नसल्याप्रमाणें रगाची घडी करीत अरुण पुन्हां म्हणाला,

"खरंच, प्रवास एवढ्या मौजेंत क्वचित्‌च होत असेल."

अरुण तोंड धुण्याकरतां नळावर गेला. सुनितीच्या निद्रित चेहऱ्याकडे शांता सारखी तीक्ष्णपणें पहात होती.

थोड्याच वेळांत अरुण तोंड धुवून टॉवेलनें चेहरा पुशीत बाहेर आला. सुनिती अजूनही स्वस्थ झोंपली होती.

"चहा परत घेतां का हो?" अरुणनें शांतास उद्देशून म्हटलें.

"नको, मी घेतला." ती कांहींशा आढ्यतेनें उत्तरली.

"तरी पण आमच्याबरोबर आणखी एकदां" असें म्हणून अरुणनें दोन कप चहाची ऑर्डर दिली.

दोघेही चहा घेत असतां सुनिती जागी झाली. तिनें त्याच्याकडे तुडसटपणें पाहिलें. तिच्या चेहऱ्यावर व्यग्रता स्पष्ट दिसत होती. तिनें झटकन् उठून बॅगमधून ब्रश, साबण व टॉवेल काढला व ती कांहीं न बोलतां सरळ नळावर गेली.

चहा घेऊन झाल्यावर अरुण म्हणाला,

"तुम्हाला ह्या प्रवासाची आठवण म्हणून एक वस्तु द्यावयाची आहे."

त्यानें आपली बॅग उघडली व आंतून एक नवीनच पुस्तक काढलें. खिशांतील फाउन्टन्‌पेन काढून त्याचेवर 'शांता कुलकर्णी यांस सप्रेम भेट—अरुण पंडित.' असें लिहिलें.

"हं हें, घ्या ह्या गोड प्रवासाचें साधंसं स्मृति-चिन्ह." अरुण पुढें म्हणाला, "तुमच्या मैत्रिणीला पण मला एक प्रत द्यावयाची होती. पण बरोबर मी आणखी प्रति घेतल्या नाहींत."

"मग हिच्यावरच तिचं नांव घाला." शांता पुस्तक पुढें करीत आग्रहानें म्हणाली.

"नको नको. मागाहून मुंबईंत गेल्यावर मी देईन त्यांना दुसरी. मला त्यानीं आपला पत्ता दिला आहे." अरुण म्हणाला.

एवढ्यांत नळाच्या खोलींतून सुनिती बाहेर आली. शांतानें चटकन् पण सहजच म्हणून पुस्तक उशीच्या खालीं दडविलें. सुनितीच्या ही गोष्ट लक्षांत आली असावी असा तिच्या घाबरट मनाला संशय वाटला. अरुण मात्र आपल्याशींच स्मित करीत होता.

कांहीं वेळानें सूर्य वर आल्यामुळें खिडक्यांतून ऊन आंत येऊं लागलें, तेव्हां शांतानें निमूटपणें वेणी सोडून केंस विंचरण्यास सुरवात केली. सुनिती रागीट मुद्रा करून टाइम्सचा अंक वाचित होती. अरुण मधूनमधून त्यांच्याकडे पाहून गालांतच हास्य करीत बाहेरच्या देखाव्याकडे पहात होता. एकदम काहींतरी आठवल्याप्रमाणें करून तो म्हणाला,

"मिस् देशपाण्डे, त्या कथा–संग्रहांतील 'प्रत्यंतर' ही गोष्ट वाचून तुमचें मत काय आहे हें तरी समजूं द्या."

शांताला अरुणची अतिशय चीड आली. परंतु चेहरा शक्य तों निर्वि-कार करीत तिनें "मग वाचतें." एवढेच उद्गार काढले. सहाजिकच तिची दृष्टि सुनितीकडे गेली. तिच्या भेदक–दृष्टीकडे पहातांना शाताला अगदीं शरमल्यासारखें झालें.

काल संध्याकाळीं डब्यांत अरुण चढल्यामुळें प्रवासांत कांहींतरी जीवन आल्यासारखें त्या दोघींना स्टेशनवर वाटलें होतें. पण आतां मात्र त्याच्या येण्यामुळेंच हा प्रकार घडला असें वाटत होतें.

दहा वाजण्याचे सुमारास गाडी एका स्टेशनवर थांबली तेव्हां अरुण खालीं उतरला व प्लॅटफॉर्मवर एक फेरी मारून पुन्हां आपल्या डब्याशीं येऊन त्या दोघींस उद्देशून म्हणाला, "तिकडे थर्ड–क्लासमध्यें माझा एक कॉलेजमित्र आहे. त्याच्याबरोबर मी बसतों. मिस् देशपांडे माझ्या बॅगकडे जरा लक्ष ठेवा."

अरुण पलीकडल्या सेकंड क्लासच्या दुसऱ्या डब्यांत चढला.

त्या दोघी बराच वेळपर्यंत अवाक्षरही न काढतां बसल्या होत्या. शांता सुनितीकडे भाषणाच्या अपेक्षेनें पहात होती. परंतु तिच्या संतप्त

चेहऱ्याकडे पाहून ती स्तब्ध राहिली. शेवटीं कांहीं वेळानें ती स्तब्धता असह्य होऊन शांता म्हणाली,

" सुनिती, हें बघ त्यानें पुस्तक दिलें."

"हं." सुनिती एकवेळ पुस्तकाकडे पाहून रागानें एवढेंच उद्गारली.

" तुला राग आला वाटतं? तुला द्यावयाला त्याच्याजवळ आणखी प्रत नव्हती. तुला वाईट वाटेल म्हणून मी मुद्दामच तुला पुस्तक दाखविलें नव्हतें. "

" मला राग कां येणार ? " सुनिती रागिट स्वरांत म्हणाली, " तुला त्यांनीं भेट दिली म्हणून मी कां रागावणार ?"

शांताला गहिंवरून आलें. आणखी एकदोन प्रश्नोत्तरें झालीं असतीं तर खात्रीनें तिनें रडण्यास प्रारंभ केला असता. दोघीही दोन दिशांकडे तोंड फिरवून स्तब्ध राहिल्या.

दुपारचा फराळ कसा तरी आटपून त्या बिछान्यावर पडल्या. कुणीच कांहीं बोलत नव्हतें. बराच वेळ वाचल्यावर डोळे थकल्यामुळें त्या झोंपीं गेल्या. त्या जाग्या झाल्या तर सभोंवार नजर फिरवून पुन्हां पुन्हा झोंपत होत्या. पांचच्या सुमारास अरुण पुन्हां त्या डब्यांत चढला. दोघींनाही झोंपलेल्या पाहून त्यानें हांक घालण्यास सुरवात केली.

"शांताताई, अहो सुनितीताई, उठा उठा. पांच वाजून गेले. किती झोंपतां हो?"

अरुण त्यांच्याकडे मोकळेपणानें हास्य करीत पहात होता. कांहीं वेळानें तो पुन्हां म्हणाला,

"आज सकाळपासून पहातों आहें, तुमची कालची मनोवृत्ति बिलकूल दिसत नाहीं. शांताताई, खरंच तुमच्या कालच्या एका वाक्यावर मी अजून विचार करतों आहें. तुम्ही काल म्हणालां कीं 'आपणं दोघींनींही एकाच वेळीं एकाच तरुणाशीं विवाह करूं या.' खरंच, असं कधीं शक्य होईल कीं काय याचा मी विचार केला. पण मला तें अशक्य दिसतें."

सुनितीला अरुणच्या भाषणाचा अतिशय राग येत होता. परंतु ती मुद्दामच स्तब्ध राहिली. अरुणनें आपला बिछाना सारखा करून गुंडाळीत म्हटलें,

" मला गाडी बदलण्याची वेळ आली. आपण तिघांनींही एकदां शेवटीं चहा घेऊं. या गाडींतील ह्या औटघटकेच्या सहवासांत आपला पुष्कळच दाट परीचय झाला. कॉलेजच्या पांचसहा वर्षांत एकाही विद्यार्थिनीशीं मी एवढ्या मोकळेपणानें बोललों नसेन. कदाचित् बोलण्यांत एखादा कमीजास्त शब्द गेला असेल तर माफ करा आणि ताजमहालची ट्रिप मजेंत चालवा. तुमच्यामध्यें जरा बेबनाव झाल्याचा संशय येतो म्हणून ही सूचना करण्याचें धैर्य करतों आहे. माझ्यामुळें तर तुमच्यांत वितुष्ट आलें नाहीं ना ? तर खरोखरच मला माफ करा. स्त्रियांशीं कसें वागावें हें मला बिलकुल माहीत नाहीं."

दोघींनीही एकमेकीकडे संशयित मुद्रेनें पाहिलें. एवढ्यांत पोऱ्यानें चहाचा ट्रे आणला. अरुण चहाचे पेले तयार करीत म्हणाला,

" सुनीतीताई, मी लेखक असलों आणि कादम्बरींत जरी एखादा नायक स्त्रियांशीं शिष्टाचारानें कसा वागतो याचें यथार्थ चित्र काढूं शकलों तरी लेखकाला स्वतःच्या बाबतींत तेवढा शिष्टाचार दाखविता येतोच असें नाहीं. "

" मि. पंडित आपल्या भाषणाचा कटाक्ष काय आहे, मला समजत नाहीं " सुनीती मधेंच म्हणाली.

" बरी आठवण झाली. " अरुण तिच्या भाषणाकडे लक्ष नाहीं असें भासवून पुढें म्हणाला, " माझ्या लघुकथा-संग्रहाची आणखी एक प्रत माझ्याजवळ असणार—"

अरुणनें चटकन् बॅग उघडून आणखी एक पुस्तक काढलें.

" नको, नको " सुनीती आग्रहानें म्हणाली, " मी शांताकडून घेऊन वाचीन. "

" छे, छे. " अरुण फाउन्टन् पेननें वर तिचें नांव घालून म्हणाला, " स्मृति–चिन्ह म्हणून देण्याची गोष्ट मिळत नसली तरच द्यायची असं कुठं आहे ? "

इतक्यांत अरुणला उतरण्याचें स्टेशन आलें. त्यानें घाईघाईनें बॅक बंद केली. पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर दुसरी गाडी उभी होती.

" बरं येतों आतां ओळखदेख ठेवा. " अरुण पुन्हा म्हणाला, " तुमचा यशोधनचा अंक माझ्याच हातांत राहिला. ' असूया ' ही गोष्ट पुन्हा एकदां वाचा. बरं, मुंबईला भेटालच."

अरुणवर आपण निष्कारण रागावलों अशा अर्थानें त्या खिन्नपणें त्याच्याकडे पहात होत्या. तो निरोप घेऊन निघाला. चार पावलें पुढें जाऊन तो पुन्हां मागें वळला व पुन्हां त्यांना उद्देशून म्हणाला,

" सुनितीताई, शांताताई, माझ्या त्या कथा–संग्रहांतील तेरावी गोष्ट मुद्दाम आजच वाचा. बरं येतों. "

नमस्कार करून तो पूल चढून पलीकडल्या प्लॅटफॉर्मवर गेला.

सुनितीनें खिन्नपणें संग्रहांतील तेरावी गोष्ट उघडली व ती एकदम आश्चर्यानें म्हणाली,

" अग शांता, शांता पाहिलेंस ? "

शांतानें गोष्टीच्या नांवाकडे पाहिलें तों यशोधनमधील ' असूया ' हीच गोष्ट होती.

" अग, अरुणांनीं आम्हांला सारखंच जिरविलं म्हणायचं. सारखाच सूड घेतला. " सुनिती शरमून म्हणाली.

दोघीही एकमेकीकडे हास्य करीत अन्यायी दृष्टीनें पहात होत्या. पलीकडच्या प्लॅटफॉर्मवरील गाडी चालू झाली होती. सेकंड–क्लासच्या दारांत उभा राहून अरुण त्यांच्याकडे हंसत पहात होता.

एवढ्यांत मेल सुटण्याची घंटा झाली व गाडीनें शिटी फुंकून ती चालू झाली.

*

# पुरुषाचें मन.

आज सुमन अगदीं चिन्तातुर होऊन आपल्या खोलींत बसला होता. अभ्यासाकरतां पुढ्यांत उघडून ठेवलेल्या Romeo and Juliet च्या पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशाचें पहिलें पान एक तास झाला तरी त्यानें अजून उलटलें नव्हतें. टेबलावरील दिव्याच्या प्रकाशाचा झोत त्याच्या चेहऱ्यावर पडला होता. लहानसें घड्याळ सारखी कटकट करीत कांटा वर खेंचित होतें. परीक्षा जवळ आल्यामुळें त्या वसति-गृहाच्या प्रत्येक खोलींत दिवा पेटत होता.

पण भालचंद्र मात्र पुढल्याच वर्षी कसून प्रयत्न करायचा ठरविल्या-मुळें प्रत्येक विद्यार्थ्याच्या खोलींत जाऊन त्यांचा अभ्यास कसा चालला आहे याचा तपास करीत होता. पण थोड्याच अवधींत त्याला खोलीबाहेर काढून ते दाराला कडी घालून अभ्यासांत मग्न होत होते.

भालचंद्र हलकाच आवज न करतां सुमनच्या खोलींत गेला. खुर्चीच्या मागें राहून तो प्रेमार्द्र स्वरांत म्हणाला, "Juliet, my fair love. ( जुलिएट, माझ्या प्रणयचंद्रिके.)"

सुमननें दचकून मागें पाहिलें. भालचंद्र रोमिओचें भाषण सारखा बडबडत होता.

"गडबड नको बरं. माझा अगोदर पुष्कळ वेळ फुकट गेला आहे."

"सुमन," भालचंद्र एकदम उत्तरला, "परीक्षा ही अगदीं मत्सरी तरुणी आहे. तिला कुणाही स्त्रीचा वासही सहन व्हायचा नाहीं. तुला दोहोंमधून प्रथम निवड केली पाहिजे Your lady-love Nalini or this flirt exam. ( तुझी प्रणयिनी नलीनी किंवा ही थिल्लर परीक्षा. )"

"भालचंद्र, तूं कधीं कधीं अगदीं सहज म्हणून बोलतोस पण तें मनाला चांगलेंच पटतें. असंच वाटतं कीं To be or not to be ( जगावें कि मरावें)––"

" सुमा " भालचंद्र मध्येंच म्हणाला, " रोमिओ हें म्हणत नाहीं. तें वाक्य हॅम्लेटचें आहे. तुला मी सांगतों अजूनपर्यंत आपण पुष्कळ परीक्षा दिल्या आणि देतां येतीलही पण प्रथम नलिनी देशपांडे पदरांत घे. काय तें सीझरमधलं वाक्य कीं मनुष्याच्या आयुष्यांत वैभवाची लाट एखाद्याच वेळीं येत असते. "

" भालचंद्र " सुमन खिन्नपणें म्हणाला, " He jests at scars that never felt the wound (ज्याला जखम झालीच नाहीं त्यानें दुसऱ्याच्या जखमेचे वण पाहून हंसावें) विवाहाच्या बंधनांत अडकल्यावर यंदा पास झालों नाहीं तर मग बी. ए. सुद्धां एखाद्या वेळीं पदरीं पडायची नाहीं. पुढचा आमचा शिक्षणक्रम इथेंच थांबला म्हणून समजायचा. लग्न झाल्यावर विलायतेला जा म्हणून बाबा लिहितात. "

" पण सुमन, हें मात्र गळाला लावलेलं आमीष आहे. " भालचंद्र पुढें म्हणाला, " आणि लग्न झाल्यावर तूं दोन वर्षे तरी कुठचा इंग्लंडला जातोस ? "

पण त्याच्या भाषणाकडे लक्ष न देतां सुमन पुन्हां म्हणाला, " मी बाबाना लिहीलं कीं मी एम्. ए. एल्एल्. बी. झाल्यावर मग तिच्याशींच विवाह करतों. पण बाबा लिहितात कीं देशपांड्याचा यंदाच आग्रह आहे आणि आपण शब्दही देऊन चुकलों आहों. तूं परीक्षा झाल्यावर लवकर निघून ये. भालचंद्र, या देशपांडेचा माझ्यावर एवढा विश्वास नाहीं काय ? "

" अरे, कदाचित् त्यांचा आपल्या मालावरच विश्वास नसेल, सुमा, मिस् देशपांडे तुझ्या आग्रहास्तव त्यांनीं कॉलेजांत पाठवली. कुणीं कांहीं तरी गप्पागोष्टी त्याच्या कानावर नेल्या असतील. हे म्हातारे लोक चटकन् पिसाळतात. "

" पण माझी इच्छा नसतांना हे लग्नाचा एवढा आग्रह करणारे कोण ? घाई असेल तर खुशाल त्यांनीं तिचे कोणाशींही लग्न लावून द्यावें. I am not going to marry unless I am self-supporting. ( मी कर्तबगार झाल्याशिवाय लग्न करणार नाहीं. ) "

" सुमन " भालचंद्र हंसत म्हणाला, " स्वर जास्त ताणूं नकोस हं. नलिनी देशपांडेसारखी पोरगी गमावून बसशील. "

" अरे जा I don't care for her. " सुमन निष्काळजीपणाचा आव आणून म्हणाला.

" तें आम्हांला माहिती आहे. " असें म्हणून भालचंद्रानें एकदम टेबलाचा खण उघडला व आंतील नलिनी देशपांडेचा फोटो काढून बाहेर ठेवला. त्यानें सुमनचे खिसे चाचपून आंतून तिच्या आणखीही वेगवेगळया आकाराच्या प्रती बाहेर काढल्या व तो हंसत म्हणाला, " हा अगदीं तूं तिची पर्वा करीत नाहींस याचा भरपूर पुरावा आहे. "

सुमन त्याच्या हातांतून सर्व फोटो हिसकावून घेऊन खणांत ठेवून म्हणाला,

" भालचंद्र, आतां गडबड नको. मला आतां बारा वाजायच्या-पूर्वी दोन अंक पुरे केले पाहिजेत."

इतक्यांत समोर दिसणाऱ्या बंगल्याच्या खिडकींत कुणीएक तरुणी उभी राहिली. भालचंद्र प्रणयाचा हावभाव करीत प्रेमी स्वरांत म्हणाला,

" Oh, she comes, Juliet, my fair love. It is the east and Juliet is the moon. ( ती पहा माझी प्रणयिनी जुलीएट आली. ती पूर्वदिशा आणि माझी जुलीएट ही चंद्रकोर. )"

" चंद्या, " सुमन एकदम ओरडला, " तिचा बाप मोठा पोलीस ऑफिसर आहे. रात्रभर बसविल मला चौकीवर नेऊन. "

" मग ठीक झालें. देशपांडे आपली नलिनी तुला देणार नाहीं आणि ती तुझें असें वर्तन ऐकून लग्नाला तयार होणार नाहीं."

इतक्यांत ती तरुणी पुन्हां आंत गेली.

" Good night my flirt love. Sleep so disturbingly." ( शुभरजनी, माझ्या हृदयदेवते, अगदीं अस्वस्थ झोंप आतां.) असें म्हणून चंद्रकान्त दार मिटून बाहेर गेला.

सुमननें उठून दाराला कडी घातली. जरी कोणी खोलींत नव्हतें तरीदेखील त्यानें संशयित मुद्रेनें सभोंवार पाहिलें. टेबलाजवळील खुर्चीवर

बसून त्यानें खण उघडला व नलिनीचे फोटो काढून समोर मांडले. क्षण-भर त्या फोटोकडे पहातांच त्याच्या चेहऱ्यावरील त्रस्तता एकदम नाहींशी होऊन मुखावर हास्य झळकूं लागलें. तो तन्मयतेनें फोटोंतील सुंदर चेहरा निरखून पहात होता. त्या चित्रांतून कोणता जास्त सरस आहे हें न टरवितां आल्यामुळें डोळे चंचलपणें सारखे इकडेतिकडे फिरत होते.

आणि तसें पाहिलें तर नलिनीच्या सौंदर्याचें वैशिष्ट्य प्रत्येक चित्रांत तितक्याच जोरदारपणें दृग्गोचर होत होतें. कारण एका चित्रांत गोड हास्य करीत ती आपल्याकडे पहात आहे असेंच सुमनला वाटत होतें; तर दुसऱ्या प्रतिमेंत तिच्या चेहऱ्यावरील सात्विक भाव स्पष्ट दिसत होता. पण तिसऱ्या फोटोकडे पाहिलें तर प्रणयी जनाचा मोहक चोरटे-पणाही तिच्या कांहींशा मोटाल्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता. तिच्या चेहऱ्यावर दिसणारा मुग्धपणा फारच आकर्षक वाटत होता.

चित्रांतील नलिनीकडे पहातां पहातां तिच्यावरोबरचा प्रेमळ सहवास त्याच्या दृष्टीसमोर उभा राहिला. तिचें तें लडिवाळपणें हंसत बोलणं, हृदयाचा टाव घेण्याचा प्रयत्न केल्याप्रमाणें प्रणयी पहाणं आणि आपला प्रत्येक शब्द फुलाप्रमाणें झेलण्यासाठीं औत्सुक्य दर्शविणें त्याला आटवलें.

अशा गोड प्रसंगाचीं चित्रें सुमनच्या दृष्टीसमोर राहिल्यामुळें तन्म-यतेनें फोटोकडे तो सारखा पहात होता. इतक्यांत "हॅः हॅः" असा हास्यध्वनि त्याच्या कानावर पडला. झटकन् फोटो एकत्र ओढून त्यानें मागें पाहिलें, तों खिडकीवरील लहानशा झरोक्यांतून भालचंद्र आंत पहात होता.

"भाल्या," सुमन चिडल्याचा आविर्भाव करून म्हणाला, "अशी चोरी करायला तुला शरम वाटत नाहीं?"

"सुमा, माफ कर. पण तुझी चोरी पकडण्यासाठीं मला ही चोरी करावी लागली. अच्छा Good Night." असें म्हणून भालचंद्र खिडकी-वरून खालीं उतरला.

सुमननें घड्याळाकडे पाहिलें तों काटादेखील चोराप्रमाणें नकळत कितीतरी पुढें गेला होता. पण अजून आपण पुस्तकाचें पहिलें पान

वाचितच आहों याबद्दल त्याला राग आला. सर्व फोटो एकदम आंत टाकून खण त्यानें जोरानें बंद केला. नलिनीचा कोणताच अपराध नसतांही त्याला तिचा अतिशय राग आला.

"No, I am not marrying at any cost." (कांहीं झालें तरी आपण तूर्त लग्न करणार नाहीं.) असें आपल्याशींच म्हणून त्यानें पुस्तकाकडे मन एकाग्र करण्याचा प्रयत्न केला.

अगदीं अल्पावधींतच त्यानें एकदम पुस्तक मिटलें. कांहीं वेळ समोरच्या दिव्याकडे पहात तो विचार करीत होता. एखाद्या लेखकाला एकदम एखादी कल्पना सुचावी आणि त्यानें क्षणाचाही विलंब न करतां ती लिहिण्यास घ्यावी त्याप्रमाणें सुमननें केलें. टेबलावर पत्राचें पुष्टिपत्र घेऊन तो आपल्या पेननें लिहूं लागला.

मधून मधून विचार करण्यासाठीं थांबून त्यानें दोन पत्रं लिहिलीं व दोन लखोट्यांत घालून त्यावर त्यानें पत्ता घातला.

बरीच रात्र झाल्यामुळें झोंप येत नसतांही बिछान्यावर पडून त्यानें दिवा विझविला.

आठ दिवस गेल्यानंतर सुमन पत्राची उत्सुकतेनें वाट पहात होता. आपलें वसतिगृह कोणत्या पोस्टाच्या विभागांत येतें, दररोज पत्राची डिलीव्हरी किती वेळां असते, बेळगांवहून येणारीं पत्रें कधीं वाटलीं जातात याची तो कसून चौकशी करीत होता. हिशोब केला तर चार सहा दिवसांपूर्वींच पत्र आलें पाहिजे असें त्याला वाटत होतें.

पण आज समोरून पोस्टमन येत आहे हें पाहून सुमन झटकन् कपडे करून खालीं गेला व रस्त्यावरच त्यानें त्याला प्रश्न केला;

"काय हो, आमचं पत्र आहे का?"

पोष्टमननें पत्रें चाळून एक पत्र पुढें करून म्हटलें, 'हं, सुमन देशपांडे,' जरी सुमन अतिशय उत्कंठेनें त्या पत्राची वाट पहात होता तरीदेखील त्याच्या चेहऱ्यावर साशंकता स्पष्ट दिसली. घाईघाईनें जवळच असलेल्या सेसिल रेस्टॉरँटमध्यें जाऊन त्यानें चहा मागविला व खुर्चीवर बसून तो तें पत्र वाचूं लागला.

" अनेक आशीर्वाद,

तुझें पत्र पोहोंचलें. मजकूर वाचून आश्चर्य वाटलें. आम्ही तुझ्या विवाहाचा मुहूर्तदेखील निश्चित करून बाहेरगांवीं निमंत्रण-पत्रिका पाठविल्या; लग्नाची सर्व तयारी केली; आणि आतां तूं विवाह करण्याचें नाकारलेंस तर मला व तुझ्या आईला काय वाटेल याचा विचार कर. आम्हांला मग तोंड दाखविणं शक्य नाहीं. तुझ्या पसंतीशिवाय का आम्ही मुलगी ठरविली ? सुमन, हा अविचार करूं नकोस. ताबडतोब इकडे निघून ये. तुझ्या आईला मी अजून तुझें पत्र सांगितलें नाहीं. तारेनं कधीं येत आहेस तें कळव. कळावें.

तुझा पिता.
सदाशिव "

हें पत्र वाचतांच सुमनचा चेहरा गोरामोरा झाला. क्षणार्धांत त्याचा विवाह न करण्याचा दृढ निश्चय पार नाहींसा झाला. चहाचा पेला कसाबसा रिकामा करून खिन्नपणें तो परत खोलीवर आला. बाबांच्या मनाला आपण किती यातना केल्या असतील याचा विचार करतांना त्याच्या मनाला अतिशय वेदना होत होत्या. वसतिगृहाचा जिना जड पावलांनीं चढतांना वाटेंतच त्याला पुन्हा पोस्टमन भेटला.

" साहेब " तो दिलगिरी व्यक्त करून म्हणाला, " आणखी एक आपलें पत्र होतें तें खोलीवर टाकलें आहे. "

पण सुमनला त्या पत्राचें बिलकूल महत्त्व वाटत नव्हतें. खोली उघडून त्यानें पत्रावरील अपरिचित अक्षराकडे पाहिलें व तें टेबलावर ठेवून दिलें. टेबलावरील एक कागद घेऊन त्यानें बेळगांवास तार पाठविण्याचें ठरविलें. अनेकवेळ तारेंतील मजकुरांत खोडाखोड करून त्यानें शेवटीं तार लिहिली.

" Excuse me stop complete satisfaction for your plans stop starting tomorrow-Suman" ( क्षमा करा. आपले बेत सर्वस्वी मान्य. उद्या निघतों-सुमन. )

सुमननें वसतिगृहाच्या शिपायाला बोलावून ती एक्स्प्रेस तार करायला सांगितली. स्नानगृहांत जाऊन त्यानें थंड पाण्यानें बराच वेळ

तोंड धुतलें व पुन्हा तो खोलींत आला व खिन्नपणें त्यानें टेबलावरील पत्र उघडलें.

पत्रांतील मजकूर जसजसा तो वाचित होता तसतशी त्याची मुद्रा अतिशय व्याकुळ होत होती. क्षणभर आपल्या डोळ्यांना अक्षरें दिसतच नाहींत त्याप्रमाणें कागदाकडे तो शून्यदृष्टीनें पहात होता. कांहींवेळ त्याचें मन विचार करण्यास असमर्थ होतें. त्याचे हात थरथरत होते. श्वासोच्छ्वास अडखळत बाहेर पडत होता. अल्पावधींतच सुमनच्या रुंद भालप्रदेशावर घर्मबिंदु चमकूं लागले.

सुमननें पुन्हा पुन्हा पत्र वाचलें. पण नलिनीचें वर्तन शुद्ध नाहीं, तिच्या पुष्कळ प्रणयचेष्टा झालेल्या आहेत आणि तिच्याशीं विवाह केल्यास आपण आजन्म पश्चात्ताप कराल या तीन सूचनांखेरीज त्या पत्रांत विशेष मजकूर कांहींच नव्हता.

सुमनच्या मनांत अनेक विचारांचें थैमान सुरू झालें. त्याची विवेक-बुद्धि असमतोल होऊन त्या निनावी हितचिंतकाच्या संदेशाबद्दल त्याला सत्यत्व वाटूं लागलें. खरोखर नलिनीचें असें आचरण असेल का? आपल्याशीं ती अशी प्रतारणा करील का? सुमननें स्त्रियांवर अनेक तुच्छतादर्शक उद्गार ऐकले होते. भालचंद्र तर नेहमीं म्हणत असतो कीं देव हा पुरुष नसून स्त्री आहे, नाहीं तर त्याला हीं तेहतिस कोटीं रूपें घेणें शक्य झालें नसतें. 'स्त्रीचरित्रं देवो न जानाति' हें संस्कृत भाषितदेखील त्याला आठवलें.

नलिनीच्या हातून असा प्रकार घडणार नाहीं. तिच्या मुखावर झळकणारें निर्व्याज हास्य तिच्या निर्मल अन्तःकरणाची साक्ष देतें असेही विचार सुमनच्या मनांत येत होते. परंतु यावेळीं त्यांना फार वेळ थारा मिळत नव्हता.

सुमन अगदीं हताश झाला. भालचंद्रासारखा मित्र आज जवळ असता तर त्यानें खात्रीनें धीर दिला असता, हा विवाह मोडण्याचा मार्ग सुचविला असता असेंच त्याला वाटलें. पण भालचंद्र कालच कोकणांत गेला होता.

उद्यां घरीं जाऊन बाबांस हें पत्र दाखवून विवाह मोडायचा असा बेत करून तो त्याच रात्रीं बेळगांवास गेला. पण सदाशिवरावांनीं त्या पत्राला

बिलकुल महत्त्व दिलें नाहीं. कोणी तरी दुष्ट माणसानें मत्सरानें अगर सूड-बुद्धीनें वाटेल ते आरोप करून लिहावें आणि आपण त्याच्यावर विश्वास दाखवावा हें आपल्या दुबळ्या मनोवृत्तीचें द्योतक आहे असें सांगून सुमनला त्यानीं सारखाच लाजविला होता.

कांहीं दिवस कधीं निघून गेले हें न समजतांच सुमनचा विवाह-दिन उगवला. समारंभ आनंदानें पार पडला. सर्वत्र समाधान वृत्ति दिसत होती. सुमनलाही वडील माणसांचा उपदेश पुष्कळ वेळां मननीय असतो असें वाटूं लागलें होतें. जर नलिनीशीं आपण विवाह करण्याचें दुराग्रहानें नाकारलें असतें तर जन्मभर पश्चात्ताप झाला असता अशा विचारानें त्याला अतिशय वैशम्य वाटत होतें. कारण तिच्या चार दिवसांच्या सहवासांतच तिच्या प्रेमळ स्वभावाची आणि निरागस हृदयाची मनोमन साक्ष त्याला पटली होती. प्रतिदिन नलिनी त्याला अधिक हुशार आणि सौंदर्यसंपन्न वाटत होती. आपल्या सुखदुःखाच्या भावना तिला समजतात आणि ती आपल्याशीं पूर्णपणें समरस होते असेंच त्याला वाटत होतें.

परंतु एक गोष्ट मात्र त्याच्या मनाला छलदायक होत होती. नलिनीच्या विवाहापूर्वीच्या वर्तनाबद्दल आपल्याला आलेल्या पत्रांत कांहीं सत्यांश असेल का ? एवढ्या कोमल मनोवृत्तीच्या नलिनीच्या हातून असा प्रमाद कधींही घडणार नाहीं आणि जरी कदाचित् तिचें पूर्ववर्तन आक्षेपार्ह असलें तरीदेखील आपण तिला खात्रीनें त्याबद्दल क्षमा करूं असें सुमन मनाला समजावीत होता. पुष्कळवेळां ही मनाला जाचणारी गोष्ट तिलाच विचारून एकदांचा निर्णय लावून घ्यावा असे मनाशीं ठरवून त्यानें नलिनीकडे प्रश्नाच्या अपेक्षेनें पाहिलें कीं ती म्हणत असे,

" मधून मधून तुम्ही माझ्याकडे असे कां पहातां ? कांहीं विचारायचं असलं तर एवढा संकोच कशाला बाई ? "

" मला कांहीं विचारायचं नाहीं. " सुमन बळेंच हास्य करून म्हणत असे, " तुझ्याच मनांत कांहीं तरी विचार येतात आणि तुझ्या चेहऱ्यावरून मी ते वाचूं शकलों कीं काय, असा तुला संशय येतो. "

" बाई, बाई, खरंच असं हंसून सांग पाघरायला मला येत नाहीं. ते टपोरे डोळे ज्यावेळीं माझ्याकडे पहातांना स्थिर होतात त्याच वेळीं मी समजतें, कीं स्वारी कसला तरी विचार करते आहे. "

" आणि मलादेखील ती नजर भेदरल्यासारखी होऊन जमिनीकडे वळली, त्या नाजूक गालावर लाली चढली कीं बाईसाहेब कसला तरी विचार दडविण्याचा व्यर्थ प्रयत्न करताहेत असंच वाटतं. "

" शपथ, सांगतें कीं मला सुखाची तृप्तता वाटते आहे. माझ्या मनांत आपल्यापासून दडविण्यासारखा कसलाच विचार येत नाहीं."

यावेळीं नलिनीची मुद्रा किंचित् खिन्न होत असे. डोळ्यांत एक प्रकारचें मार्दव दिसत असे. सुमन अन्यायी दृष्टीनें तिच्याकडे पाहून तिला जवळ ओढून हलकाच तिच्या गालाचें चुंबन घेत असे. नलिनीचें तेवढ्या देणगीनें समाधान होऊन तिचें मुखकमल पुन्हा हास्यानें प्रफुल्लित होत असे.

पण कधीं तरी या प्रश्नाचा निकाल लावलाच पाहिजे असें सुमनचें मन अट्टाहासानें त्याला सांगत होतें. दिवसांमागून दिवस गेले. सुमनच्या परिक्षेचा निकाल लागला. बी. ए.ची परीक्षा पास झाल्यामुळें एल्.एल्. बी.च्या परीक्षेसाटीं मुंबईस जाण्याचा दिवस जवळ येत चालला. सुमन अगदीं अस्वस्थ झाला होता.

मुंबईस जाण्यासाटीं सुमन उद्यां निघावयाचा होता. त्या रात्रीं जेवण आटोपल्यावर तो आपल्या खोलींत बसला होता. पुस्तक समोर धरून त्यानें मन कितीही एकाग्र करण्याचा प्रयत्न केला तरी एका अक्षरावरही त्याचें लक्ष नव्हतें. आज तरी ह्या गोष्टीचा उलगडा केलाच पाहिजे अशा निश्चयानें तो नलिनीची वाट पहात होता. इतक्यांत तिनें खुर्चीच्या मांग येऊन सुमनचे डोळे मिटले.

" ओळखलं. नलिनी—" असें म्हणून सुमननें तिचा बाहू पकडून तिला पुढें ओढली.

" खरंच, तुम्ही उद्यां जाणारच का ? आणखी चार दिवस रहा ना ? " नलिनी खुर्चीच्या हातावर बसून आर्जवानें म्हणाली.

" नली, अगोदर कॉलेज सुरू होऊन चार दिवस झाले. माझी आधींच सर्व मंडळी थट्टा करताहेत आणि मी जर परत मुक्काम वाढवला तर मला मित्रांना तोंड दाखवायला नको!"

" खरंच, मला दोन दिवसाआड पत्र आलं पाहिजे हं. "

" खात्रीनं. पण नली—" एवढं बोलून सुमन गोंधळला.

नलिनी अपेक्षेनें त्याच्याकडे पहात होती. सुमन मनाचा निश्चय करून आर्त स्वरांत पुढें म्हणाला,

" नली, रागावूं नकोस. पण तुला एक गोष्ट विचारायची आहे. "

क्षणभर थांबून त्यानें पुस्तकांतून एक पत्र काढलें व तें तिच्या हातांत देऊन पुढें म्हणाला,

" हें पत्र विवाहापूर्वी मला आलें होतें. माझा विश्वास नाहीं, पण हा मजकूर खोटा आहे ना? लग्नापूर्वी थोडेच दिवस मी तुला एक पत्र लिहिलें होतें आणि मी त्यांत स्वतःवर अनैतिक वर्तनाचे आरोप केले होते. त्यामुळें तूं लग्न करण्याचें नाकारावें हा माझा हेतु होता. "

" आणि तें पत्र वाचूनच मी हें पत्र तुम्हांला त्याच हेतूनें लिहिलें होतें. " नलिनीचा स्वर आर्द्र झाला. ती गहिंवरून पुढें म्हणाली, " पण आतां कशाला त्या गोष्टी? लग्नाच्या अगोदरच मी तें पत्र जाळून टाकलें होतें आणि सारा प्रकार सर्वस्वी विसरलें होतें. आपण मात्र अजून ती गोष्ट विसरलां नाहीं. पुरुषांचें मन इतकं हट्टी आणि संशयी असतं का?"

नलिनीला एकदम रडूं कोसळलें. पलंगावर अंग टाकून ती स्फुंदून रडूं लागली. सुमन या अनपेक्षित प्रकारामुळें क्षणभर कावराबावरा झाला होता. हलकाच पुस्तक मिटून तो खुर्चीवरून उठला. आवाज न होऊं देतां त्यानें दाराला कडी घातली व दिवा विझविला.

दुसऱ्या दिवशीं प्रकृति अस्वस्थ असल्याच्या सबबीवर त्यानें नलिनीचें सांत्वन करण्यासाठीं आपला निघण्याचा बेत दोन दिवस पुढें ढकलला होता.

# भुतांच्या भूतचेष्टा

तो प्रसंग आठवला म्हणजे अजूनही अंगावर कांटा उभा राहतो. झालीं त्या गोष्टीला दोन वर्षे—हो. त्यावेळीं मी सहावी पास होऊन नुकताच मॅट्रिकच्या वर्गांत गेलों होतों.

आमच्या लहानशा शहरांत त्या मानानें शाळा मात्र मोठी होती. परंतु वसतिगृहांत अजून भरपूर सोई नसल्यामुळें वरच्या वर्गांतील अवघे पंधरावीसच विद्यार्थी आम्ही रहात होतों. हॉस्टेलचे सुपरिन्टेन्डन्ट म्हणून देशपाण्डे मास्तर तेथें रहात असत. किती त्यांचा गोड स्वभाव ! गुरुजी आणि विद्यार्थी हें आमचें कधीं नातेंच नव्हतें. असे मनाचे दिलदार आणि प्रेमळ मास्तर मी कधीं पाहिलेच नाहींत. त्यांचा वाचनाचाही व्यासंग तेवढाच दांडगा होता. मुंबईच्या लायब्ररींतून त्यांचा मित्र नेहमीं पंधरावीस दिवसांनीं त्यांना पुस्तकाचें पार्सल पाठवीत असे. सूर्यास्त होऊन अगदींच अंधकार झाला कीं नाइलाजानें ते घराबाहेर पडायचे. असा एक समुद्रकिनाऱ्यावरून फेरफटका करून ते पुन्हां वसतिगृहांत येत असत. आम्ही सर्व मुलें जेवणाकरितां त्यांची वाटच पहात असूं.

" काय विनायक, आज बरोबर जेवत नाहींस तो कां बुवा ? खेळायला गेला नाहींस वाटतं ? अरे, अभ्यासापायीं अशी प्रकृतीची हेळसांड करूं नकोस. माझा हा स्वानुभव सांगतों आहें. " मास्तर खिन्नपणें हंसत म्हणत असत.

माझ्यावर त्यांची अतिशय मर्जी होती. सर्व मुलें झोंपल्यावर माझ्या खोलींत दिवा बघून मास्तर आंत येत असत व मला म्हणत असत,

" विनायक, चल अभ्यास पुरे कर आतां. दहा वाजून गेले. बाहेर चांदणं किती सुंदर पडल आहे ! जरा असे कम्पाउंडांतच फेऱ्या मारूं. "

मी पुस्तक मिटलें व बाहेर आलों. आकाश अगदीं निरभ्र होतें. जिकडे तिकडे अगदीं शांत होतें. मात्र मधूनच वहाणाऱ्या वाऱ्याच्या

झुळकेमुळें माडाच्या चुडताचा सळसळ असा आवाज होत होता. विस्तीर्ण चिंचेच्या वृक्षामागून चंद्र वर येत असल्यामुळें त्या वृक्षाची छाया वसतिगृहाच्या पटांगणावर दूरवर पसरली होती. गांवाबाहेर वसतिगृह असल्यामुळें रात्रीच्या वेळीं तळावरून सुटलेल्या खटार गाड्यांच्या खड-खडाटापलिकडे कुणाची चाहूल नव्हती. हिरव्यागार चारीवर हातपाय ताणून मास्तर म्हणाले,

" मला ह्या चंद्राकडे पहात सबंध रात्र घालवावी असं वाटतं. खरंच, ह्या अफाट आकाशांत लुकलुकणाऱ्या चांदण्या, हा चंद्र, हें पहा-तांच माझ्या मनांत कांहीं विचित्रच भावना उद्भवतात. "

इतक्यांत त्या चिंचेच्या झाडावरून घुबडाचा घू घू असा आवाज सुरू झाला. माझ्या छातींत धस्स झालें. एखाद्या लहानशा झाडावर जर तें बसलें असतें तर मीं दगड मारून त्याला नक्की हांकविलें असतें.

" मास्तर, ह्या घुबडाचा शब्द किती भेसूर आहे हो? भुतेंसुद्धां घाबरत असतील. "

" त्याला कदाचित् आम्हीच भुतं वाटत असूं. कारण ह्या मध्य-रात्रींच्या भयाण प्रसंगीं दुसरं त्याला कोण दिसणार? "

इतक्यांत कांहीं तरी धाडकन् पडल्याचा आवाज झाला. माझ्या छातींत एकदम धडकी भरली व श्वास कोंडून एकदम वळून मी मागें पाहिलें. सर्वत्र सामसूम होतें. परंतु मास्तर मात्र हंसत होते.

" विनायक, ही बघ दुसरी भूतचेष्टा. " ते हंसत म्हणाले, " एवढा घाबरलास? अरे, माडावरून सुकलेला नारळ पडला तो! "

मास्तर उठले व मला एकटाच टाकून ते माडाजवळ गेले. अजू-नही माझी छाती धडधडत होती. अंगाला दरदरून घाम सुटला होता. मास्तरनीं चांदण्याच्या साह्यानें पडलेला नारळ हुडकून काढला.

" मास्तर, " मी त्यांच्याजवळ रहात म्हणालों, " पूर्वीं ही जागा भुतांसाटीं फार प्रसिद्ध होती. गाडीवाले अजूनही ह्या चिंचेवरील देवचाराला गाडीखालीं उतरून नवस करतात."

" विनायक, तूंसुद्धां एवढा भोळसट आहेस का? अरे, भुतें या अडाणी लोकांनाच विशेष दिसतात. आम्हाला कधींच पहाण्याचा प्रसंग येत नाहीं. यावरून ही मानसिक विकृतीच असावी असं मला तरी वाटतं. निदान यांत बहुतेक कल्पनेचीच बाधा असते."

माझ्या मनांत अजूनही झालेल्या प्रकाराचा धक्का कायम होता. मी मागें वळून पुन्हा पुन्हा त्या झाडीकडे पहात होतों.

" विनायक, तुला अजूनदेखील खात्री वाटत नाहीं ना? हें बघ आतांच जर तूं एकटा असतास तर खात्रीनें बेशुद्ध झाला असतास आणि मग ह्या सबंध शहरांत दुसऱ्या दिवशीं भूतचेष्टेचा प्रकार आम्हीं ऐकला असता."

मी हंसण्याचा प्रयत्न केला. पुन्हा धाडकन् कांहीं तरी जमिनीवर आदळलें. मी अतिशय कावराबावरा झालों. माझ्या त्या केविलवाण्या मुद्रेकडे पाहून मास्तर पुन्हा हसूं लागले.

" मास्तर, आपण आंत जाऊं या. मला भीति वाटते. " मी स्पष्ट कबुलीजबाब दिला.

" विनायक, माझा शिष्य आहेस तूं. " मास्तर पुढें म्हणाले, " अरे, ती नारळाची पेंड सुकली आहे, त्यामुळें एक एक नारळ पडतो आहे. जा, आतां तूं शोधून घेऊन ये. "

मी साफ नकार दिला. मास्तरनीं पुन्हा पुढें होऊन नारळ हुडकून काढला.

" अरे, आम्ही कॉलेजमधें असतांना मीं ह्या सर्व भूतचेष्टा पहाण्याचा प्रयत्न केला आहे. बैस इथं. " मास्तर मला हाताला धरून बसवीत म्हणाले, " एकदां आमच्या हॉस्टेलांत पैज लागली कीं मध्यरात्रीं स्मशानांत जाऊन जमिनींत एक काटी ठोकून कोण येतो? कांहीं विद्यार्थी तें धाडस करण्यास तयार झाले. आमच्याबरोबर एक दिनकर नांवाचा विद्यार्थी होता, तोदेखील आपलें धैर्य दाखविण्यासाठीं पुढें झाला. सर्वांनीं एक एक रुपया काढून दहा रुपये टेबलावर ठेवले. दिनकरच्या हातांत आम्ही एक लहानसा काटीचा तुकडा व ती ठोकण्याकरितां एक दगड दिला.

त्यावेळीं दिनकरचा चेहरा अगदीं गोरामोरा झाला होता. ‘ दिनकर, इथलं स्मशान म्हणजे मुंबईचं सोनापूर नाहीं हं ! लक्षांत ठेव ! भयंकर भूतचेष्टा होत असतात तिथं ! ’

मास्तरांचा चेहरा तें दृश्य डोळ्यापुढें उभें राहिल्यामुळें भीतिदायक झाला होता. क्षणभर थांबून ते पुढें म्हणाले,

“ दिनकर मोठ्या धीराचा आव आणून खांद्यावर धोतराचा सोगा टाकून निघाला. आम्ही सर्व विद्यार्थी खोलींत भूतसमंधाच्या गोष्टी करीत बसलों होतों. जो तो आपल्या गांवचे भयंकर प्रकार सांगत होता. आमच्या हॉस्टेलपासून पंधरा मिनिटांच्या अंतरावरच स्मशान होतें. रात्र अमावास्येची असल्यामुळें बाहेर अगदीं गडद अंधार पडला होता. साडेबाराचा ठोका पडला तेव्हां आम्ही आमच्या गोष्टी थांबवून दिनकरची वाट पाहूं लागलों. एवढ्यांत तो यावयास पाहिजे होता. आमच्यामध्यें तर्कवितर्क सुरू झाले. कांहीं वाईटवरं तर झालं नसेल ना ? या विचारानें आमच्या मनोवृत्ति थरारल्या. पाऊण वाजला तरीदेखील दिनकरचा पत्ता नाहीं ! तेव्हां मात्र आमची त्रेधा उडाली. ‘ चला, ’ असं म्हणून आम्हीं हातांत एक एक काठी घेतली व टॉर्च घेऊन स्मशानाकडे निघालों. सभोंवार दाट अंधार असला तरी आम्ही तीक्ष्ण नजरेनें पहात होतों. स्मशानाच्या सभोंवारचे उंच वृक्ष हलके हलके डोलत होते. मधूनच एकादें घुबड आमच्या बाजूनें चटकन् उडत होतें.

“ हातांतील टॉर्च पेटवून आम्हीं सभोंवार प्रकाश पाडला. पण दिनकर कुठेंच दिसेना. ‘ दिनकर, दिनकर ’ अशा हांका मारल्या. त्यांचे प्रतिध्वनि मात्र त्या शांत वेळीं ऐकूं आले. आमच्या मनोवृत्ति कडाडल्या. अन्यायी दृष्टीनें आम्हीं एकमेकांकडे पाहिलें. जळलेल्या प्रेताच्या खड्यांत काळ्या काळ्या उभ्या दिसत होत्या.

“ आम्हीं एकमेकांच्या धीरानें स्मशानभूमीवर पाय ठेवला. दूर अन्तरावर कोल्हेकुई ऐकूं येत होती. ”

मास्तर मध्येंच थांबले. माझ्या चेहऱ्यावरील भीतीची स्पष्ट छाया पाहून ते मला म्हणाले,

“ विनायक, भीति वाटत नाहीं ना तुला ? ”

पुढील प्रकार ऐकण्याची उत्सुकता असल्यामुळें कोंडून धरलेला श्वास सोडून मी म्हणालों,

“ नाहीं, नाहीं. सांगा तुम्ही. पुढं काय झालं ? ”

“ आम्ही अगदीं घाबरून गेलों. कांहींतरी विचित्र प्रकार चटकन् दृष्टीस पडेल म्हणून साशंक नजरेनें आम्ही एकसारखे सभोंवार पहात होतों. भुतांची चेष्टा करणारे जे होते त्यांच्याही तोंडचें पाणी पळालें होतें. ‘ दिनकर ! दिनकर ! ’ मीं पुन्हा हांक घातली. तरी सर्वत्र सामसूम. टॉर्चच्या प्रकाशाचे झोत जमिनीवर टाकून आम्ही स्मशानभूमीची तपासणी करीत होतों. इतक्यांत चटकन् दिनकराच्या देहावर आमचा प्रकाश पडला. आम्हीं एकदम धांव घेतली. तो निश्चेष्ट उताणा पडला होता. श्वासोच्छ्वासही होत नव्हता. अंगदेखील गार पडलें होतें. ”

माझ्या डोळ्यांतून चटकन् अश्रु खालीं पडले. मास्तर पुढें म्हणाले, “ आम्ही त्याला उचलूं लागलों आणि पहातों तों त्यानें लगबगीनें काठी धोतराच्या सोग्यावर ठोकली होती; यामुळें उठतांना त्याला खेचल्याप्रमाणें धक्का मिळाला आणि आपणाला भुतानें झपाटलें ह्या कल्पनेनें तो मूर्च्छित झाला. ”

“ मास्तर, तो मग बरा झाला का ? ” मीं प्रश्न केला.

“ हो ! मग आम्हीं त्याला सावध केला. पुष्कळ दिवस दवाखान्यांत होता. आतां ठीक आहे. ऐकलंस, भूतचेष्टेचे कसे प्रकार असतात ते ? ” मास्तरनीं हंसत प्रश्न केला.

माझें अंग रोमांचित झालें होतें. छाती सारखी धडधडत होती.

मास्तर पुढें हंसत म्हणाले, “ मी मेल्यावर जर खरोखरच मला पिशाच्च होतां आलं तर अवश्य होईन. त्यामुळें दुष्ट लोकांवर मला बराच ताबा चालवितां येईल. विनायक, खरंच, मी भूत झालोंच तर तुझं खास रक्षण करीन आणि मी कधीं तुला भेटायला आलों तर मला घाबरूं नको हो ! ”

“ मास्तर, याच वेळीं मला भीति वाटते. ” माझें सर्व अंग थरारलें होतें.

"चल, माझ्या खोलींत येऊन झोंप." असें म्हणून ते उठले. अजूनही त्या घुबडाचें ओरडणें चालू होतें.

रात्रीं मास्तर अगदीं अल्पावधींतच झोंपले. मी मात्र डोक्यावरून पांघरूण घेऊन डोळे गच्च मिटून पडलों होतों. किती वेळ तरी मला झोंप येईना.

अगदीं दोन दिवसांतच मास्तरांना ताप आला व त्याच्या छातींत कळ सुरू झाली. आम्ही चार पांच मुलें त्यांच्याजवळ एकसारखीं बसून होतों. जरासं बरं वाटलं कीं मास्तर त्या आजारांतही मला हंसून म्हणत,

"विनायक, परवां रात्रींच्या भुतानं मला झपाटलं असावं."

"मास्तर, डॉक्टरचा हुकूम आहे कीं तुम्ही एक शब्द बोलायचा नाहीं."

"मास्तर या नियमाला अपवाद आहे. अरे, दोन दिवस शिकवायला न मिळाल्यामुळंच माझा आजार असा दुणावतो आहे."

त्यांच्या छातींत कळ आली व छातीवर गच्च हात दाबून तोंड विचित्र करीत ते कळ सोसण्याचा प्रयत्न करीत होते. कांहीं वेळानें त्यांना पुन्हा बरं वाटलं. चेहरा पुन्हां दुःखशून्य दिसूं लागला. तरी असह्य यातनेमुळें त्याना थकवा आला होता.

"मला हा हृद्रोग—" बोलतां बोलतां मास्तर स्तब्ध झाले. त्यांच्या त्या यातना बघून आम्हांला अतिशय दुःख होत होतें.

"मास्तर," माधव त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, "तुमच्या आई-वडिलांना बोलावलं पाहिजे का?"

"नको नको, आतां मीच तिकडे जाणार." मास्तरनीं उदासपणें हास्य केलें.

माधवला आपल्या प्रश्नाबद्दल अतिशय खेद वाटला. झालेल्या चुकीची दुरुस्ती करण्याकरतां त्यानें पुन्हां विचारलें,

"मग तुमच्या सासरीं तार पाठवावी का?"

"माधव, मी या सगळ्या गोष्टींतून मोकळा आहे. अरे, हृद्रोग्याला विवाह, प्रेम वगैरे साऱ्या गोष्टींचा मज्जाव असतो. पाठीमागें

तुमच्याशिवाय कसल्याच गोष्टीसाठीं जीव घुटमळायचा नाहीं. यामुळें मी भूत होणार नाहीं असं वाटतं. पण विनायकाला मीं आश्वासन दिलं आहे."

" विनायक," मास्तर पुढें म्हणाले, " आजची रात्र तूं, माधव आणि अरविंद माझ्या खोलींत बसा. तुम्ही असलांत कीं मला बरं वाटतं. तुम्हाला माहीत आहे John Keats नें मरतांना काय म्हटलं ? तो म्हणाला I see flowers growing upon me (माझ्या अंगावर फुलं फुलतांना मला दिसताहेत. ) तसंच दुसऱ्या एका कवीनें म्हटलं आहे कीं, यावेळीं जर मला शक्ति असती तर मी मरतांना किती बरं वाटतं तें लिहून ठेवलें असतं. खरंच, Oh, Death, where is thy sting ? " (हे मृत्यु, तुझी असह्य टोंचणी कुठं आहे ? )

मास्तरांनीं खिन्नपणें हास्य केलें. त्यांच्या चेहऱ्यावर यत्किंचित्‌ही मानसिक व्यथा दिसत नव्हती.

संध्याकाळ झाल्यामुळें क्रीडागणावर होणारी दंगल बंद होऊन बहुतेक मुलं आपापल्या घरीं गेलीं होतीं.

" It's journey's end. " ( प्रवास संपत आला,) मास्तर खिडकींतून पश्चिम दिशेकडे पहात म्हणाले, " Tomorrow to new island, ( उद्यां नवं राज्य, नवा संसार.) विनायक, माझ्यामागून इथं कोण येईल रे ?"

" मास्तर, " मी त्यांचा सरळ प्रश्न ऐकून दचकून म्हणालों, " मास्तर, तुमच्यासारख्या समंजस माणसानं एकदोन दिवसांच्या आजारानं असं बोलावं का ? " आकाशाकडे पहात ते कसला तरी विचार करीत होते.

" विनायक, I am going. माधव, अरविंद, मी चाललों. "

" हवालदार, डॉक्टरकडे धांव. " मी ओरडलों.

छातींत भयंकर कळ आल्यामुळें मास्तरनीं तोंड अतिशय विचित्र केलं होतं. क्षणार्धांत त्यांचा चेहरा निर्विकार झाला. कांहीं काळ काय प्रकार घडला हें आम्हांला समजलंच नाहीं. आम्ही भिऊन परस्परांच्या मुद्रेकडे साशंक नजरेनें पहात होतों. खरा प्रकार समजूनही त्याचा उच्चार करण्याचें कुणाला धैर्य होईना.

मी, अरविंद व माधव स्फुंदून रडूं लागलों.

एवढ्यांत हेडमास्तर, डॉक्टर व इतर मंडळी जमली.

डॉक्टरनीं कॉटच्या जवळ जाऊन मास्तरांचे डोळे उघडून हात फिरविला व त्यांनीं गंभीरपणें हेडमास्तरांकडे पहात " Gone ! " एवढेच शब्द म्हटले.

हेडमास्तरनीं आमच्या पाठीवर हातानें थोपटून आमचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

सूर्यास्त नुकताच झाला होता.

अगदीं अल्पावधींतच सर्व तयारी झाली. गांवांत बातमी पसरल्यामुळें बहुतेक वरील वर्गांतील सर्व विद्यार्थी जमले होते. अंत्यविधि करून मास्तरांचा देह खाटीवर ठेवला. बरेच विद्यार्थी स्फुंदून रडत होते. आणलेल्या फुलांच्या माळा त्यांच्यावर घातल्यावर हेडमास्तर पुढें आले व त्यांनीं खाटीला हात घातला.

थोड्याच वेळांत आम्ही स्मशानांत पोहोंचलों. यावेळीं अंधार झाला होता, पण मला बिलकुल भीति वाटत नव्हती. मधून मधून कंठ साफ करून त्यांच्या मृत्युसमयाचें वर्णन मी सवंगड्यांना सांगत होतों. मास्तरांच्या एका दोस्त सहाध्यायानें मंत्राग्नि दिला. चिता भडकली. त्या ज्वालांच्या उजेडांत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर खिन्नता व वैराग्य दिसत होतें. कांहीं विद्यार्थ्यांच्या डोळयांतून वहाणारे अश्रु चकमत होते.

एकाएकीं त्या रात्रीच्या मास्तरांच्या भाषणाची मला आठवण झाली. भूतपिशाचांच्या गोष्टी आठवून मीं भीतीनें सभोंवार नजर टाकली-पण कुठेंच कांहीं नव्हतें. वाऱ्यामुळें भडकणाऱ्या अग्नीचा झोत सारखा भरभरत होता. इतक्यांत मोक्ष झाला. माझ्या हृदयांत चर्र झालें. मीं अरविंदकडे पाहिलें. त्याच्या चेहऱ्यावर दारुण निराशा दिसत होती. दोघांच्याही डोळयांत अश्रु उभे राहिले.

हेडमास्तर उठले. इतर सर्व मंडळी उठली. एकवेळ त्या उन्मादानें उसळणाऱ्या अग्नीला हात जोडून आम्ही निघालों. स्मशानांतील काळ्याकुट्ट उंच वृक्षावर एकसारखा प्रकाश झगझगत होता.

रात्रीं अकरा वाजण्याचा सुमार होता. वसतिगृहांत मुलांच्या सोबतीस पंडित मास्तर होते. अरविंद, माधव व मी एकमेकांच्या सोबतीनें

एका खोलींत कॉटवर पडलों होतों. टेबलावर बारीक करून ठेवलेला दिवा जळत होता. इतक्यांत दारावर कुणीतरी ठोठावीत असल्याचा आवाज झाला. चटकन् आम्ही कॉटवर उठून बसलों.

" कोण ? " अरविंद दाराकडे तीक्ष्ण नजरेनें पहात म्हणाला.

" मी " एवढेच शब्द ऐकूं आले. मास्तरांचाच तो आवाज असावा असें वाटून आम्हीं एकमेकांकडे भीतिप्रद दृष्टीनें पाहिलें.

माधव माझ्याजवळ येऊन मोठ्या धीरानें पुन्हा म्हणाला,

" नांव काय ? "

" पंडित मास्तर. "

हे शब्द ऐकतांच कोंडून धरलेला श्वास सोडून आम्हीं दार उघडलें. " अरे, बाहेर झिमझिम पाऊस लागतो आहे. कदाचित् चिता विझली असेल. पाहून येऊं. येतां का ? " पंडित मास्तर म्हणाले.

केवळ कर्तव्य म्हणूनच आम्हीं होकार दिला. आमच्या चेहऱ्यावरील भीति पाहून मास्तर पुढें म्हणाले, " बरोबर शिपाई दिवा घेऊन येतोच आहे. मग चला तर. तसं असलं तर मग आणखी लाकडांची व्यवस्था केली पाहिजे. "

आम्हीं खोलींतून बाहेर पडलों.

आकाश काळ्याकुट्ट ढगानें व्यापल्यामुळें सर्वत्र अगदीं गडद अंधार होता. पाऊस अगदीं बारीक लागत होता. रानकिडे सारखे किरकिरत होते. शेतांतून बेडुकही डुरकत होते. मधूनच वीज चमकली म्हणजे समोरच्या वृक्षांच्या भीषण आकृति अगदीं जवळ समोर उभ्या आहेत असाच भास होत होता.

इतक्यांत चिंचेच्या झाडावरून घुबडाचा 'घू घू' असा शब्द सुरू झाला. माझी छाती धडधडूं लागली. मी त्या भयाण शांततेचा भंग करण्याकरतां त्या रात्रीची गोष्ट सांगत होतों. एवढ्यांत दिवा भगभगून एकदम विझला. माधवनें व अरविंदनें माझ्या खांद्यावर हात ठेवला.

"काड्यांची पेटी आहे ना ? दिवा पेटव." मास्तर शिपायास म्हणाले.

"नाहीं साहेब. बरोबर पेटी घेतली नाहीं." शिपाई शरमून म्हणाला.

मास्तरांच्या हातांत असलेला मंद जळणारा टॉर्च तेवढाच आमचा मार्गदर्शक राहिला. मोठ्या धीरानें मनाला धैर्याचा धडा शिकवीत आम्ही चाललों होतों. माडाच्या झापांतून पावसाचें पाणी टपटप करीत खालीं पडत असतांना होणारा आवाज मोठ्यानें ऐकूं येत होता.

स्मशानभूमींतील उंच सुरू वृक्ष दिसतांच माझी छाती अधिकच धडधडूं लागली.

इतक्यांत अरविंदानें एकदम दचकून मला मागें ओढलें. पुढें चालणारा शिपाईही तेथल्या तेथें उभा राहिला. तें दृश्य पाहून माधवाची तर बोबडी वळली व तो मटकन् खालीं पडला. मी ओरडून पळालों असतों, पण मास्तरनीं आम्हां दोघांसही घट्ट जवळ धरलें. शिपाई मात्र एक एक पाऊल हळुहळु टाकून पुढें सरकत होता. मास्तरांच्या चितेभोंवतीं एक **शुभ्र** वस्त्र परिधान केलेली स्त्री प्रदक्षिणा घालीत होती. मधूनच ती जळणारें लाकूड काढून पुन्हा आंत टाकीत होती. सिताराम अगदीं जवळ पोंहचला. माझे हातपाय सारखे थरथरत होते. चितेच्या कमीजास्त होणाऱ्या उजेडांत ती व्यक्ति भयानक वाटत होती. सिताराम हलका हलका पुढें होऊन चटकन् त्यानें त्या व्यक्तीचा हात पकडला. अरविंदानें किंकाळी फोडली.

सिताराम ओरडून म्हणाला, "साहेब, ही गांवांतली चंद्रा वेडी. हिनें असं पुष्कळांना घाबरवलं आहे."

मास्तरनीं आम्हांला गदगदां हलवून म्हटलं,

"घाबरूं नका. तुमच्या दारावर येणारी वेडी ती!"

मी आणि अरविंद विकारशून्य दृष्टीनें एकमेकांकडे पहात होतों.

# ‘ गौरी कीं गोहर ? ’

“ कारटे, काय केलंस हें ? अब्रूला व कुळाला काळोखी कीं ग फांसलीस ! ह्याहून जन्माला आली नसतीस तर काय वाईट होतं ? आतां त्यांना मी काय सांगूं ? तुला आणि मला खाऊन टाकतील कीं ग सटवे ! कुठची दुर्बुद्धि तुला आठवली ही ? कुठचा राक्षस तुला मिळाला हा ? चांडाळणी वैर साधलंस - कीं ग ! ” याप्रमाणें उमाकाकू मोठमोठ्यानें ओरडत होत्या. त्यांचा चेहरा लाल व घामाघूम होऊन डोळ्यांवाटे सारखे अश्रु चालले होते. बिछान्यावर पडून त्यांची कन्या मोठमोठ्यानें हुंदके देऊन रडत होती. मधून मधून उमाकाकूंनीं लाथेनें हांसडून जोरानें तिचे गालगुच्चे घेण्याचा सपाटा चालविला होता.

“ देवळांतून आतां येतील आणि तुझं नी माझं करतील सारखं ! लोक थुंकतील कीं ग आपल्या तोंडावर ! जळलं तुझं तोंड तें ! दावेदारिणी, काय म्हणून केलंस हें ? कोण हा मेला तुझ्या वांट्याला आला ? आग लागो तुझ्या तोंडाला ती ! ” गौरी हुंदके देत सारखी रडतच होती. तिच्या बाजूला लहानशी समई मंदपणें जळत होती. जमिनीवर पसरलेल्या लहानशा चटईवर उपडी पडून ती मोठ्यानें रडत होती. पाठीवरील पदर अस्ताव्यस्त झाल्यामुळें तिचा बांधेसूद देह व गौर कान्ति त्या मंद प्रकाशांत विशेषच तेजस्वी दिसत होती. तिचे भरगच्च काळेभोर केस चोळीवर रुळत होते. हातांत एखादीच कारल्याची बांगडी होती. उघड्या पडलेल्या गळ्यांत कसला दागिनाही दिसत नव्हता. प्रत्येक हुंदक्याबरोबर तिचें सर्व शरीर सारखें हालत होतें.

ह्या वेळीं रात्रीचे दहा वाजून गेले होते. विश्वेश्वरभटजी कैलासनाथाच्या देवळांत कीर्तनाकरतां गेले होते. उमाकाकूंनीं स्वयंपाक करून तो झांकून ठेवून त्या गौरीला हांसडीत होत्या. दुसऱ्या खणांत चिमकुला दामू स्वस्थ झोंपी गेला होता. बराच वेळ शिव्याशाप देऊन झाल्यावर उमा-

काकूसुद्धां कोनांत बसून रडूं लागला. इतक्यांत बाहेर पाय वाजल्यामुळें विश्वेश्वरभटजी आले हें ओळखून त्या पदरानें नाक पुशीत उभ्या राहिल्या. विश्वेश्वरभटजींनीं पंचपात्रींतील पाणी ओतून त्यांत पाय ओले केले व तोंडानें 'रामकृष्ण, कृष्ण कृष्ण,' असा जप करीत ते आंत आले. डोकीवरचा रुमाल व उघड्या अंगावर गुंडाळलेलें उपरणें खुंटीवर ठेवून "जयदेवा महाराजा!" म्हणत ते आंत गेले. गौरी आवाज बाहेर न फुटूं देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती; परंतु तिला एकदम हुंदका आला. भटजींना कांहींच प्रकार कळेना. कांहीं काल पत्नीकडे व कांहीं काल कन्येकडे पाहात ते उभे राहिले.

"काय झालं ग गौरीचं?"

गौरीनें पूर्ववत् हुंदके देऊन मोठ्यानें रडण्यास प्रारंभ केला.

"काय सांगणार ती? म्हणूनच मी तुम्हाला म्हणत होतें, कीं त्या धोंड्याला सोंगट्या खेळायला बोलवूं नका म्हणून. पण मी–" रमाकाकूंना पुढें बोलवेना.

"अग होय. पण काय झालं, तें तरी समजूं दे मला. असं अकांड-तांडव करण्याएवढालं काय झालं तें सांगशील कीं नाहीं?" विश्वेश्वरभटजी जास्तच गोंधळून म्हणाले.

"काय सांगणार आणि काय बोलणार मेलं? कर्मदशा, दुसर काय? म्हणूनच मी पाठीं लागलें नी पोरीचं लग्न करून घेतलं; पण देवाच्या मनांतच होतं, नाहीं तर सहा महिन्यांच्या आंतच तिचं कपाळ फुटावं कसं? कारटी शेवटीं घातकी झालीच! कैदाशिणीनं दावा साधला! घरादाराची अब्रू चवाठ्यावर आणलीन् मेलीनं!"

"काय ग गौरी, काय झालं? अग, स्पष्ट काय तें समजूं दे तर खरं!" भटजी त्रासिक स्वरांत जरा मोठयानें म्हणाले.

"ती पोर काय सांगणार? पोरीला कांहीं महिने गेले आहेत!" काकूंनीं डोळ्याला पदर लावला.

काकूंचें हें वाक्य ऐकतांच भटजींना अकस्मात् विजेचा जोरानें धक्का बसावा तसें झालें व त्यांचा मेंदू कांहीं वेळ सुन्न झाला. त्यांना

अत्यंत क्रोध येऊन काय करावें हेंच सुचेना. झटकन् बाहेरच्या खणांतील वेताची कांटी घेऊन ते परत आले व शक्य तितक्या जोरानें त्यांनीं फटाफट् दोनचार छड्या तिच्या उघड्या पाठीवर ओढल्या. गौरीनें ' अयो देवारे ! मेलें ! देवा, नको नकोऽबाबा, नका हो ! पाया पडतें. मेलें हो मी ! ' अशी किंकाळी फोडली व कळवळल्यामुळें अंथरुणावर बसून ती दोन्ही हात पुढें करून काठीपासून आपला बचाव करण्याचा प्रयत्न करूं लागली. विश्वेश्वरभटजींनीं जमदग्नीचा अवतार धारण केला होता. त्यांचा चेहरा एकदम लाल झाला होता. रागानें थरथर कांपत ते ओरडले, " चांडाळणी ! जन्माला कशाला आलीस ? "

त्यांनीं पुन्हा मारण्यासाठीं काठी उगारली.

" बाबा, नको हो ! पायां पडतें. मेलें रे देवा ! " पाठीवर फुटलेल्या वळांवरून हात चोळीत ती रडूं लागली.

" मेलीस तर काय हरकत आहे ? असली कारटी पोर हवी तरी कशाला ? " भटजी एकदम ओरडले. उमाकाकू दुसऱ्या खणांत जाऊन कपाळावर हात घेऊन रडत बसल्या होत्या. भटजी रागानें विव्हळत पडलेल्या गौरीला काठीनें ढोंगशीत म्हणाले, " चल, ऊठ, आत्तां घरांतून चालती हो ! तुला घरांत ठेवणं म्हणजे कलंक लावून घेण्यासारखं आहे. अगोदर हें पातळ घे, उचल ! आजपासून तुझं माझं नातं संपलं. तुझ्या सुवेरसुतकांतून कायमचा मुक्त झालों. कारटे, ब्राह्मणाच्या पोटीं कशाला तुला जन्माला घातली देवानं ? तूं घरांतून बाहेर होईपर्यंत मी आंवढासुद्धां गिळणार नाहीं. हो बाहेर अगोदर. "

" बाबा, नका हो मला टाकूं ! " आपला सुंदर पण कृश चेहरा वर करीत ती काकुळतीनें म्हणाली.

" कारटे, आतां काय करायचं राहिलं ? तुला घरांत ठेवणं आतां शक्य नाहीं. वाटेल तिथं चालती हो. तुझीं आईबापं मेलीं असं समज आणि हो चालती ! जगांतील प्रकारावर टीका करतां करतां आम्हांलाच आतां मान खालीं घालायची पाळी आली. चल, हो बाहेर; उगाच उशीर करूं नकोस. निघ. ऊठ. "

भटजी काठीनें तिला ढकलीतच होते. दोन्ही हात गालांवर घेऊन ती काकुळतीनें आपल्या वडलांकडे पाहात अश्रू गाळीत होती. पण विश्वेश्वर-भटजींचा क्रोधाग्नि एक क्षणही त्यांच्या हृदयाला ओलावा येऊं देत नव्हता.

दाराच्या बाहेर काठीनें ढकलून धाडकन् भटजींनीं दार लाविलें व कोयंडा घालून ते स्वैंपाकघरांत गेले व आंत पत्नीवर उसळले !

" तूं इतके दिवस काय करीत होतीस ? मला त्यांचं असं वर्तन होतं हें तावडतोब कां सांगितलं नाहींस ?"

" मी काय सांगणार ? आपणच धोंड्याला सोंगट्यागंजीफानं खेळायला बसवून रात्रीं बारा बारा वाजेपर्यंत खेळत होतां व मग ' आतां एवढ्या उशिरां तुला दार कोण उघडणार ? ' असं सांगून तुम्हीच त्याला ठेवून घेत होतां, त्याला मी काय करणार ?" उमाकाकू पुन्हा स्फुंदून रडूं लागल्या. डोळ्यांचा पदर मधून मधून बाजूला करून त्या हुंदके देत धोंड्याला लाखोली वाहतच होत्या. भटजींनीं पुढल्या खणांत आपली पथारी सोडून अंग टाकलें. उमाकाकू हलक्याच दारामागें राहून म्हणाल्या, " गौरीला आंत घ्यायची नाहीं का ?"

" हेंच तें तुम्हा बायकांचं नडतं. जाईल मरत कुठं तरी धर्मशाळेंत." चटकन् उठून भटजी ओरडले.

" मी कुठं नाहीं म्हणतें आहे ? पण पोरीच्या पोटांत कांहीं नाहीं." उमाकाकू घसा साफ करीत म्हणाल्या.

" आणि तडफडून मेली तर काय बिघडलं ? कांहीं हरकत नाहीं ! कुठं जाणार ? येईल उद्यां परत भीक मागत. कुठं जाणार, जीव द्यायला ? दार कांहीं झालं तरी उघडायचं नाहीं. उद्यां पाहूं काय होतं तें." भटजी कठोर स्वरांत म्हणाले.

उमाकाकू, जास्त कांहीं बोलण्यांत अर्थ नाहीं असें पाहून आंत निघून गेल्या. थोड्याच वेळांत भटजींनीं दिवा काढला व ते झोंपी गेले.

ह्या वेळीं अकरा सव्वाअकरांचा सुमार झाला होता. शहरांतील बहुतेक गडबड बंद होऊन सर्वत्र सामसूम झालें होतें. गाडी—घोड्यांचाही

मुळसुळाट जवळ जवळ बंद झालाच होता. दुकानें बंद होत असल्यामुळें रस्त्यावर काळोख होऊं लागला. आकाशांत ढग येऊन पावसाचींही चिन्हें दिसूं लागलीं. चंद्र अस्तास जावयाची वेळ होत आल्यामुळें म्युनिसिपालिटीचा शिपाई दिवे पेटवून जात होता. मधूनच झपझप पावलांनीं जाणारा चुकारू पान्थस्थ बाहेर यावेळीं ही बाई कोण, याचा विशेष विचार न करतां आपली गति कमी करून न्याहाळून पाहत पुढें जात होता.

आशा आंधळी आहे. गौरी सोळासतरा वर्षांची अजाण पोर. आपले वडील आपल्याला घरांत घेतील, ही आशा तिला वाटत होती. आपल्या वडिलांचें हृदय तिला बरोबर समजलें नव्हतें. ती दाराशीं उभी राहून अंगावर फुटलेले काटीचे वळ चोळीत अजूनही रडत होती.

ह्या वेळीं रस्त्याच्या कोनावर असलेला फळवाला कासीम आपलें दुकान बंद करीत होता. त्याचें लक्ष जातांच अशा धोक्याच्या वेळीं अशी बाहेर ही बाई कोण, हा विचार त्याच्या मनांत येऊन दाराच्या फळ्या लावण्याचें काम थांबवून तो तीक्ष्ण नजरेनें तिच्याकडे पाहूं लागला. कांहीं वेळानें लोकांची रहदारी पूर्णपणें थांबली. कासीमनें दाराला शेवटची फळी लावून कडी घातली व तो हलके हलके पुढें गेला. गौरी घाबरून किंचित् मागें सरकली. कासीम हलकेंच पुढें होऊन सभ्यपणें म्हणाला, " बाई, घाबरूं नका. तुम्ही कुठच्या ? " गौरीनें दाराकडे पाहिलें.

" काय, भटजींची मुलगी का तुम्ही ? अरेरे ! भटजींनीं ह्या वेळीं तुम्हांला असं बाहेर घालवण्याचं कारण तरी काय ? " कासीम आश्चर्यानें व कळकळीनें म्हणाला.

गौरीला थोडा धीर आला. परंतु ती कांहीं न बोलतां रडूं लागली. कासीमनें गौरीच्या हकालपट्टीविषयीं बरोबर तर्क केला. तो पुढें होऊन म्हणाला, " बाई, तुम्ही बिलकूल भिऊं नका. इथं तुम्ही किती वेळ राहणार ? तुमचा बाप आतां तुम्हांला आंत घेईलसं दिसत नाहीं. वाटेंत चोर व वाईट लोक असतात. खरंच तुमच्यासारख्या बाईनं ह्या वेळीं इथं राहणं अगदीं धोक्याचं आहे. तुम्ही कोणत्या तरी धर्मशाळेंत गेला असतां तर चांगलं होतं; पण तशी सोय जवळ कुठं आहे ? आणि तिथंही

लुच्चे–लफंगे लोक असायचेच ! बाई, मी तुम्हांला सांगू कां ? यापेक्षां तुम्ही माझ्या घरीं चला ना ! चला, माझी बायको तिथं आहे; मला तुम्ही ओळखत नाहीं का ? माझ्या दुकानावर एवढं गिऱ्हाईक येतं पण मी कधीं तरी भांडलों आहे का ? माझं घर मोटं आहे. तिथं तुम्हाला एक-टीला एक खोली देतों. तिथें तुम्ही आजची रात्र काढा. हीं फळें खा. तुम्ही स्वस्थ झोंपा. कांहीं घाबरूं नका. माझ्यावर विश्वास ठेवा. ”

तो कासीम अतिशय आर्जवानें बोलत होता. तो पंचवीस–सव्वीस वर्षांचा सशक्त उमदा तरुण होता. त्याला कपडे वगैरे स्वच्छ ठेवून ऐट करण्याची आवड होती. त्याचा आवाज गोड व स्वभाव थंड वाटत असल्यामुळेंच गिऱ्हाईक पटकन् त्याच्याकडे वळत असे. ह्या वेळीं त्याच्या आवाजांत सभ्यपणा व कळकळच दिसली. गौरीनें रात्रीं दुकान बंद करून आनंदानें शीळ घालीत जातांना कासीमला वारंवार पाहिलें होतें. यामुळें तिला त्याची मुळींच भीति वाटली नाहीं. उपवासाच्या दिवशीं तिनेंही त्याच्याकडून पुष्कळवेळां फळें विकत घेतलीं होतीं. तिला कासीमच्या बोलण्यांत सत्यता वाटूं लागली. आपणास वडिलांनीं दयामाया कांहीं एक न दाखवितां हाणून मारून घालविली; अशा वडलांची आपण तरी किंमत कां बाळगावी ? आपण ह्या वेळीं कुटें जावें हाही विचार तिच्या मनांत आला.

रात्र होऊं लागली तसतसें कुत्र्यांचें भेसूर ओरडणें अंधकाराला भयाण स्वरूप प्राप्त करून देऊं लागलें होतें. आजूबाजूच्या झाडींत रान-किडे किरकिरत होते. कासीमनें तिच्या मनांत चाललेली चलबिचल ओळखूनच कीं काय पुन्हा निश्चयी स्वरांत म्हटलें,

“ बाई, खुदाची शपथ घेऊन सांगतों, कीं आपल्याला कांहीं एक भीति नाहीं. कट्टा मुसलमान कधींच खोटं बोलायचा नाहीं. ”

तरी पण गौरी निश्चलच होती. मात्र कासीमकडे तिनें एकवेळ पाहिलें; पण त्याच्या चेहऱ्यावर तिला कसलाच दुष्ट हेतु दिसला नाहीं.

“ बाई, पाऊस येतो आहे. कसला विचार करतां ? इथं राहाल तर खास घात होईल. ” कासीम अगदीं आर्जवानें म्हणाला.

जवळून गाडी चालली होती.

" ए गाडीवाला, इदर आव." कासीम हातानें खुणावीत गाडीवाल्यास ओरडला.

" वैठो भय्या !"

" खाजणवाडी मे. वोलो."

" आठ आना, चलो." लगाम खेचित गाडीवाला म्हणाला.

" नै, चार आना."

कासीमनें चार वोटें दाखवीत उत्तर केलें.

" अच्छा, चलो !" गाडीवाला चाबुक हातांत घेत म्हणाला.

" चला बाई, वसा. मी येतों पायींच." कासीम सभ्यपणें विनवीत म्हणाला.

गौरीला काय करावें हेंच सुचेना. ती रडतगोंधळत उभी राहिली. कासीमकडे ती भेदरलेल्या नजरेनें पहात होती. मनांत अतिशय कालवाकालव होऊन आपण काय करीत आहों हेंच तिला समजेना.

" हं, वसा ना आंत" कासीम गाडीचें दार उघडून धरीत म्हणाला.

गौरीला कांहींच समजेना. गाडीच्या दाराशीं येऊन तिनें कासीमकडे न्याहाळून पाहिलें, पण कासीम निर्विकार दृष्टीनें आंत पाहात होता.

" हं, काय ?" गौरी गोंधळून आडखळत हलक्या आवाजांत पुटपुटली. तिचें हृदय सारखें धडधडत होतें.

" चला, वसा लवकर. पाऊस येतो आहे."

त्या एका क्षणांतच गौरीच्या विचारशक्तीनें दगा दिला व ती एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें गाडींत शिरली. आपण कांहींतरीच करतों आहों असें वाटून तिला पुन्हां खालीं उतरावें असें वाटलें; पण एवढ्यांत कासीमनें दार लावून घेतलें व आपल्याशींच समाधानानें मंद स्मित करीत तो चालूं लागला. थोडा वेळ गाडीबरोबर चालल्यावर तो हलकेच हांकविणाऱ्याच्या बाजूला चढून बसला. विचारातिरेकामुळें गौरीला ग्लानी आली होती. खडबडीत रस्त्यानें गाडी चालल्यामुळें धक्के मिळाल्यामुळेंच

कीं काय गौरीची विवेकबुद्धि जागृत झाली असावी, आपण कांहींतरीच केलें असें आतां तिला वाटलें. तिनें कासीमला हांका मारल्या, परंतु गाडीच्या खडखडाटांत व बैलांच्या गळ्यांतील घुंगुरांच्या आवाजांत तो आवाज कासीमनें न ऐकल्याचें ढोंग केलें. गौरीनें गाडींतून निघतांना घराकडे पाहिलें, पण तिला दार गच्च बंद असल्याचें त्या काळोखांत अस्पष्ट दिसलें. ती गाडींत हुंदके देऊन रडतच होती.

खाजणवाडींतील एका लहानशा गल्लींत गौरी कासीमच्या पाठीमागून शिरली. कासीमनें घरांत जाऊन तिला आंत बोलाविलें व पुढची खोली उघडून देऊन त्यानें फळाची पिशवी तिच्या पुढ्यांत ठेवली. कासीमची बायको अकरा वाजून गेले तरी स्वयंपाकच करीत होती. लहान लहान दोनतीन मुलें अव्यवस्थितपणें जमिनीवर लोळत पडलीं होतीं. दिव्याच्या हंडीवर काजळी सांचल्यामुळें त्यांतून स्वच्छ प्रकाश येत नव्हता. घराच्या वाश्यांवर कोळ्याचीं जाळीं लोंबकळत होतीं. घरांत जिकडे तिकडे कपडे व सामान अव्यवस्थित पडलें होतें. कासीमला आलेला पाहतांच त्याच्या बायकोनें तोंडावर जरासा बुरखा ओढला; व कांहीं वेळानें एका बशींत अन्न वाढून तें चटईवर ठेविलें. गौरीला एक चटई देऊन कासीम म्हणाला, “ बाई, तुम्ही स्वस्थ झोंपा बरं, कडी घालून ही मेणबत्ती व काड्यांची पेटी घ्या. कांहीं काळजी करूं नका. हें आपलंच घर आहे.”

कासीमचे केवढे हे उपकार असे विचार तिच्या मनांत येत होते. पण तिनें हलकेच उठून दाराच्या दोन्ही कड्या घातल्या व ती झालेला प्रकार आठवून पुन्हा रडूं लागली. परंतु अगोदरच फार थकल्यामुळें ती कांहीं वेळानें झोंपी गेली.

सकाळीं कासीमनें तिला शेगडी, कोळसे, भांडीं व धान्य वगैरे सामान आणून दिलें. आतां गौरीला आपण पूर्णपणें परतंत्र झाल्याची जाणीव झाली. तिला कांहींच मार्ग सुचेना. कासीमनें आणून दिलेल्या धान्यावर तिनें त्या दिवशींचें जेवण केलें. कासीमच्या बायकोला आपल्या नवऱ्यानें दुसरी बाई घरांत आणावी हें पसंत न पडतां ती धुसफुसूं लागली. परंतु त्यानें गौरीला कोणत्याही प्रकारचा त्रास न देण्याबद्दल सक्तपणें

बजावल्यामुळें तिला कांहींच करतां येईना. एवढेंच नव्हे तर एक वेळ ज्या वेळीं ती कासीमशीं भांडूं लागली तेव्हां त्यानें तिला बराच मार दिला. गौरीला ही गोष्ट आवडली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळींच ती कासीमला म्हणाली, “ कासीम, तुम्ही माझ्यावर अगणित उपकार केले आहेत; पण तुम्हां नवराबायकोंत असं वितुष्ट येण्यापेक्षां मी कुठंतरी हिंदूकडे नोकरी करून पोट भरीन. मेहरबानी करून माझ्याकरितां नोकरी पाहा कुठें तरी. ”

“ गवराबाई, गांवांत हिंदूंच्या घरीं तुम्हांला नोकरी मिळणं शक्य नाहीं. तुम्ही मुसलमान झालां आहांत, असा लोकांचा समज झाला आहे. माझी बायको तसलीच आहे. तिची फिकीर तुम्ही करूं नका. तिच्याबद्दल तुम्हांला घाबरण्याचं कारण नाहीं. ”

“ पण मी मुसलमान झालें नाहीं. ” गौरी घाबरून एकदम ओरडली.

“ छे, छे, तुम्ही हिंदुच आहांत. ” कासीम हंसत म्हणाला, “ पण तुमचे लोक तुम्हाला हिंदु म्हणायला तयार नाहींत. ”

“ अहो कासीम, मला आईला भेटावं असं वाटतं.” आइची मूर्ति डोळ्यांपुढें दिसत असल्याप्रमाणें अन्तराळींच पाहात ती काकुळतीनें म्हणाली.

कासीमनें मोठ्यानें हास्य केलें व तो म्हणाला, “ गवरबाई, हिंदूंच्या आवाठांत जाणं धोक्याचं आहे. तुम्हाला व मला मारण्याला पुष्कळ लोक टपले आहेत. ”

गौरीला कसेंचसें वाटलें. ‘ आपण काय केलें हें ? यापेक्षां विहिरींत जीव दिला असता तर ? आज मी हिंदू असून लोक मला मुसलमान म्हणतात. आई–बाबा–कुणालाही खरें वाटायचें नाहीं का हें ? ’ अशा विचारांनीं गोंधळून जाऊन एकदम ती ढळढळा रडूं लागली.

एके दिवशीं कासीमची बायको आपला नवरा गौरीकडे जास्त लक्ष पुरवितो, हें पाहून घरांतून निघून गेली. ही संधि तो पहातच होता. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं तो लवकर दुकानांतून आला व स्वयंपाक

करूं लागला. गौरी त्याची चाललेली धडपड पाहून म्हणाली, “कासीम, मी जेवण करतेंच आहे. तुमच्याकरतां पण मीच करीन.”

कासीमला आज नवीनच सूचना करावयाची होती. तो हलकेच आपल्या आवाजांत मृदुपणा आणून म्हणाला, “गवराबाई, तुमचा द्वेष वाटून माझी बायको गेली व माझं लहान मूल असं उघडं पडलं. तुम्हांला मी आवडतों, तुमच्या मुलाचें पण पालन करणारा कुणी हवा ना? मग माझ्याशीं तुम्ही लग्न केलंत तर? तुमच्या होणाऱ्या मुलाचा मग माझ्या पैशांवर हक्क पोहोंचेल.”

“कासीम!” ती एकदम दचकून ओरडली.

“गवरबाय,” कासीम शांतपणें म्हणाला, “तुम्हाला तुमचे लोक मुसलमान समजतात. तुम्हाला माझ्याशिवाय कोणाचा आधार आहे? मी इतके दिवस तुम्हाला सांभाळलं, ते माझे उपकार तुम्ही फेडणार नाहीं काय?”

गौरीचे डोळे पाण्यानें भरून आले. “कासीम! कासीम!” एवढें बोलून दोन्हीं बाहूंनीं तिनें तोंड झांकलें व भिंतीला टेकून ती रडूं लागली. कासीमनें हलकेंच पुढें होऊन तिच्या पाठीवर हात ठेवून दुसरा हात आपल्या हातांत घेतला. गौरीचें अंग प्रथम थरथरलें; पण तिनें त्याचा हात तसाच राहूं दिला. कासीमनें विजयाच्या आनंदानें आवाज न फुटूं देतां मनसोक्त हास्य केलें व तो तिच्या पाठीवरून हात फिरवूं लागला.

यानंतर चार दिवसांतच कासीमनें मशिदींत जाऊन आपला विवाह लावून घेतला. त्यानें गौरीचें नांव बदलून तो तिला गोहर म्हणूं लागला व त्यानें हिंदु पद्धतीचा पोषाख सोडून मुसलमानी पद्धतीनें नेसण्याचा तिला हुकूम केला. यापुढें थोड्याच दिवसांत गौरीला मुलगा झाला. परंतु कासीम त्याच्याकडे लक्षच देईना. उलट लग्नाच्या वेळीं घातलेले दागिने तो एक एक, या महिन्यास दुकानांत तोटा आला वगैरे निमित्त करून घेऊन जाऊं लागला. एके दिवशीं कासीम बराच चिडला होता. गौरी

लहान मुलाला पाळण्यांत झोंपवून स्वयंपाक करीत होती. इतक्यात त्यानें हाक मारली.

" गोहर ! "

गौरी घाईनें उठून गेली. तों कासीम तिची पेटी विसकटीत होता. त्यानें ट्रंकेंतून श्रीकृष्णाची चिमुकली पितळेची मूर्ति हातांत धरून तिला प्रश्न केला, " गोहर, तूं हिंदु आहेस कीं मुसलमान ? " त्यानें खिडकींतून ती मूर्ति लांब भिरकाविली. गौरीनें डोळे मिटून छातीवर हात घेतले. तिच्या दाटलेल्या कंठांतून कसेबसे शब्द आले, " मी मुसलमान झालें असलें, तरी त्या देवाची प्रार्थना करायला काय हरकत आहे ? "

कासीमनें क्रोधानें तिच्याकडे पाहिलें.

" गोहर, हे पांच रुपये कशाला ठेवले आहेस ? " ट्रंकेंतून नोट काढीत कासीमनें पुन्हा प्रश्न केला.

गौरी घाबरून गेली. कासीमन आपल्या तुमानीच्या खिशांत ती नोट घातली व दुकानची वाट धरली.

कांहीं कालानें कासीम आपल्यावर प्रेम करीत नाहीं व आपल्या मुलाचा त्याला राग येतो, एवढेंच नव्हे तर तो आपल्या पहिल्या बायकोच्या मुलालाच नवीन कपडे आणतो ही गोष्ट गौरीला कळून चुकली. एके दिवशीं तिला फार ताप आला व डोकें दुखूं लागलें; तेव्हां तिनें एखादा डॉक्टर आणावयास सांगितलें; पण कासीमनें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

गौरी आतां निमूटपणें दुःख सहन करीत होती. कासीमनें आपल्याला टाकलें तर आपली स्थिति काय होईल, हा विचार ती करीत असे व कांहींच मार्ग सुचेनासा झाल्यावर ती पुन्हा रडत असे. तिच्या बाळाची योग्य ती शुश्रूषा करायला कोणी नाहीं, यामुळें दिवसेंदिवस तो अशक्त होत जाऊन एके दिवशीं अतिसारानें मरण पावला. पण कासीमला यामुळें यत्किंचितूही दुःख वाटलें नाहीं. पण गौरीला आतां दाही दिशा उघड्या पडल्या. साधारण तिचा स्थूल देह दिनसेंदिवस कृश होऊन ती अगदीं निस्तेज

दिसूं लागली. पण कासीमचें तिच्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. त्याच्या दुकानावर हिंदूची मुलगी पळविली, या बातमीनें हिंदु गिऱ्हाईक कमी झालें व त्याला तोटा होऊं लागला. अर्थात्‌च कासीम दुकानांतील राग घरीं गौरीवर काढून मधून मधून तिला मारूंही लागला.

कांहीं दिवस गेल्यानंतरची गोष्ट. पांचव्या दिवशींचें गणपतिविसर्जन व्हावयाचें होतें. गौरीला दारावरून जाणारा एखादा गणपति दिसतांच ती हात जोडून मनःपूर्वक ईश्वराकडे दयेची याचना करीत होती. आपल्या लांब जाणाऱ्या बालकाकडे आई ज्याप्रमाणें लांब अन्तरापर्यंत साश्रु नयनांनीं पाहात असते, त्याप्रमाणें गौरी रस्त्यावरून जाणाऱ्या श्रीगजाननाच्या मूर्तीकडे सारखी पाहत राहत होती. “ देवा ! मला क्षमा कर. ” एवढेच उद्गार आकाशाकडे पाहून काढीत ती रडूं लागे. त्या संध्याकाळीं कासीम घरांतील सामानांतून एक सोटा काढून साफ करूं लागला.

ह्या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर राक्षसी वृत्ति स्पष्ट दिसत होती. तो उठला व हंसत जाऊन गौरीचे दोन्ही खांदे आपल्या रांकट हातांनीं जोरानें पकडून तिला हांसडीत पण हंसत म्हणाला, “ प्यारी गोहर, हा सोटा पाहिलास का ? आज ह्या सोट्याचें काम आहे. आज तुझ्याकरतां व अबदुलकरतां दोन गणपति घेऊन येईन बरं. ”

खुंटीवरील तांबडी टोपी हातांत घेऊन कासीम तिचा गोंडा साफ करूं लागला. गौरी पलंगावर पडून ओक्साबोक्सीं रडूं लागली. कासीमनें सुरा आपल्या कमरेजवळ पट्ट्यांत दडविला व दांडा घेऊन दार लोटून तो बाहेर पडला. गांवांत आज कांहीं तरी दंगा होईल अशी भीति वाटतच होती. अखेर लोखंडी पुलाच्याजवळच मिरवणुकीवर मुसलमान गुंडांनीं हल्ला केला.

संध्याकाळच्या वेळीं कासीम कांहींशा छिन्नविच्छिन्न झालेल्या दोन मूर्ति घेऊन घरांत आला व मोठ्या आनंदानें त्यानें त्या गौरीच्या पुढ्यांत ठेवल्या. गौरीला तो किळसवाणा प्रकार पाहतांच मूर्छा आली. कांहीं वेळानें सावध होऊन ती पाहते तों कासीमनें आपल्या हातांतून येणारें रक्त मूर्तीच्या तोंडाला पुसलें होतें.

गौरी पाण्यानें भरलेल्या डोळ्यांनीं कासीमच्या राक्षसी नजरेकडे टक लावून पहात होती; परंतु तो आपले पान खाऊन लाल झालेले दांत विचकीत हंसतच होता. थोड्या वेळानें घरांत असलेलें कांहीं अन्न खाऊन तो म्हणाला, "गोहर, आज रात्रीं मी येणार नाहीं."

कासीम दांडा घेऊन पुन्हा जोरानें निघाला. गौरीला त्याच्या कृत्याचें भयंकर भय वाटूं लागलें. श्रीगजाननाच्या त्या छिन्नविच्छिन्न मूर्तीना ती डोळ्यांतील शुद्धाश्रूंनीं अभिषेक करूं लागली. टकटक डोळे लावून ती मूर्तीमध्यें गजाननाचें अधिष्ठान करीत होती. आपल्या सुंदर नाजुक कृश हातांनीं मूर्तीच्या छिन्नविच्छिन्न भागावर ती जणूं काय जखमाच असाव्या अशाप्रमाणें हलके हलके स्पर्श करीत होती. रडून झाल्यावर घसा साफ करून शेवटीं तिनें हात जोडले व कांहीं काल डोळे मिटून पुन्हा उघडल्यावर ती दाटलेल्या कंठानें म्हणाली, "देवा ! मी पापी का रे ? मी मुसलमान झालें त्याची क्षमा कर !"

तिनें हलकेच त्या मूर्ति हृदयाशीं धरून नंतर त्यांचें मागल्या विहिरींत विसर्जन केलें. तिचा तो दिवस उपवासांतच गेला. रात्रीं अकरा वाजतां तिनें सर्व भांडीं धुऊन उपडीं घातलीं. नवऱ्याचा सर्व संसार सारखा मांडून दाराला कुलूप लावून ती बाहेर निघाली.

सर्वत्र दाट अंधार होता. गांवांत गडबड असल्यामुळें बहुतेक सर्व लोक दिवे मालवून दारांना कडीकोयंडे घालून स्वस्थ झोंपी गेले होते. यामुळें त्या वेळीं सर्वत्र भीषण स्तब्धताच होती. कांहीं शेतांतून रानकिड्यांचा "कीर्र्र" आवाज व बेडकांचें डुरकावणें भयाण शांततेचा भंग न करतां जास्त भयाणता उत्पन्न करीत होती. आकाशाच्या कोपऱ्यांत ढगाच्या मधून एखादीच चांदणी लुकलुकत होती. काळेकुट्ट भव्य वृक्ष एखाद्या झोंप येत असलेल्या राक्षसी पहारेकऱ्याप्रमाणें मंदपणें डोलत होते. लांब अन्तरावर कुत्र्यांचें भेसुर रडणें ऐकूं येत असल्यामुळें एखादें माणूसच लांब स्मशानांत रडतें आहे कीं काय, असा भास होत होता. गौरी जोरानें ह्या वेळीं काळोखांतून मार्ग आक्रमीत होती. कांहीं वेळानें तिची अस्पष्ट

दिसणारीही आकृति दिसेनाशी झाली, पण तिच्या पावलांचा आवाज बराच काल ऐकूं येत होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कैलासनाथाच्या देवळांत लिंगाला मिठी मारून पडलेलें मुसलमानिणीचें प्रेत आढळलें. कोणी म्हणतात कीं ही मुसलमानीण श्रीमहादेवाच्या डोक्यावरचा मुगूट चोरायला जात होती, तों देवाच्या संकेतानेंच लिंगावर आपटल्यामुळें डोकें फुटून मरण पावली. परंतु लिंगाला सभोंवार घातलेली मिठी अजुनी दृढ होती. त्या प्रेतकळा आलेल्या व रक्ताचे डाग पडलेल्या सुंदर चेहऱ्यावर अंतिम समाधानाचें हास्यच झळकत होतें. गौरीनें श्रीमहादेवाच्या पायाचाच ठाव घेतला. पण ती मुसलमानीणच होती काय ?

# पुँचेटचे प्रताप

" आई, आई " मधुकर धांपा टाकीत येऊन म्हणाला, " आई, अप्पाची सरला कीं नाहीं, नाहींशी झाली. " राधाबाईच्या काळजांत धस्स झालें. दिवा पेटविण्याकरतां हातांत असलेल्या पेटत्या काडीचा चटका बसतांच त्या शुद्धीवर आल्या. चिमुकला मधुकर त्या अंधारांत आईकडे सारखा पहात होता. राधाबाईच्या हाताला गच्च बिलगून तो पुन्हा म्हणाला,

" खरंच आई, अप्पाच्या घरीं सगळी मंडळी रडताहेत, पुष्कळ लोक पण रस्त्यावर जमले आहेत." राधाबाईनीं सैंपाकघरात दिवा लावला. सरलेबद्दल वाईट वाटून त्यांच्या डोळ्यांतून अश्रू खालीं पडले.

" आई, तिनें कां ग जीव दिला ? " मधुकर आईला मिठी मारून घाबरत म्हणाला.

" बोलूं नये असं बाळ. " राधाबाई आवंढा गिळून पुढें म्हणाल्या, गेली असेल कुठं तरी आपल्या मैत्रिणीकडे. "

" नाहीं; आई, लोक बोलताहेत कीं तिनें जीवच दिला. तिनें पत्र लिहून ठेवलं आहे म्हणून सांगतात. आई, पुन्हा पाहून येतों हं. " असें म्हणून राधाबाईनीं नको म्हणण्यापूर्वीच त्यानें धांव ठोकली.

राधाबाईनीं दुसऱ्या खणांतील दिवा पेटविला व त्या देवघरात गेल्या. सासूबाई पांडवप्रताप वाचित बसल्या होत्या.

" ऐकलेंत कां सासूबाई, " राधाबाई आर्द्र स्वरांत म्हणाल्या, " अप्पा कुलकर्ण्यांची सरला नाहींशी झाली म्हणतात. मधु आतांच बातमी घेऊन आला. "

" काय ह्या आजकालच्या पोरींना करणार बाई ? " सासूबाई पोथींत पायाखालचा कागद घालून ती मिटीत म्हणाल्या, " पोरीला असं झालं तरी काय ? अप्पानें आपल्या ऐपतीप्रमाणें बरं हजारबाराशें खर्च

करून चांगलं घर शोधून काढलें आणि हिला ही अवदसा कुठून सुचली ? कांहीं नाहीं; दिवसेंदिवस आतां बोलण्याची सोई नाहीं. बिचाऱ्या अप्पाला ह्या म्हातारपणीं कसल्या यातना एक एक ! "

" सासूबाई, " राधाबाई एकदम म्हणाल्या, " अप्पानें कसलं घर शोधलं ? पैसा एवढा होता. सरला का सुंदर कमी होती ? तिला शिकलेला चांगलासा नवरा जर अप्पानें दोनचार हजार सारले असते तर मिळणें का कटीण होतें ? आज सकाळींच सरला मंगळागौरीचें आमंत्रण द्यायला आली होती. त्यावेळीं मला म्हणाली, ' वहिनी, याच हं. हळदीकुंकवाचा योग कधीं येईल कुणी सांगावं ? ' बिचारी सुखीच नव्हती. काय केलेन् असेल कुणाला माहीत ? "

राधाबाईंना गहींवरून आलें. पदरानें त्यानीं डोळे व नाक पुसलें.

" अग, अलीकडच्या मुलींच्या काय सुखाच्या कल्पना, त्याच कळत नाहींत. " सासूबाई पुढें म्हणाल्या, " मानलं तर सगळ्यांत सुख आहे. सरलेला झालं होतं काय असं ? मला नाहीं वाटत तिनें जीव दिला असेल असं. सरला फाजीलच होती. केसाचा नट्टा काय आणि चालणं आणि ती फॅशन काय ! म्हणे हें शिक्षण ! "

राधाबाईंना अलीकडच्या मुलींवर सासूबाईंचीं व्याख्यानें फार गंमतीदार वाटत असत; पण यावेळीं त्यांना त्यांचा रागच आला होता. त्या कांहींतरी उत्तरादाखल बोलणार होत्या. एवढ्यांत मधुकर पुन्हां धांवत आला. आजीच्या जवळ बसून तो म्हणाला,

" आजी, सरलेची आई मोठ्यानें ओरडते आहे. विहिरींत दिवे घेऊन त्यानीं शोधलें. स्टेशनवर पण चौकशी केली. कैलासाच्या तळ्यावर पण चौकशी केली. शेजारचा मोहन आणि गोविंद होड्या घेऊन नदीवर गेले आहेत. आजी, प्रेत कधीं ग वर येतं ? "

" मधू, " राधाबाई मध्येंच म्हणाल्या, " तूं तिकडे जाऊं नकोस. मग रात्रभर झोंपायचा नाहींस. "

" नाहीं आई. " मधुकर पुन्हा म्हणाला, " सरलेनं बांगड्या, माळ आणि इतर दागिने काढून बिछान्यावर ठेवले आहेत. तिनें अप्पांना पण

पत्र लिहून ठेवलें आहे कीं आपण जीवच दिला म्हणून. मोहन, तिची मैत्रिण मोहिनी देशपांडे म्हणूनच तिच्याकडे गेला होता. आज दुपारींच सरला तिला म्हणाली होती, कीं माझी ही शेवटची मंगळागौरी."

इतक्यांत सदाशिवराव क्लबमधून घरीं आले. राधाबाईनीं ही बातमी सांगतांच ते तसेच अप्पा कुलकर्ण्यांच्या घरीं गेले. मधुकरही त्यांच्याबरोबर गेला.

थोड्याच वेळांत ही बातमी जिकडे तिकडे पसरली. सबंध गांवांत झोंपेपर्यंत ह्या प्रकाराची चर्चा सुरू झाली. प्रत्येकजण आपला तर्क काय होतो व त्याला पुष्टिदायक कोणता पुरावा आहे हें सांगत होता.

अप्पा कुलकर्णी कसाही मनुष्य असला तरी गावांतील पुष्कळ प्रतिष्ठित लोकांशीं त्याचा घरोबा होता. शिवाय शाळेंतील विद्यार्थ्यांत सरला तिच्या सौंदर्यामुळें बरीच प्रसिद्ध होती. यामुळें सरलेच्या आत्महत्त्येबद्दल जिकडे तिकडे जोराचा उहापोह चालला होता. गांवांत वेगवेगळ्या बातम्याही पसरल्या होत्या. गांवाबाहेर गाडीच्या तळालगत तिला आपण बसलेली पाहिली असें रेल्वेचा एक मजूर सांगत असल्याची बातमी पसरली होती. त्याच वेळीं कैलासाच्या तळ्यावर फिरत असतां कोणीतरी आंत पडल्याचा आवाज दिगंबर फडकेनें ऐकल्याची हकीगत विद्यार्थ्यांत प्रसिद्ध झाली होती. याच वेळीं नदींत वहात जातांना एका स्त्रीचें प्रेत आपण पाहिलें असें शिवा कोळी सांगत होता अशी अफवाही उठली होती. दुसऱ्याच्या सुखदुःखाबद्दल यःत्किंचित्ही खंती न बाळगणाऱ्या रिकामटेकड्या शिष्टांनीं मात्र 'मेली, कटकट गेली' म्हणून त्या प्रकाराला महत्त्वच दिलें नव्हतें.

अप्पाच्या घरीं मात्र एकसारखा आक्रोश चालला होता. दिवे घेऊन शोधार्थ फिरणारे स्वयंसेवक रिक्त हस्तानीं परत येतांच सरलेची आई टाहो फोडीत होती. अप्पा मस्तकावर हात घेऊन डोळे मिटून घेत होते. बिचारा गोविंद शेजारधर्माला जागून अन्नपाण्यावांचून काळोखांतून, चिखलांतून सबंध गांव पालथा घालीत होता.

मध्यरात्र उलटून गेल्यावर नदीवर होडी फिरवून गोविंद हताश अंतःकरणानें परत आला. अप्पा आपल्याकडे उत्सुकतेनें पहाताहेत हें

दिसतांच त्याला एकदम रडूं आलें. 'माझी सरुताई मला सोडून गेली हो!' गोविंद अप्पांच्या पायाजवळ पडून ढळढळां रडूं लागला.

घरांतील बायकामंडळींनींही आक्रोश केला. त्या मध्यरात्रीच्या सुमारास त्या आक्रोशामुळें भयाणता प्राप्त झाली होती.

दोन दिवसांत अप्पांना भेटण्यासाटीं त्यांचे आप्तेष्ट आले होते. यामुळें घरांत बरीच मंडळी जमली होती. अप्पाचा भाचाही मोटार घेऊन आला होता. संजीव विमा कंपनीचा इन्स्पेक्टर होता. मुंबइस पळून गेल्यानंतर त्यानें एका विमा कंपनींत नोकरी धरली. गोड बोलण्याची हातोटी बघून मॅनेजरनें त्याला वरचा दर्जा दिला. लवकरच मॅनेजरच्या लक्षांत आलें कीं त्याला फिरतीवर इन्स्पेक्टर म्हणून पाठविल्यास कंपनीचें काम वाढेल. मॅनेजरनें अल्पावधींतच त्याची त्या जागेवर नेमणूक करून फिरतीवर जातांना कंपनीची मोटारही दिली.

संजीवनें घरांत येतांच मामांना आलेल्या आपत्तीला तोंड देण्याकरतां म्हणून शंभर दीडशें रुपये दिले. मामींनाही प्राचीन आणि अर्वाचीन तत्त्वज्ञान सांगून त्यांचें दुःख हलकें करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला होता. संजीवची मोटार पाहून शेजारधर्माला जागून बरीचशी रिकामटेकडी तरुण मंडळी संजीवच्या गोष्टीकरतां येत असे. तोदेखील त्यांना विमा उतरण्याचे फायदे काय असतात, आपली कंपनी जगांतील फार मोठ्या कंपनींत कां मोडते, प्रिमियम् जास्त द्यावा लागला तरी काय फायदा होतो, हीच कंपनी दहा रुपयांपासून विमा कां उतरूं शकते, कंपनीच्या डायरेक्टरला आपण कसा धंदा वाढविण्याचा मार्ग दाखविला इत्यादि गहन विषयावर मनोरंजक माहिती सांगत असे.

एके दिवशीं संध्याकाळीं अशाच गोष्टी चालल्या होत्या. एवढ्यांत शेजारी मोहन आला.

"या मोहनराव, आज गोविंदराव कुठं आहेत?"

"गोविंदराव बिचारे काळजींत आहेत." मोहन चिन्तातुर स्वरांत म्हणाला.

"कां?" संजीवनें आस्थेनें प्रश्न केला.

" मोठा भाऊ मुंबईस टाईफॉईडनें आजारी आहे; तेव्हां त्यांना उद्यां मुंबईला गेलं पाहिजे. गोविंदाला सरूताईबद्दल अतिशय वाईट वाटलें आहे. मला वाटतं त्या चार आठ दिवसांत त्याचं निदान पंधरा पौंड वजन हटत असेल. " मोहन खिन्न झाला.

" अगदीं सहाजिक आहे. " संजीव सहानुभूतिपूर्वक म्हणाला, " सरुताईची आणि त्यांची पुष्कळ वर्षांची दोस्ती. मामी मामाएवढंच त्यांना वाईट वाटणार. उद्यां रात्रीं गोविंदराव आले तर बरं होईल; सरुताईला प्लँचेटवर बोलवण्याचा माझा बेत आहे. खरंच मोहनराव, मी जरी एवढा सुधारक आहें तरी माझा त्या गोष्टीवर अगदीं विश्वास आहे. सरूच्या काय इच्छा होत्या, तिनें आत्महत्त्या कां केली वगैरे कांहीं गोष्टी आपल्याला समजतील, शिवाय तिच्या आई, काकी, मावशी सर्व मंडळींनाही जरासें समाधान वाटेल. "

" हो, हो " मोहन तात्काळ उत्तरला, " माझाही तोच विचार होता. प्लँचेटवर मृतात्म्याला आम्ही पूर्वी पुष्कळ वेळां बोलावलं आहे. गोविंद असता तर त्याच्या खोलींत उद्यां आम्ही तोच प्रयोग करणार होतों. काय चमत्कार आहे पहा ! झालीं दोन वर्षं त्या गोष्टीला. माझ्या बाबांना आम्ही लहानशा टेबलावर बोलावलं. मी प्रश्न करावा आणि टेबलाचे खूर आपटून लगेच बाबानीं उत्तरें द्यावीं असा एक तास प्रकार चालला होता. त्यावेळीं मला अस्पष्ट व्यक्तिही दिसत होती. "

मोहनचा चेहरा त्या प्रसंगाची आठवण होऊन कांहींसा भीतिप्रद झाला होता. संजीवनें तोंडांतील चिरूट हातांत घेऊन गंभीर मुद्रा करून इंग्रजींत म्हटलें,

" पण मोहनराव, उद्यां ही सगळी पिलावळ झोंपल्यावरच आपल्याला सरूताईला बोलावलं पाहिजे. नाहीं तर हीं मुलें झोंपायचीं नाहींत मग रात्रभर. शिवाय बायकाही भांडीं वगैरे धुवून बसायला मोकळ्या होतील. मग कितीही उशीरपर्यंत बसलों तरी हरकत नाहीं. "

मोहननें एकदम होकार दिला. सर्वानीं त्या गोष्टीला एकमतानें संमति दर्शविली.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास अप्पा कुलकर्ण्यांकडे तरुण मंडळी जमूं लागली. संजीव सर्वांचें स्वागत करीत होता. दिवाणखान्यांत बैठक पसरली होती.

अकराच्या सुमारास संजीवनें मोहनरावासहित दिवाणखान्यांत प्रवेश केला. आंतील दारांतून सरलेची आई, काकी व मावशी आली. शिवाय शेजारच्या बायका निष्कारण नाक पुशीत येऊन कोंपऱ्यांत बसल्या.

जिकडे तिकडे गंभीर शांतता होती. घड्याळाची टकटक त्या गंभीर समयीं एकप्रकारें भीतिप्रद वाटत होती. बाहेरच्या दारावर कसलाही जरी आवाज झाला तरी सर्व मंडळी दचकून मागें पहात होती. संजीवनें खोलींतील दिवाही मंदपणें जळत ठेवला होता. इतक्यात अकराचा ठोका पडला. संजीवनें शेवटचा जोरदार झुरका मारून चिरूटचें थोटूक खिडकीबाहेर टाकलें व मध्यभागीं पसरलेल्या सतरंजीवर बसून तो म्हणाला,

“ या मोहनराव, बसा इकडे. या गजाभाऊ, तुम्ही पण बसा. विसुकाका, तुम्ही आणि तात्या पण बसा इकडे. ”

सर्व मंडळी वर्तुलाकार बसली. संजीवनें मध्यभागीं एक तिवई ठेवली. सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें भीपण औत्सुक्य दिसत होतें. सर्वत्र विलक्षण स्तब्धता होती, यामुळें कोंडून धरलेला श्वासही स्पष्टपणें ऐकूं येत होता.

“ सर्व खिडक्या आणि दारें मिटा. ही एकच खिडकी तेवढी असूं द्या. ” संजीव चेहऱ्यावर अधिकच गांभीर्य प्रदर्शित करीत पुढें म्हणाला, “ आणि दिवाही जरा अजून बारीक करा. ”

संजीवची प्रत्येक सूचना चटकन् अमलांत आली. त्या अस्पष्ट प्रकाशांत प्रत्येकाचा चेहरा भयानक वाटत होता. कधीं कोणत्या मार्गानें सरलेचा मृतात्मा प्रगट होईल याची कल्पना नसल्यामुळें सर्वजण एकमेकांकडे साशंक दृष्टीनें पहात होते. इतक्यांत खिडकी एकदम करकर करीत उघडली. दचकून सर्वांनीं तीक्ष्णपणें खिडकीकडे पाहिलें. सर्वांच्या अंगावर शहारे आले होते. तेथें असलेल्या स्त्रियांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

संजीवनें कांहीं वेळ डोळे मिटले व एकाग्र मन केल्याप्रमाणें दीर्घ निश्वास टाकून तो हलक्या स्वरांत म्हणाला,

" हं, आतां सुरवात करूं. "

सर्वांनीं तिवईवर हात ठेवले. संजीवनें प्रेमळ शब्दांनीं सरलेला बोलावण्यास सुरवात केली.

" सरु, सरु, चल ना. चल ये लवकर. अकरा वाजून गेले. तुला आम्ही जास्त वेळ अडविणार नाहीं. ही बघ तुझी आई इथं बसली आहे. काकी आहे, मावशी आहे. तुझ्या प्रीतीचे सर्व लोक इथं आहेत. त्याना उगाच उशीर करूं नकोस. "

संजीव अगदीं सारखा आर्जव करून सरलेला बोलवित होता. त्याच्या त्या दीनवाण्या हांकांनीं कुणाच्याही हृदयाला पाझर फुटला असता. पण पुष्कळ वेळ यत्न करूनही सरला येईना. संजीवनें थकून निश्वास टाकला. एक गलेलठ्ठ चिरुट ओढावा असें वाटण्याएवढा त्याला कंटाळा आला होता.

" सर्वांनीं सरुताईची मूर्ति डोळ्यापुढें आणण्याचा प्रयत्न करा. " संजीवनें सूचना केली व तो पुढें म्हणाला, " मोहनराव, तुम्ही बोलावून पहा. माझ्यावर ती कदाचित् रागावली असावी. गेल्या भाऊबिजेला मला मुंबईहून यायला मिळालें नाहीं यामुळें सरुताई रुसली होती. कदाचित् तो राग अजून असेल. मोहनराव, बघा प्रयत्न करून. "

मोहनरावानीं एवढें महत्त्व मिळतांच कंबर जरा ताठ केली. तिवई-वर दोन्ही हात ठेवून सरलेला आग्रह करण्यास सुरवात केली.

" सरुताई, चल लवकर. तुला आम्ही विशेष त्रास देणार नाहीं. तुझ्या कांहीं इच्छा असल्यास आम्ही त्या पूर्ण करूं. अप्पा नाहींत म्हणून तुला राग आला वाटतें ? त्यांना जरा बरं वाटत नाहीं आहे. पण इथं मामी बसल्या आहेत ना ? "

मोहननें पुष्कळ वेळ विनवणी केली. पण तिवईचा खूर किंचितूही हालेना. शेवटीं थकून मोहनरावांनीं डावा हात कम्बरेवर घेतला व ते उदासपणें म्हणाले,

" छे ! सरुताईच्या मनांत काय आहे कुणास माहीत? आज गोविंद असता तर निश्चित आपणाला एवढा वेळ तिष्ठावं लागलं नसतं."

संजीवनें पुन्हां मांडी सारखी घातली. अगदीं निश्चयानें त्यानें तिवईवर हात ठेवला. संजीवचा निर्धार पाहून सर्वांनीं पुन्हा व्यवस्थित हात ठेवले. संजीव पुन्हा सरलेला बोलावूं लागला,

" सरु, आतां उगाच उशिर करूं नकोस. बघ, साडे अकरा होऊन गेले. गोविंदरावाचा भाऊ आजारी नसता तर ते आल्याशिवाय राहिले असते असं तुला वाटतं का ? त्यांना आज जाणं अगदीं अवश्य होतं. सरु वेडे, चल लवकर. आम्हाला आणि तुला पण अशानें त्रास नाहीं का होत ? चल, चल लवकर. भाऊबीजेला मला रजा मिळाली नाहीं. या वर्षी मी नक्की येणार होतों; पण तसा योगायोग नाहीं त्याला काय करणार ?"

सरलेच्या आईनें एकदम हुंदका दिला. इतर बायकांच्याही डोळ्यां-तून अश्रुधारा वाहूं लागल्या. संजीव मात्र हृदयाला पीळ पाडून सरलेला विनवित होता.

" सरु, चल ना लवकर, असं काय करतेस, वेडे ? "

इतक्यांत तिवईचा एक पाय किंचित् उचलला. संजीव अधिकच आग्रहानें म्हणाला, " हं चल, चल ये. आतां असं करूं नकोस. "

हलका हलका तिवईचा पाय पूर्णपणें वर उचलला. सर्व मंडळींच्या मनोवृत्ति थरारल्या. अंगावर रोमांच उभे राहिले. जमलेला स्त्रीवर्ग मोठ्या सायासानें बाहेर फुटूं पहाणारें रडें आवरत होता. तरुण मंडळी संजीवकडे भीतिप्रद मुद्रा करून पहात होती. पण तो मात्र यत्किंचितही न डगमगतां म्हणाला,

" सरु, तुझ्या कांहीं इच्छा आहेत का ? असतील तर एक ठोका दे. नाहीं तर दोन ठोके दे. "

सर्वांची नजर त्या तिवईच्या खुरावर दृढ झाली होती. तो खूर जमिनीवर आदळला. सर्व मंडळीच्या छातींत एकदम धडकी भरली. पुन्हां तिवईचा पाय उचलला व पुन्हां खालीं पडला. जणू काय बंद पडलेलें हृदय पुन्हां चालू झालें त्याप्रमाणें सर्वांनीं निश्वास टाकला.

" काय बिचारीच्या इच्छा असणार ? कसल्याच गोष्टीबद्दल ती कधीं नाराज झाली नाहीं. " मावशी रडत म्हणाल्या.

" बरं सरु, तुला कुणाला कांहीं सांगायचें आहे का ? " संजीवनें परत प्रश्न केला.

तिवईनें पुन्हां ठोका दिला.

" मला ? मोहनला ? अप्पांना ? " संजीव समोर दिसणाऱ्या व्यक्तींचीं नावें घेत होता. पण गोविंदाच्या नांवाचा उच्चार निघतांच जोरानें तिवईचा पाय जमिनीवर आपटला.

" बरं, गोविंदराव मुंबईहून आल्यावर आम्ही तुला परत बोलवूं हं."

" गोविंदावर तिचा फारच लोभ होता." काकीबाइ रडें आवरून घोगऱ्या स्वरांत म्हणाल्या,

" हें बघ सरु, " संजीव पुढें म्हणाला, " तूं आत्महत्या सासूच्या छळासाठीं केलीस का ? "

तिवईचा खूर कितीतरी जोरानें जमिनीवर आदळला. सरलेच्या आईनें एकदम हुंदका दिला. सर्व मंडळीच्या हृदयाचें पाणी पाणी झालें.

" मग तूं आत्महत्या कशी केलीस ? " संजीवनें मोठ्या कष्टानें आपलें दुःख दाबून प्रश्न केला. " गाडीखालीं उडी टाकून, का विहीरींत बुडून, का विष खाऊन ? " पण या तिन्ही प्रश्नांनीं तिवईचा वर उचल-लेला पाय बिलकुल ढळला नाहीं. संजीवनें स्त्रीपुरुषांच्या आत्महत्त्येचे सर्व मार्ग शोधले व शेवटीं प्रश्न केला,

" मग नदींत उडी घेतलीस का ? "

तिवईनें ठोका दिला. सरलेच्या आईबरोबर तिची मावशी व काकीही हुंदके देऊन रडूं लागल्या. संजीव एवढा मनाचा धीट पण तोदेखील गहींवरून आला. धोतराच्या सोग्यानें डोळे पुसून घसा साफ करीत त्यानें पुन्हा प्रश्न केला,

" मग सरु, तुझें शरीर आम्हाला दिसेल का ? चल, सांग लवकर. दिसेल तर एक ठोका."

सर्वजण श्वास कोंडून उत्तराच्या अपेक्षेनें टेबलाकडे पहात होते. इतक्यांत दारावर एकदम आघात झाले. सर्वांच्या छातींत धस्स झालें. पुन्हा दारावर धक्के बसूं लागले. गड्यानें मोठ्या धैर्यानें दार उघडलें. कांहींतरी भयंकर प्रकार दिसणार ह्या जाणीवेनें सर्व मंडळी तीक्ष्ण नजरेनें दाराकडे पहात होती. इतक्यांत दोन पोलीस शिपायानीं बेड्या घालून गोविंदला आंत आणला. त्याच्या मागोमाग सरला उभी होती.

तो प्रकार पाहून सर्वजण एकदम चपापले. सरलेची आई एकदम किंकाळी फोडून निश्चेष्ट पडली. तिवईचा खूर मोडेल एवढ्या जोरानें जमिनीवर आदळला. संजीव शून्य दृष्टीनें सभोंवार पहात होता.

इतक्यांत भिंतीवरील घड्याळांत बारा वाजल्याचे ठोके पडूं लागले.

# दग्धांकुर

आकाश रक्तमय भासत होतें. मधून मधून वाऱ्याची थंड झुळुक अंगाला भासत होती. ओढ्यांतून अगर डबक्यांतून उगवलेलीं सुंदर कमळें आपलीं नाजुक तोंडें वांकडीं करून पाण्यांत अश्रुबिंदु टाकीत होतीं. पक्षी चिव चिव करीत आपल्या घरट्यांकडे उडत होते. प्रातःकालीन उत्साह त्यांच्या त्या गायनांत मुळींच दिसत नव्हता. बैल व गाई थकून आल्यामुळें गोठ्यांत बसून रवंथ करीत होत्या. मधून मधून मातृभेटीस उत्सुक झालेल्या वासरांचें दीनवाणें हंबरणें ऐकूं येत होतें. लांब कुठच्या तरी झाडावर बसून ओरडणाऱ्या कोकिळेचा आवाज काळोखाच्या आगमनाची सूचना देत आहे कीं काय असा विचार मनांत येत होता. मोठमोठे वृक्ष जणुं काय उदासीन होऊनच डुलत होते. यावेळीं सदानंदाच्या मनांत कांहीं वेगळेच विचार चालले होते. तो तळ्याच्या कांठीं हिरव्यागार गवतांत बसून समोरच्या जळजळीत आकाशाची उदासीन शोभा पहात अश्रुमोचन करीत होता. आपले अश्रू आवरणें त्याला शक्य नव्हतें; व त्यामुळें त्यानें तसाच क्रम बराच वेळ ठेविला. आपल्याला कोणी पाहील ही कल्पनाहि त्याला शिवली नाहीं, कारण, शहराप्रमाणें एकान्ताचा भंग करावयास तेथें कोणीच नव्हतें. कांहीं कालानें त्यानें दीर्घ श्वास सोडला व धोतराचा सोगा खांद्यावर टाकून तो आपल्याशींच म्हणाला, "काय जगाची रीत ही? कोण कुणाचं? वेडं मन मात्र भलतीकडे धांवतं त्याला इतर काय करणार? आपलाच दाम खोटा, मग दुसऱ्याला बोल कां?"

सदानंद मॅट्रिक होतांच कुठें तरी नोकरी धरावी म्हणून खटपट करीत होता. या वेळीं वर्गातील एका मित्रानें मुंबईस कॉलेजांत जाण्यापूर्वी आपल्या मामाकडे सदानंदाचा उल्लेख करून ठेविला, व त्यामुळेंच सदानंदाला दोन महिन्यांपूर्वी ह्या खेडेगांवांत मास्तरची जागा मिळाली.

सदानंदानें गोविंदराव देसायांच्या तीन मुलांना शिकवावें व ह्याबद्दल त्यास जेवण वगैरे सोडून पंचवीस रुपये देण्याचा करार ठरला. निराधार सदानंदास आश्रय मिळाला. थोड्याच दिवसांत गांवांत शाळा नसल्यामुळें त्याला शाळा काढावयास गांवशिष्टांनीं विनविलें व गोविंदरावांच्या परवानगीनें पंचवीस मुलांमुलींची शाळा देवळांत भरूं लागली. त्या शाळेंत शिक्षण देण्याचें कार्य सदानंद योग्य प्रकारें करीत होता. लवकरच सर्व खेड्यांतील लोकांस या मास्तरविषयीं आदरभाव वाटूं लागला होता व कुठल्याहि बाबतींत संशय अगर वादविवाद झाला म्हणजे वकिलाकडे जाण्यापूर्वी सव लोक देवळांत मास्तराकडेच निर्णयासाठीं जात असत.

मास्तरची सात्त्विक वृत्ति, नम्रता आणि प्रेमळपणा ह्यांमुळें ते गोविंदरावांच्या घरीं सर्वांना प्रिय व आपलेसे वाटत असत. त्यांना बाहेरच्या खणास लागून असलेली पहिलीच खोली देण्यांत आली होती. त्यांत ते आपला एकचक्री संसार सुरळीत चालवीत होते. त्यांचा स्वभाव भावनाप्रधान असल्यामुळें मधून मधून त्यांचा हात कविता करण्यांत अगर लघुकथा लिहिण्यांत चालत असे हें साहजिकच होय. तसेंच त्यांच्या लेखनावरून True literature betrays its author ह्या इंग्रजी सुभाषिताची सत्यता पूर्णपणें पटत असे.

गोविंदरावांच्या पत्नीला स्वतःच्या मुलांस चांगला शिक्षक मिळाला असें वाटत होतें. त्या प्रेमळपणें मास्तरांस त्यांच्या घराविषयीं माहिती विचारीत व आलेल्या संकटांचीं आणि घडलेल्या प्रकारांचीं वर्णनें ऐकून सहानुभूतिपूर्वक डोळयांत अश्रू आणीत असत. त्यावेळीं नर्मदाबाईची उपवर कन्या ती सर्व हकीकत कळकळीनें ऐके व दुःखपूर्ण आवाजांत आपल्या आईस म्हणत असे,

"आई, मास्तरना उगाच पूर्वींच्या गोष्टी कशाला विचारतेस? त्यामुळं त्यांना पण वाईट वाटतं अन् तुलासुद्धां वाईट वाटतं."

यावर नर्मदाबाई कांहीं उत्तर न देतां निःश्वास टाकून आपल्याशींच म्हणत, "काय बिचाऱ्याचं दुर्दैव! पोराचीं आइबाप असतीं तर असं आमच्या दारावर कां यावं लागलं असतं?"

इतक्यांत संध्याकाळ व्हावी व नर्मदाबाईनीं सैंपाकघरांतील उद्योग आटपण्याच्या उद्योगास लागावें.

" बाळ आणि भाऊ, चला बघूं मास्तरकडे; पर्वचा म्हणा व मग त्यांच्याबरोबर जेवायला या. "

मुलें मास्तरकडे गेलीं.

" मास्तर, आइनं पर्वचा म्हणायला सांगितली आहे. "

" हं, बसा इकडे, आणि म्हणा बे एके बे. "

मुलांनीं म्हणण्यास सुरुवात केली. मास्तर आरामखुर्चीवर बसून समोरच्या आकाशाकडे पहात होते. एकादशीच्या काळ्या रात्रीं आकाशांत तारका चमकूं लागल्या. मास्तरनीं त्यांच्या चमकण्याकडे पाहून काय बोध घेतला न कळे. त्यांनीं दीर्घ निःश्वास सोडला. आकाशाच्या कोंपऱ्यांतील एक तारा खळ्कन् तुटून पडला. मुलांची पर्वचा झाली व मास्तरनीं ' आले किती व गेले किती ? ' असें म्हणून मान फिरविली.

" मास्तर, झाली उजळणी. आम्ही जाऊं ना आतां ? "

" काय, म्हटलीत का ? मी ऐकलंदेखील नाहीं. बरं, जेवायला जा. " मास्तरनीं खिडकींतून बाहेर नजर लावीत उत्तर दिलें.

मुलें आनंदानें बागडत सैंपाकघरांत गेलीं व आईच्या कमरेला प्रेमानें मिठी मारीत म्हणालीं, " आई, म्हटली पर्वचा. आतां जेवायला वाढ, चल. "

" वाढत्यें, चला; पण हें काय ? सोडा मला, ताकाची फोडणी करपेल. मास्तरना नाहीं बोलावलंत ? " असें म्हणून नर्मदाबाईनीं त्यांची मिठी दूर केली.

" इंदू, जा मास्तरना जेवायला चला म्हणावं. त्यांच्याशिवाय हीं धाकटीं धडपणं जेवायचीं नाहींत. "

इंदिरा झपझप पावलांनीं गेली. मास्तर खिडकीकडेच पहात बसले होते.

" मास्तर ! " इंदिरेनें हलकेच दारावर उभें राहून हांक मारली.

" कोण ? " मास्तरनीं डोळे पुशीत मान फिरविली.

इंदिरेला त्यांच्या डोळ्यांत अश्रू आल्याचें समजलें. पण तिनें त्याच्यावर पांघरूण घालण्याकरितां पुन्हां विचारलें, " झोंप लागली होती का? खिडकींतून वारा थंडगार येतो, नाहीं?"

" नाहीं. होय, जरा डोळा लागला होता." असें म्हणत सदानंद डोळे चोळीत उठला.

" काका आले का, इंदू?" सदानंदानें हलक्या आवाजांत पुन्हां प्रश्न केला.

" नाहीं. आज ते मालवणला गेले आहेत. कां बरं, तुमचं कांहीं काम होतं का?"

इंदिरेच्या ह्या सहानुभूतीच्या आवाजांतील प्रश्नामुळें त्याला वाईट वाटलें, व दीर्घ निःश्वास टाकून तो म्हणाला, " हो, चार दिवस माझ्या मित्राकडे विश्रान्तीकरतां जायचं असं म्हणतों आहें, पहावं."

" कां? तुम्हाला इकडे विश्रान्ति मिळत नाहीं वाटतं? आपण एवढ्याकरितांच चाललां असं आईला समजलं तर, शपथ सांगतें तिला फार फार वाईट वाटेल." इंदिरा कळकळीनें म्हणाली.

मास्तरच्या हृदयांत खळबळ उडाली. ते पटकन् बोलून गेले—

" इंदू, तूं वेडी आहेस. चल, तिकडे काकी वाट पहात असतील."

मास्तर जेवायला गेले. इंदिरेनें खोलीचें दार लावून घेतलें व ' काय होतं कुणास माहीत ' असें गुणगुणत ती निघून गेली.

त्या दिवशीं सदानंद आपल्या खोलींत बसून इंग्रजींत कुणास तरी पत्र लिहीत होता. इतक्यांत इंदिरा आपल्या धाकट्या भावंडांस घेऊन आंत आली.

" मास्तर, आईला बाळ अगदीं त्रास देत होता, याला या वेळीं बिलकूल सोडूं नका. पण तुम्ही कांहीं काम करीत आहां वाटतं?" इंदिरेनें प्रश्न केला.

" छे, पत्र लिहीत होतों, झालं." सदानंदानें पत्रावर टिपकागद मारीत उत्तर केलें.

" खुशाल सांगावं आपलं कांहीं तरी. " इंदिरा प्रेमळ हास्य करीत म्हणाली " मला इंग्रजीचा गंधदेखील नाहीं. पण मास्तर, मला शिकायचं आहे इंग्रजी. शिकवाल ना ? आम्हां बायकांना चार वाक्यं वाचायला—लिहायला आलीं म्हणजे बस झालं."

" खरंच. इंग्रजी शिकणं फारसं कठीण नाहीं म्हणा; पण एखाद्या वेळीं काकींना तें पसंत पडायचं नाहीं. सहाजिकच आहे; जुन्या चालीचीं माणसं, पण पहा विचारून. "

लवकरच इंदिरेनें आईबाबांची परवानगी मिळविली व ती इंग्रजी शिकूं लागली. अक्षरांचा पूर्वपरिचय असल्यामुळें तिला झपझप शब्द समजूं लागले. कांहीं दिवसांनीं तिनें इंडियन् रीडर वाचण्यास सुरुवात केली.

" हं, वाच व दर वाक्याचा अर्थ सांग. "

इंदिरा वाचूं लागली, " My school. माझी शाळा. "

वाचतां वाचतां ती एका वाक्याकडे घुटमळली; " I love my teacher. मी—लव्ह म्हणजे काय ? " तिलाहि तो शब्द पहिल्यांदाच वाचण्याची पाळी आली होती.

" लव्ह ह्याचा अर्थ प्रेम करणं, प्रीति करणं असा आहे. " सदानंदानें अर्थ सांगितला. इंदिरा वाक्याचा अर्थ सांगूं लागली, " मी माझ्या मास्तरावर प्रे—प्रीति करत्यें. "

" हें पहा टीचर याचा अर्थ मास्तर असा करूं नये. टीचर म्हणजे गुरुजी. हं, वाच पुढं. "

" Our teacher is very kind. आमचे मास्तर—गुरुजी—फार दयाळू आहेत. " वाक्य पुरें नाहीं झालें तोंच इंदिरेचा धाकटा भाऊ बाळ ओरडत आला,

" ताई, तुला किनई आई बोलावते आहे. "

" जा, मागाहून कधीं तरी वाचूं. " मास्तर म्हणाले.

इंदिरा निघून गेली; पण थोड्याच वेळांत ती परत येऊन म्हणाली, " आत्तां पोस्टमन् आला, त्यानं तुमचं हें टपाल दिलं आहे. "

सदानंदानें लखोटा फोडला व चेहऱ्यावर आंठ्या घातल्या.

" काय तें, कामाचे कागद का ?" इंदिरेनें भीत भीत चौकशी केली. तिच्या त्या प्रश्नामुळें खरी गोष्ट दडवणें त्याच्या जिवावर आलें.

" त्या दिवशींच ती गोष्ट त्या संपादकानें परत केली आहे."

" ती कां ? नांव काय तिचं तें ? 'आंधळ्याची गाय' हेंच ना ? मला तर बाई फार आवडली ती."

" तुला कदाचित् आवडली असेल; पण संपादकाला आवडली नाहीं त्याला काय करायचं ? मी काल मॅट्रिक झालों; मी काय गोष्टी लिहिणार ? मी प्रोफेसर नाहीं. का एम्. ए. नाहीं, कीं मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर अगर वकील पण नाहीं. यःकश्चित् खेड्यांतील मास्तर ! माझ्या गोष्टीचे कम्पॉझिटर तरी खिळे जुळवील कीं काय हाच प्रश्न."

इंदिरेला ह्या वेळीं त्यांच्या आवाजांत खिन्नता दिसून आली. ती धूर्त, सुशील मुलगी त्या वेळीं कांहींच बोलली नाहीं.

तो रविवारचा दिवस होता. नर्मदाबाई जेवणखाण आटपून, नंतर सावकाशपणें चार वाजतां मास्तरच्या खोलीकडे गेल्या.

" काय मास्तर, भाऊ अन् बाळ अभ्यास करतात का कांहीं ?"

" हो, हुशार आहेत दोघेहि; काकी."

नर्मदाबाईंना समाधान वाटलें. स्वाभिमानानें त्या तोंडांतील पान चघळीत पुढें म्हणाल्या,

" अन् आमच्या बाईसाहेब इंग्रजी शिकताहेत ना ? कांहीं आहे का दम ?"

" होय, थोडं थोडं वाचायला येऊं लागलं आहे. बरीच तयारी झाली."

नर्मदाबाईच्या आवडत्या विषयाला—कारण त्या नेहमीं त्याच विषयावर बोलत असत—सुरुवात झाली, " मोटी काळजी लागली आहे पोरीच्या लग्नाची. काय हो, जिथं तिथं हुंड्यासाटीं अडवणूक. एवढीं स्थळं पाहिलीं, पण चार हजारांखालीं कोणी तयार नाहीं. पोरीला कुठंहि देऊन उपयोग नाहीं. माझ्या इंदूला स्वतःचं नेसण आवरतांना कठीण जातं, तें परक्याकडे कुणाकडेहि देऊन कसं चालेल ? गळ्याला फांस

लागला आहे. पहावं, ज्याच्या नशिबाचं तें." नर्मदाबाईचा गळा दाटून आला.

सदानंद हें बोलणें ऐकून गहिंवरला. कांहीं वेळानें तो हलक्या स्वरांत म्हणाला, "काकी, दिवसेंदिवस काळ कठीण येत चालला आहे."

"हें तर झालंच हो; नाहीं तर माझ्या सोन्यासारख्या पोरीच्या लग्नाचे एवढे धिंडवडे कां व्हावे? आम्ही तरी दोनतीन हजार द्यायला तयार आहों, पण स्थळ कुठंच नाहीं. मग गरीब लोकांनीं पोरीला फांस घालून मारावी कीं काय? मास्तर, माझी इंदू किती रूपवान् आहे; पण त्या दिवशीं त्या सदोपंतांच्या मुलानं इतकी रूपवान् नाहीं म्हणून नापसंत केली. खरंच सांगतें, मला असं वाईट वाटलं म्हणून सांगूं? मास्तर, माझी इंदू कमी का रूपवान् आहे हो?" नर्मदाबाईचा गळा दाटून आला व त्यांच्या डोळयांत अश्रू उभे राहिले.

"काकी, समाज शुद्ध गाढव होत चालला आहे. आपल्या मुलीच्या लग्नाला कसे त्रास पडले हें जर मुलाच्या आईबापाला कळेल तर दुसऱ्याच्या मुलीला कशाला अडवून दाखवतील?" सदानंदानें कसेबसे एवढे उद्गार काढले.

नर्मदाबाईच्या डोळयांतून पाणी खालीं पडलें. थोड्या वेळानें त्या दाटलेला कंठ साफ करीत म्हणाल्या, "आज गेले आहेत तिकडे; अप्पा कुलकर्ण्यांचा मुलगा म्हणे डॉक्टरची परीक्षा पास झाला आहे."

"काकी, येव्हांना कशाला उगाच काळजी करतां त्याची? होईल पुढं; इंदू कांहीं एवढी मोठी नाहीं." सदानंदाला स्वार्थी मनाचा संशय येऊन तो थोडासा दचकला.

"काय हो मास्तर!" नर्मदाबाई आश्चर्यानें म्हणाल्या. "पोरीला या मार्गशीर्षांत अठरावें वर्ष पुरं होईल, अन् तुम्ही अजून तिला लहानच म्हणतां!"

सदानंदाला आपली चुकी वाटून सुधारून घेण्याच्या हेतूनें तो म्हणाला, "एवढं का तिचं वय आहे?"

कांहीं वेळानें नर्मदाबाई सुस्कारा टाकीत म्हणाल्या, “ देवी ! पोरीला चांगलं स्थळ मिळून सुखानं नांदो. मग जरीच्या लुगड्यानं तुझी ओटी भरीन. ”

इतक्यांत इंदिरा तिथें आली. “ आई, काय झालं ग ? ” आईच्या चिन्तातुर चेहऱ्याकडे बघून तिनें प्रश्न केला.

“ कांहीं नाहीं बोलत. तुझ्या लग्नाची गोष्ट बोलत होतें. ” नर्मदाबाईनीं खिन्न आवाजांत उत्तर दिलें.

इंदिरेनें भेदरलेल्या नजरेनें मास्तरच्या चेहऱ्याकडे पाहिलें. पण मास्तरच्या चेहऱ्यावर निराशेची छटा दिसत असून त्यांनीं आवंढा गिळल्याचें तिच्या लक्षांत आलें असावें.

गोविंदरावांनीं कुलकर्ण्यांकडे बोलणें सुरू केलें होतें. त्या दिवशीं ते आपल्या पत्नीशीं त्यासंबंधीं बोलत बसले होते.

“ आतां काय तो पांचशेंचाच प्रश्न आहे. मला नाहीं वाटत दामोदरपंत तिहींला कबूल होतील. बरं मग, काय करायचं म्हणतेस ? ” गोविंदरावांनीं प्रश्न केला.

“ काय म्हणायचं ? एवढ्यासाठींच का स्थळ नाकारायचं ? स्थळ बरं आहे ना ? ”

“ तें तूं पहा. मुलगा डॉक्टरची परीक्षा गेल्या सालीं पास झाला आहे. इंग्लंडला जाणार म्हणत होता—नाहीं, म्हणत आहे. पण त्यांत कांहीं अर्थ आहे असं मला वाटत नाहीं. जून महिन्यापासून मालवणांत प्रॅक्टिस करणार आहे. तेव्हां पहा काय तें. ”

कुणींच कांहीं बोललें नाहीं. थोड्या वेळांत गोविंदराव उद्गारले, “ हो, बरी आठवण झाली. त्याच्या घराविषयीं मास्तरना माहिती असेल. कारण कालच मास्तर म्हणाले कीं दामोदरपंतांचा धाकटा मुलगा आपल्याबरोबरच मॅट्रिक पास झाला. ”

गोविंदराव आपलें एवढें वाक्य पुरें करतात न करतात तोंच नर्मदाकाकी हांक मारूं लागल्या, “ इंदू, अग इंदू, इकडे ये अशी. मास्तरना म्हणावं तुम्हांला जरा बोलावलं आहे. ”

कांहीं वेळानें सदानंद आलेला पहातांच गोविंदराव म्हणाले, "का हो मास्तर, तुम्हाला दामोदरपंतांच्या घरची माहिती आहे का कांहीं?"

"हो. त्यांचा धाकटा मुलगा मजबरोबर मॅट्रिक झाला." सदानंद म्हणाला.

"तसं नव्हे हो; आमच्या इंदूला त्यांचा मोठा मुलगा पहावयाचा आहे, तेव्हां म्हटलं–"

इंदिरेला तिथें उभें रहाणें चांगलें वाटलें नाहीं. ती शेजारच्या खोलींत गेली.

"हो, चांगलं आहे तें घराणं!" सदानंदाच्या आवाजांत त्या वेळीं एक प्रकारचा कांपरेपणा स्पष्ट भासत होता. पण त्याचें महत्त्व कुणाला वाटणार?

तो पुढें सांगूं लागला, "मुलाची आई तर फारच प्रेमळ आहे. दामोदरपंतांस लोक जरा चिकट म्हणत असतील. पण मला तसं वाटत नाहीं. त्यांचा मोठा मुलगा तर स्वभावानं फार चांगला असून सज्जन व देखणा पण आहे."

इंदिरेला हें भाषण ऐकूं आलें असेल. पण तिच्या चेहऱ्यावर आनंदाची बिलकुल छटा दिसत नव्हती. यामुळें नक्की असें कांहींच सांगतां येत नाहीं.

थोड्याच दिवसांत इंदिरेचा विवाह ठरला. निमंत्रणपत्रिका घरोघर पाठविण्यात आल्या व कांहीं कांहीं पाहुणेमंडळी येऊन दाखल झाली. गोविंदरावांच्या घरांत एकच धांदल चालली होती. लाडू, करंज्या, चिवडा, चहा यांच्या वासामुळें सारें घर दमदमटलें होतें.

'मास्तर, जरा तेवढे जिन्नस घेऊन येण्याकरतां कुणी तरी मनुष्य पाठवा पाहूं. तसंच मास्तर, बाळला अन् भाऊला कपडे शिवायला दिले पाहिजेत. हो; आणि लुगडीं दाखवायला घेऊन येतां ना?' अशा प्रकारें नर्मदाकाकींचा सदानंदाच्या मागें तगादा लागला होता. तर गोविंदराव 'अहो मास्तर, मंडपाचं काम झालं का सगळं? आणि मग वाजंत्र्याचं काय झालं? तें असो, पण सैंपाकी मिळाले का? नाहीं तर मागाहून धांदल होईल.' याप्रमाणें विचारीत होते.

बिचाऱ्या सदानंदाचें हृदय पार विरून गेलें होतें. तो इच्छेविरुद्ध मन:पूर्वक काम करीत होता. जी गोष्ट त्याला अप्रिय असावी तीच गोष्ट त्यानें घडवून आणण्यास मदत करावी. मनाच्या अशा दुहेरी पेंचांत सांपडलेला सदानंद हतबुद्ध होऊन यान्त्रिक बाहुलीप्रमाणें काम करीत होता. या वेळीं इंदिरेच्या मनाची स्थिति काय होती हें अचूक सांगणें कधींहि अशक्यच आहे. गोविंदरावांनीं ज्या वेळीं तिला दामोदरपंतांच्या मुलास दाखविली त्या वेळीं इंदिरेच्या मनांत प्रभाकराविषयीं प्रेमापेक्षां आदरच उत्पन्न झाला. त्या वेळीं प्रभाकरानें डॉक्टरच्या जातीला अनुसरून पहिलाच प्रश्न केला कीं, 'मी आपणाला पसंत आहे का ?'

इंदिरा होकार देऊन गेली. डॉक्टरनीं मुलगी पसंत केली. ह्यामुळें तिला आतां कांहींच सुचेनासें झालें होतें. दुसऱ्या गोष्टीची अशक्यता स्पष्टपणें डोळ्यांपुढें दिसत असतां उगाच भलता विचारसुद्धां मनांत आणणें किती मूर्खपणाचें आहे याची जाणीव तिला होतच होती. इंदिरेनें ते दिवस मनाच्या द्विधा परिस्थितींत मोठ्या कष्टानें कसेबसे घालविले. लवकरच लग्नाचा दिवस उजाडला. घरांत सर्वत्र धामधूम सुरू झाली. सर्वजण आपापल्याच धांदलींत होते. बिचाऱ्या वधूचें कोमल अंत:करण अष्टौप्रहर धडधडत होतें. आयुष्याच्या सुखदु:खाची, वैभवाची अगर नाशाची सर्व मुहूर्त-मेढ त्या दिवसांतील एका घटकेवर अवलंबून होती. उभ्या आयुष्याचा प्रवास करतांना वाटाड्या आजच हाताशीं धरायचा. त्याच्या पावलावर पाऊल ठेवायचें व अंधारांतसुद्धां मार्ग आक्रमण करावयाचा. त्या दिवशीं सुखाचा वांटेकरी, दु:खाचा भागीदार, सखा, सोबती मिळवावयाचा अगर मिळेल त्याचा प्रेमानें स्वीकार करावयाचा. या विचारामुळें तारुण्यांत पाय ठेवणाऱ्या अल्लड वधूचें हृदय काय होतें याची कल्पना दुसऱ्याला कशी यावयाची ?

दिवस वर वर येऊं लागला. देवक ठेवण्यांत आलें. वाजंत्रें वाजूं लागलीं व गांवांत गोविंदराव गांवकऱ्याच्या मुलीच्या लग्नाची बोलाचाली सुरू झाली.

"इंदू, चल, देवाला नमस्कार कर. चल, सासूबाईच्या आणि सर्वांच्या पायां पड." नर्मदाकाकी आलेले अश्रू आंवरीत म्हणाल्या.

सर्वांना नमस्कार केल्यावर ती मास्तरकडे वळली.

"छे, छे, माझ्या कशाला? वडिलांना नमस्कार केले म्हणजे झालं." असें म्हणून सदानंद मागें सरकला. इतक्यांत नर्मदाबाई पुढें होऊन म्हणाल्या.

"मास्तर, तुम्ही पण तिचे वडील भाऊच आहांत."

नर्मदाबाईच्या डोळ्यांतून एवढें बोलतांना खळ्कन् पाणी आलें. त्या गळा मोकळा करीत दाटलेल्या स्वरानें म्हणाल्या, "माझा हा गेला अन् तुम्ही मला त्याचे जागीं झाला." सदानंदाचा कंठ दाटून आला. जे कधींकाळीं मनांत विचार येऊं नयेत ते विचार आपल्या हृदयांत खोल दडून बसले आहेत, हा एकच विचार त्याच्या हृदयाच, जणुं काय ते दुष्ट विचार बुडवून टाकण्याकरितां, पाणी पाणी करीत होता. त्यानें आपले अश्रू दडवण्याकरितां मान खालीं करून मौनव्रत धारण केलें.

गोरज मुहूर्तावर लग्न होतें. मंडपांत लोकांची गर्दी लोटली होती. जो तो आपापल्या व्यवस्थेंत गर्क झाला होता. सीमान्तपूजन होऊन मंडपांत नवरीमुलगी येण्याची वेळ येऊन ठेपली. बिचारी पीतवस्त्र नेसलेली व पाठीवर सर्व केश सुटलेली इंदू एकटी बसून गौरीहराची पूजा करीत होती. डोळ्यांतून घळघळ सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. गौरीहरावर घातलेला मंगल तांदुळाचा पसा किती भक्ति-भावाचा असतो याची कल्पना अविवाहित अजाण मुली अगर पुरुषजातीला कुठून यायची?

इतक्यांत सदानंद तेथें आला. तो हृदयस्पर्शी देखावा पाहून सदानंदाची स्थिति अवर्णनीय होऊन हृदयांतून निघालेल्या अश्रुधारा सतत डोळ्यांतून बाहेर पडूं लागल्या.

"इंदू," कशी तरी सदानंदानें आंवढा गिळून हांक मारली व रुमालानें तो आपले डोळे पुसूं लागला. इतक्यांत गडबड सुरू झाली, "चला, मुलीला आणा, वेळ झाली."

"चल, इंदू," तिचें नेसण, केंस वगैरे सारखीं करीत कुणी बाई म्हणाली. इंदिरेचें शरीर थरथर कांपत होतें.

" अहो मनोहरमामा, मनोहरमामा कुठं गेले ? या, इकडे इंदुजवळ रहा ना ? आतां तुमचं काम आहे ! " अशा प्रकारें थट्टाविनोद करीत मंडळी निघून गेली.

सदानंदानें दीर्घ निःश्वास टाकला. कोंपऱ्यांतील गौरीहराकडे तीक्ष्ण नजरेनें पहात व 'देवाधिदेवा ! तिच्या सुखाला कधींकाळीं खंड न पडो.' असें म्हणत त्यानें साष्टांग प्रणिपात घातला. अंगाच्या वाऱ्यामुळें समईची मंद जळणारी वात एकदम मालवली गेली. सदानंदाच्या छातींत धस्स होऊन अंगावर शहारे आले.

इतक्यांत बाहेर वाद्याचा गडगडाट होऊन बार वाजले. सदानंदानें घाईनें जाऊन धडधडणाऱ्या हृदयानें वधुवरांवर मंगल अक्षता उधळल्या.

सर्व समारंभ थाटानें पार पडला. सदानंद मास्तर दोन्ही घरचा पाहुणा होता. वधूच्या घरीं आम्ही वरपक्षाकडचे व वराकडे आम्ही वधूकडचे पाहुणे असें तो उसन्या विनोदानें सांगत होता; पण त्याला दोन्ही बाजूंकडून आग्रह होत होता.

नर्मदाकाकींनीं पांच–परतावणीच्या वेळीं इंदूबरोबर जाण्याकरितां मास्तरची विनवणी केली. मास्तरनीं कबुली दिली व मंडळी निघाली.

" बरं, काकी, येतों बरं ! " मास्तरनीं दाटलेल्या कंठानें निरोप घेतला.

" बरं; मास्तर, इंदूकरतां म्हणा हं सर्वांना ! तुमचीच बहीण आहे ती "

नर्मदाकाकींनीं हुंदका दिला. सदानंदानें नाइलाजानें मान हालविली व डोळ्यांतील अश्रु दडविण्याकरितां तो चालूं लागला.

" ये सदा, काय, इतका महाग कां झालास ? " नवरदेव प्रभाकर त्याला समोर येतांना पाहून म्हणाला.

" आतां आपण मला विचारतां कशाला ? " मास्तरनीं सहजच विनोद केला.

" करा बुवा थट्टा ! आमचेसुद्धां दिवस येतील. आम्ही कुठं जात नाहीं. "

सदानंदानें हास्य केलें, पण त्यांत निराशेची स्पष्ट झांक दिसत होती.

दुपारचें जेवणखाण होऊन सर्व मंडळी पत्ते झोडीत बसली होती. सदानंदानें कपडे चढविले व इंदिरेजवळ जाऊन त्यानें हळूच म्हटलें, " बरं, इंदू , काकींच्या उपदेशाप्रमाणं वाग हं. सर्वांवर प्रेम करून आनंदानं वागावं. तसंच—"

मास्तरचा आवाज बाहेर फुटेना. बिचारी बावरलेली इंदू मुसमुसून रडूं लागली.

काहीं वेळानें आवंढा गिळीत सदानंद 'बरं येतो' असें म्हणून पटकन् निसटला.

" बरं. कमळाकाकी, येतां. इंदू तुमच्या स्वाधीन केली आहे. आपल्या मुलीप्रमाणें सांभाळ करा. माझी बहीण समजून तिला माना. " सदानंद प्रभाकराच्या आईला म्हणाला.

इतक्यांत प्रभाकरचा धाकटा भाऊ तिथें आला.

" काय सदानंद, चाललास ? आतां कधीं इकडे येतोस ? "

" कमलाकर, तूं मी शाळेंतील मित्र, तेव्हां तुला सांगतों, इंदिरा माझी मानलेली बहीण समजून वाग. येतों आतां. "

इतक्यांत प्रभाकर तेथें येऊन म्हणाला,

" काय, चाललां मास्तरसाहेब ? बस ना, जाशील. "

" Excuse; बरं, Fare well. Good bye. " सदानंद निघाला, " इंदुताईला तुमच्या स्वाधीन केली आहे. "

" कांहीं काळजी करूं नकोस." प्रभाकरनें उत्तर केलें.

सदानंद गेल्यावर प्रभाकर म्हणाला, " काय इंग्रजी ! आतां थोड्या वेळानं येईल, आणि म्हणतो Good bye ! स्वभावाचा फार प्रेमळ हं मात्र ! "

सबंध दिवस सदानंदाची कुणीच चौकशी केली नाहीं. वराकडील मंडळीला वधूच्या घरीं व वधूकडील मंडळीला वराकडे सदानंद मास्तर आहेत असेंच वाटत होतें.

सायंकालचा समय होता. सदानंद मोटमोठ्या पावलांनीं टेकडीची चढण चढत होता. त्यानें हातांत टोपी काढून घेतली होती. सर्व कपडे घामानें चिंब झाले होते. इतक्यांत एक खेडवळ शेतकरी त्याला वाटेंत भेटला.

" मास्तर, या सांजच्या वेळीं इकडे कुणीकडे चाललां ? "

" नाहीं, जरा कामाला जातों आहें. " असें म्हणून तो झपझप चालूं लागला. त्याच्या डोळ्यांतून वहाणारे अश्रू घामानें भिजलेल्या शर्टवर सारखे पडत होते. शेतकरी मागें वळून पाहूं लागला. सूर्य अर्धा अधिक टेंकडीमागें गेला होता. आकाशाच्या लाल पडद्यामागें काळीकुट्ट टेंकडी वर गेलेली दिसत होती. त्यावर एखादें बेढब आंब्याचें झाड मंदपणें डोलत होतें. टेंकडीच्या डोक्यावर सदानंद गेला त्या वेळीं लहानशा काळ्या व्यक्तीप्रमाणें तो मावळत्या सूर्यबिंबापुढें दिसत होता.

सदानंदानें हात पसरले. एक वेळ आकाशाकडे साश्रु नयनांनीं उदासपणें पाहून तो चालूं लागला व अल्पावधींतच डोंगराच्या मागें पार दिसेनासा झाला.

# द्वीभार्या योग.

“अहो, पंचांग उघडून काय बसलां आहांत? बाजारांत जाऊन भाजी वगैरे कांहीं आणायचं नाहीं वाटतें? नेहमीं मेलें ओरडायचें तरी किती? कवडीचीसुद्धां अक्कल कशी ती नाहीं. एवढीं वर्षे नोकरी करतां अहांत, वरचा साहेब मेला तुम्हाला काढून कसा टाकत नाहीं परमेश्वराला माहीत!” रखमाबाईनीं आपल्या नवऱ्याच्या खोलींत येऊन तोंड सुरू केलें.

“अग, पण नुकते आठ वाजले. बाजार भरायला अजून दोन तास आहेत. एव्हांपासून बाजारांत काय करायचें आहे?” गोविंदरावांनीं प्रश्न केला.

“जीव द्यावयाचा! आणि पंचांग उघडून काय पहातां अहांत? पोरें अजून लहान आहेत, नाहींतर मुंज लग्नाचा मुहूर्त पहातां म्हटलें असतें. हो, आतां दुसऱ्या लग्नाचा मुहूत पहात असाल तर देव जाणे. मग मी मोकळी झालें.”

“अग, कशाला बडबडते आहेस?” गोविंदराव त्रासिक स्वरांत उद्गारले.

“बाई बाई! मी बडबडतें नाहीं आणि आपण काय करतां? रस्त्यावरच्या बैलाला जास्त अक्कल असते. माझें नशिब म्हणून असलें रत्न पदरीं आलें. बाजारांत लवकर गेलें, चार दोन ठिकाणीं फिरलें तर भाजी चांगली आणि स्वस्त नाहीं का मिळायची?” रखमाबाईचा तोफखाना सारखा चालला होता. हात वेडे वांकडे करून त्या पुन्हा ओरडल्या, “मग घाईघाईनें कुत्र्यासारख्या धांपा टाकीत यावयाचें आणि आधाशाप्रमाणें चारचार मिनिटांनीं सैंपाकाच्या खोलींत मान सारायची—हें मेलें सांगितलें आहे कोणीं? पंचांग उघडून हे खुळपंचांगाप्रमाणें कशाला बसलां अहांत?”

" आतां तोंड मिटशील ? शेजारीपाजारी हंसतात कीं तुला ! मला ऑफिसांत तोंड दाखवायलाही लाज वाटते. सारा गांव तुला हंसतो आहे. " गोविंदराव उसन्या जोरानें म्हणाले.

" मला गांव हंसतो का तुम्हाला तें परमेश्वराला माहीत. नेहमीं मेलें ओंगळ वागणं ! शेजारीपाजारी हंसतात तुमच्या कृतिला. म्हणे मला ऑफिसात तोंड दाखवायला लाज वाटते. उजेडच लागला आहे कीं नाहीं तोंडाला ! मेली लाजसुद्धा नाहीं. मी आपली परवां माहेरीं जातें. तुम्हीच कांहीं तें करा आणि खा. मला तुमचा संसार नको आणि प्रपंच पण नको. इतकी मी बोलतें आहे पण त्या मेल्या पंचांगांत वेड्यासारखे पहात बसायला लाज वाटत नाहीं ? "

" माझे आई " गोविंदराव हात जोडित ओरडले, " पायां पडतों माझे आतां स्नेही येणार आहेत, तेवढा वेळ तरी माझी अब्रु राख. "

" जळलं मेलं ! माझे आई—काय बडबडता ? देवाब्राह्मणासमक्ष लग्न मेलें कसलें झालें, तुमच्या नांवानें हा मंगळ-सूत्राचा फांस लावला आहे तो तरी डोळ्यांनीं दिसतो ना ? तुमचे स्नेही येणार तर येतिल. तुम्हाला स्नेही असतील ही मला स्वप्नांतसुद्धां कल्पना शिवली नाहीं. असेल तो मेला शंखोबा दगड ! मला तुमचें तोंडसुद्धां इतःपर बघायचें नाहीं. मी आंघोळीला जातें. "

" जा, देव नवसाला पावला. " गोविंदराव पुन्हा हात जोडीत वैतागून म्हणाले. रखमाबाई दुखवलेल्या नागिणीप्रमाणें एकदम परतल्या व डोळे मोठे करून गरगर फिरवीत व नाकपुड्या हालवीत त्या चवताळून ओरडल्या. " जीभ जास्तशी सुटायला लागली ? याद राखून ठेवा. परवांचे दिवशींचा एवढ्यांतच विसर पडला वाटतें ? "

गोविंदराव शिक्षकासमोर घाबरलेल्या विद्यार्थ्याप्रमाणें मान खालीं घालून निमूटपणें पंचागांत पाहूं लागले. रखमाबाई बराच वेळ त्यांच्यांकडे रागानें पहात होत्या. पण त्यांना वर पहाण्याचें धारिष्ट होईना अथवा त्यांच्या तोंडांतून शब्द बाहेर पडेना. रखमाबाई दणदण पाय वाजवित सैंपाकघराच्या खोलींत निघून गेल्या. गोविंदरावांनीं दीर्घ निश्वास सोडला.

डोळ्यांतून वहाणारे अश्रू पुसून त्यांनीं कपाळाला हात लावला व ते आपल्याशींच म्हणाले, "आपले ग्रह वाईट त्याला कोण काय करणार ?"

त्यांच्या डोळ्यापुढून गतकालचे घरगुती लढाईचे सर्व प्रसंग जाऊं लागले. अजूनपर्यंत आपण एकही लढाई जिंकूं शकलों नाहीं; उलट दिवसेंदिवस आपण दुर्बल होत आहों असेंच त्यांना वाटलें. लग्नाच्या वेळीं पत्नीचें सौंदर्य पाहून आपण आनंदित झालों व सबंध आयुष्य सुखांत घालविण्याची अपेक्षा केली. पण बिऱ्हाड केल्यापासून एकही दिवस सुखाचा गेला असेल शपथ. अनेक हातघाईवरचे प्रसंग त्यांना आठवले. कजाग बायकांचें वर्णन त्यांनीं ऐकलें होतें, वाचलें होतें. पण आज प्रत्यक्ष अनुभवानें त्यांना त्याची खरी जाणीव झाली. मित्राबरोबर आपण त्राटिका नाटकाला गेलों. परंतु प्रतापरावाची धमक आपल्यांत कधींही येणार नाहीं या कल्पनेमुळें त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची लाज वाटली होती.

आज येणाऱ्या स्नेह्याला जन्मपत्रिका दाखवून हा क्लेश संपण्याची आशा आहे का विचारावें म्हणून ते पंचांग, पत्रिका वगैरे साहित्य घेऊन मित्राची वाट पहात बसले होते. माहेरला जाईन म्हणून एकसारखी धमकी देत असते, पण लग्नापासून एकही दिवस ती कधीं गेली नाहीं. बापानें देखील आपली पोर जिवंत आहे किंवा काय ह्याची चुकूनही चौकशी केली नाहीं. तेव्हां ही साडेसाती आजन्म रहाणार अशी गोविंदरावांची खात्री झाली होती. तरी आशा आंधळी असते; एवढ्याच खातर त्यांनीं मुद्दाम फलज्योतिषी श्रीधरशास्त्र्यांना घरीं आग्रहानें बोलाविलें होतें. गोविंदरावांच्या मनःचक्षूसमोरून एखाद्या करुणरसानें भरलेल्या चित्रपटाप्रमाणें आपल्या गत आयुष्याचे खिन्न देखावे भराभर जात होते.

इतक्यांत दारावर पाय वाजले. गोविंदराव लगबगीनें उठून पुढच्या खणांत गेले.

"या, तुमचीच वाट पहात होतों श्रीधरपंत. या, इकडे खोलींत बसूं." असें म्हणून ते पुढें झाले.

श्रीधरशास्त्री खोलींत येतांच त्यांनीं बाहेर पाहिलें तों सैंपाकाच्या खोलींतून ताकाला फोडणी पडल्याचा चर्रर असा आवाज झाला.गोविंदरावांनीं

हलकेच दाराला कडीकोयंडा गच्च लावून घेतला व ते श्रीधरशास्त्र्यांना म्हणाले, " तुम्हाला घाई असेल जावयाची ? "

" हो " श्रीधरशास्त्री म्हणाले, घरीं येऊन पांच सहा जण बसले होते; तरी तुमच्याकडे बोलून गेलों होतों तेव्हां आलों. तरी मला वाटतें दहा मिनीटें उशिरच झाला. "

" कसलें ! कसलें ! " गोविंदराव विनयाचा आविर्भाव करीत म्हणाले, " तुमचा मी फार वेळ घेत नाहीं. मुलांची पत्रिका दाखविणार होतों; परंतु तुम्हाला वेळ नाहीं; मग माझीच तेवढी पहा जरा. "

श्रीधरशास्त्र्यांनीं आंतील खिशांतून चष्मा काढून डोळ्यावर चढविला व गोविंदरावांनीं पुढें केलेली पत्रिका हातांत घेऊन त्यानीं पत्रिकेंतील ग्रहांचीं घरें मोजण्यास सुरवात केली. गोविंदराव अतिशय अपेक्षेनें श्रीधरशास्त्र्यांच्या तोंडाकडे आ वासून पहात होते. इतक्यांत दार लकटल्याचा धड् असा आवाज झाला. गोविंदरावांच्या छातींत धडकी भरली व त्यांना आतां श्रीधरशास्त्र्यांनाही आपल्याबरोबर आपल्या पत्नीचा प्रसाद मिळतो कीं काय अशी भीति वाटली. परंतु पुन्हा सामसुम झालें.

कांहीं वेळ आपल्याशींच आंकडे मोडून श्रीधरशास्त्री मान वर करून गंभीरपणें म्हणाले, " सध्यां तुम्हांला साडेसाती आहे; पण आतां हीं पहिलीं अडीच वर्षे संपत आलीं; तेव्हा पुढें विशेष त्रास व्हावयाचा नाहीं. परंतु गेलीं अडीच वर्षे तुम्हांला अतिशय त्रासाचीं गेलीं असलीं पाहिजेत. शिवाय तुम्हांला गुरु आठवा असल्यामुळें मानहानि, मानसिक क्लेश फार झाले असणार. "

"हो, बरोबर आहे." गोविंदराव कांहींसे आश्चर्यानें म्हणाले, "अगदीं जुळतें. सुमारें तीन अडीच वर्षें लग्न होऊन झालीं. "

हुंकार देऊन श्रीधरशास्त्री पुन्हा आंकडे मोजून पाहूं लागले. गोविंदरावांकडून कागद घेऊन त्यांनीं गुणाकार, भागाकार, वजाबाकी व बेरीज केली व पुन्हा ते म्हणाले,

" गोविंदराव, पत्रिकेंत आहे तें स्पष्ट सांगायचें तर वाईट नाहीं ना वाटणार ? "

" छे ! छे ! " गोविंदराव दीनवाण्या घाबरट आवाजांत उत्तरले, " स्पष्ट सांगा. वाईट कशाला वाटणार ? नशिबांत आहे तें होणारच. भोगल्या-शिवाय गत्यन्तर नाहीं. सांगा. "

" हें पहा तुम्हाला मंगळ आठवा आहे आणि म्हणून द्विभार्या-योग संभवतो. माफ करा पण हा योग अगदीं समीप आहे. कारण शुक्र वक्री या महिन्याच्या तेराव्याला होतो. निदान मार्गशीर्ष कांहीं उलटून जात नाहीं खास. वाईट वाटूं देऊं नका. पण हें असें आहे. "

" अहो, शास्त्रीबुवा खरं कां हें ? मग मला वाईट कां वाटेल ? मी तेंच मागतों आहे. मग सुटलों ह्या दुःखांतून ! " गोविंदराव पोरकट उतावळेपणानें ओरडले. श्रीधरशास्त्र्यांच्या चेहऱ्यावरचें गांभीर्य नाहींसें होऊन त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें. त्यांनीं विस्मयानें प्रश्न केला, " म्हणजे ? आज तुमचें कुटुंब हयात नाहीं काय ? "

" शास्त्रीबुवा, काय सांगू तुम्हाला ! कुटुंब आहे आणि ह्यातला जर एक शब्द ऐकेल तर मी मेलोंच म्हणून समजा. पण वकीलाकडे, डॉक्टरकडे आणि ज्योतिष्याकडे खरं सांगितलेंच पाहिजे. म्हणून म्हणतों कीं दुसरा विवाह—योग असेल तर मी ह्या दुःखांतून सुटलों. पण ही जिवंत असेपर्यंत मला दुसरें लग्न मेलों तरी करणें शक्य नाहीं. अहो शास्त्रीबुवा, खरंच का द्विभार्यायोग निश्चित आहे ? "

" हो, या कुंडलीवरून तरी स्पष्ट द्विभार्यायोग संभवतो आणि तो-सुद्धां समीप आहे." श्रीधरशास्त्री पुन्हा कुंडलीवर नजर स्थिर ठेवून म्हणाले.

इतक्यांत दार पुन्हा वाजलें. गोविंदरावांची गाळण उडाली. आतां मात्र आपली साडेसाती उभी राहिली असेंच त्यांस वाटलें. आलेल्या पाहुण्यांना सहीसलामत अब्रूनीशीं जाऊं द्या म्हणजे सुटलों असें वाटून गोविंदराव हलक्या स्वरांत म्हणाले, " शास्त्रीबुवा, आपला मी ऋणी आहे. एवढेंच मला विचारायचें होतें. "

गोविंदरावांनीं उठून कोटाच्या खिशांतून आवाज न होईल अशा रीतीनें हलकेच दोन रुपये श्रीधरशास्त्र्यांच्या हातावर ठेवित म्हटलें, " ही फुल नाहीं फुलाची पांकळी म्हणून स्वीकार करा. "

" कांहीं हरकत नाहीं. " असें म्हणून श्रीधरशास्त्री उठले. गोविंदरावांनीं हलकेच दार उघडलें; पण रखमाबाई सैंपाकघरांत अगर न्हाणींत गेल्या होत्या.

श्रीधरशास्त्र्यांना पोहोंचवून गोविंदराव मागें आले. ह्यावेळीं पत्नीनें आपल्याला शिव्या द्याव्या. पण ती कुठें नाहीं हें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. हलकेच त्यानीं सैंपाकघरांत डोकावून पाहिलें; तों रखमाबाई कोनांत बसून हुंदके देऊन देऊन रडत होत्या. गोविंदरावांनीं उभ्या आयुष्यांत रडतांना तिला प्रथमच पाहिलें. यामुळें त्यांचा आपल्या डोळ्या-वर क्षणभर बिलकुल विश्वास बसेना. पत्नीचें सांत्वन करण्याचेंही धैर्य त्यांना नव्हतें. तिनें कां रडावें हें कोडेंही त्याना उलगडेना. गोविंदरावांचे पाय वाजलेले ऐकतांच रखमाबाईंना जास्तच रडूं आलें व त्या ओक्सा-बोक्सीं रडूं लागल्या. परंतु गोविंदरावांस रडण्याचें प्रयोजन काय हा प्रश्न करण्याचें मनोधैर्य नव्हतें. बराच वेळ माजघरांत इकडून तिकडे येर-झाऱ्या घालून त्यांनीं मनाचा हिय्या केला व दारावर उभें राहून त्यांनीं अडखळत कसेबसें विचारलें, " झा—लें काय ? रडत्येस कशाला ? "

रखमाबाई लोळण घेऊन स्फुंदून रडत म्हणाल्या, " माझ्या कर्माला ! मला कांहीं विचारूं नका. दाराच्या फटींतून मी सर्व कांहीं ऐकलें आणि पाहिलें. "

गोविंदरावांची एकदम तारांबळ उडाली. गडगडाटानंतर वृष्टि होते; पण आतां वृष्टीनंतर गडगडाट होणार हें जाणून त्यांचें हृदय धडधडूं लागलें. लवकरच आपल्यावरही रडावयाची पाळी येणार हें जाणून ते घाईनें टोपीखालीं शेंडी झांकून जलद कोट चढवून भाजीची पिशवी घेऊन बाजारांत गेले; परंतु घरीं गेल्यावर आपली पुरी कंबख्ती भरणार हा एकच विचार त्यांच्या मनांत सारखा थैमान घालीत होता.

भाजीपाला खरेदी करून भित भित ते घरीं आले; परंतु सर्वत्र अगदीं अनपेक्षित सामसुम होतें. रखमाबाईंचे डोळे रडल्यामुळें कांहींसे लाल झाले होते. त्या गुपचुपपणें सैंपाक करीत होत्या. गोविंदरावांना ह्या स्थित्यंतराचें भयंकर आश्चर्य वाटलें. स्त्री अनेक रीतीनें सूड घेऊं शकते

असें वाटून ते पत्नीकडे एकसारखे साशंक नजरेनें पहात होते; परंतु त्यांना कांहींच मागमूस लागेना. आंघोळ आटपून ते खोलींत जाऊन बसले, ऑफिसांत नेण्याचे कागद गोळा केले. इतक्यांत रखमाबाई दारावर आल्या व शांत स्वरांत म्हणाल्या, " सैंपाक झाला आहे. तुमचें काम आटोपलें तर चला. "

गोविंदराव एकदम स्तंभित झाले. रोज आपण भित भित सैंपाक झाला का म्हणून विचारावें व चारदां नकार मिळाल्यावर ' बसा एकदांचे तो पाट अन् ताट घेऊन! कोण पोटांत रिघलें आहे कोण जाणे ? ' म्हणून नित्यनियमानें ओरडणारी आपली भयंकर पत्नी आज गोगलगाय कशी झाली त्याचें त्यांना नवल वाटलें. सैंपाक तर बेचव, तिखट, खारट, किंवा अळणी करून ठेवला नाहीं ना, म्हणून गोविंदरावांनीं पानावरचे सर्व पदार्थ चाखून पाहिले, पण जेवण रोजच्यापेक्षां आज जास्तच स्वादिष्ट झालें होतें. रखमाबाई वाढायला आली कीं न जाणों पदार्थांतील पळी कपाळावर बसायची म्हणून गोविंदराव मागें होत होते. पण रखमाबाई मात्र समाधान वृत्तीनें वाढत होत्या. जेवण आटपून गोविंदराव ऑफिसांत गेले. त्यांनीं आपल्या पत्नींतील अनपेक्षित स्थित्यंतर, आपली रोज थट्टा करणाऱ्या मित्रांना मोठ्या बढाईनें सांगितलें. ऑफिसचें काम संपतांच त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें घराकडे धांव ठोकली. कदाचित् कडक लक्ष्मीचा अवतार पत्नी धारण करील या विचारानें त्यांची छाती धडधडूं लागली. रखमाबाई पति येतांच उठल्या व निमूटपणें चहाचें आधण त्यांनीं चुलीवर ठेवलें.

चहा तयार होतांच ओतून देतांना किंचित् स्मित त्यांच्या चेहऱ्यावर झळकलें. गोविंदरावांचा आनंद आतां मात्र गगनांत मावेना. पण एखादा प्रश्न विचारून सहजच आनंदी वाघिणीला आपण चिडवूं म्हणून ते पत्नीशीं कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं घाईघाईनें, श्रीधरशास्त्र्यांच्या घरची वाट धरली. त्यांना पहातांच गोविंदराव नमस्कार करून कृतज्ञतापूर्वक म्हणाले, " शास्त्रीबुवा, खरंच आजपासून मला दुसरी पत्नी लाभली हो ! "

" मी नाहीं सांगितलें ? " श्रीधरशास्त्र्यांनीं मिशांवरून हात फिरवून ऐटीनें म्हटलें, " अहो, आजच शुक्राचा अस्त झाला. पण दुसरी बायको मिळाली म्हणजे काय हो ? "

" अहो, माझी पत्नी एकदम अजिबात बदलली. आतां ती सुशील, सद्‌गुणी, पतिदक्ष झाली. खरंच हो, हा द्विभार्यायोगच म्हणायचा ! तिनें तुमचें आमचें बोलणें ऐकलें व तिला पश्चात्ताप झाला. आपण लवकरच मरणार असें ऐकून तिला अतिशय वाईट वाटलें व मी किती तिच्यामुळें दुःख सहन करतों आहे याची कल्पना येऊन तिला पुरा पश्चात्ताप झाला आहे. शास्त्रीबुवा, धन्य धन्य तुमची. तुम्हाला द्यावी तेवढी दक्षिणा थोडी, पण हें गरीबाचें देणें स्वीकार करा. " असें म्हणून गोविंदरावांनीं पांच रुपयांची नोट पुढें केली. ती घेत श्रीधरशास्त्री खुशीनें म्हणाले, " कांहीं हरकत नाहीं. तुम्ही कुठें जात नाहीं, आम्हीहि कुठें जात नाहीं. आज नाहीं, उद्यां द्याल. पण गोविंदराव, तुम्हाला एक मंत्र सांगतों. तुमच्या पत्नीवर एखादे वेळीं जेव्हां सवतीचें वारें येईल त्यावेळीं पंचांग आणि पत्रिका घेऊन आठवा मंगळ, द्विभार्यायोग वगैरे उच्चार करा, म्हणजे आपोआप ती सवत निघून जाईल. "

हा मंत्र गोविंदरावांनीं लक्षांत ठेवला. त्या दिवसापासून रखमाबाई पतीशीं अतिशय प्रेमळपणें वागूं लागल्या, परंतु पंधरा दिवस महिन्यानें त्या मूळपदावर जात व जोराजोरानें बोलूं लागत. परंतु घाईघाईनें गोविंदराव पेटी उघडून पंचांग व पत्रिकेचें बेंडोळें काढीत असत व मंत्र सुरू करीत असत. तात्काळ रखमाबाईवर त्याचा परिणाम होऊन त्या सौम्यपणें बोलूं लागत असत.

# ' आजोबा. '

" चंदू, " छगनलाल चंद्रकान्ताच्या खोलींत येऊन म्हणाला, " ए डॉक्टर, आपला आजोबा मरून गेला. "

" काय झालं त्याला ? " चंद्रकान्तानें टायची गांठ ओढित प्रश्न केला.

" हार्टफेल (Heart fail) झालें. "

" Was he in love ? " ( त्याचें कुणावर प्रेम जडलं होतं कां ?) दामोदरनें विचारलें.

" Yes, with his opium. " ( होय, अफूवर त्याचें प्रेम होतं. ) छगनलालनें उत्तर केलें. इतक्यांत माधव आंत येऊन ओरडला.

" लेका चंद्या, गांवांत कोण मरतो आहे त्याची चौकशी कर. पण आजोबा अव्वल एकतास मरत होता पण तुझा पत्ता नाहीं. "

" काय झालं त्याला असं एकाएकीं मरायला ? जेवण तरी तयार केलंन् आहे ना ? "

" नाहीं रे; पोळ्याचें पिठ तेवढं भिजवलं होतें. मेस रुममध्यें कधीं मरून पडला कुणाला माहीत. " माधव पुढें म्हणाला, " मला आज अशी भूक लागली होती आणि ह्या आजोबाला मरायला आजचाच कसा मुहूर्त सांपडला ? चल चंद्या, आतां कुठंतरी इराण्याकडे ऑमलेट मारून तरी येऊं. आतां दहा वाजायला आले. दुसरीकडे कुठं जाणार ? "

" पण मधू, कुठं जाते तुम्ही ? " छगनलाल म्हणाला, " आजोबाला सोनापूरला न्यायची काय वार्ता करते ? आजोबाला कोण बी नाय. आजोबा तो आज गेला आणि तुम्ही कसला ऑमलेट खाते ? "

" ए, घीनु रोंटला, " माधव एकदम खेंचकला, " कुठं तरी संध्याकाळींच नगारा भरून आलास असशील. चल चंद्या लवकर. "

इतक्यांत विश्वंभर तेथें आला. त्याला पहातांच दामोदर एकदम ओरडला,

" ये भटा, अगदीं कावळ्याला वास यावा तसा आलास. आजोबाच्या प्रेतविधीला तुझ्यासारखा ऑमलेट, कटलेट खाणारा सोंवळा भटच पाहिजे होता. काय रे भटा, लग्नविधीचें साहित्य कधींच तुला माहीत असणार नाहीं. पण प्रेतयात्रेला काय काय लागतें रे ? "

" तुझ्यासारखे वेरड. एक तूं, दुसरा चंद्या, तिसरा मध्या आणि चौथा छगन. "

" ए आतां उशीर नको. " माधव मध्येंच म्हणाला, " विश्वंभर आणि छगन तुम्ही दोरा, काठी आणखी कांहीं लागेल. ते सामान घेऊन या. आम्ही येतों तोंपर्यंत. बच्चू पण येईल तुमच्याबरोबर. "

चंद्रकान्त सैंपाकाच्या खोलींत गेला तों चंदानी चिरूट ओढीत आजोबाकडे पहात होता. " काय सेक्रेटरी, " चंद्रकान्त म्हणाला, " Hallo Doctor; Our cooking department is closed to night in honour of our grand old cook. " ( या डॉक्टर, आज आजोबासाटीं सैंपाकगृह बंद ठेवण्यांत येत आहे. )

" पण उद्यांची व्यवस्था काय ? " दामोदरनें चंदानीच्या पाठीवर हात मारून प्रश्न केला.

" That's I am thinking." ( त्याचाच मी विचार करतों आहे. )

चंदानी पुढें म्हणाला, " आजोबा ते एक महिन्याचा आगाऊ पगार गेला आहे. "

" हं जमलं तुझं " दामोदर म्हणाला, " आतां आजोबावर बाकी काढशील तेवढी थोडी. ए सेक्रेटरी, कॅश्मीरचे एकदोन सूट कर तूं आतां. पुढच्या महिन्याला माझी सेक्रेटरीशिप आहे. असाच म्हातारा Cook ( सैंपाकी ) पहातों. "

" नाय दामोदर, झुट काय बोलते ? माझा बी पंचविस रुपया त्याच्याकडे बुडला. "

चंद्रकान्त खालीं वांकून आजोबाकडे पहात होता, इतक्यांत विश्वंभर तेथें येऊन म्हणाला,

" चंदू, बघ एकाद्या रंगाच्या पिचकरींतून औषध टोंचून आजोबा उठतो का ! निदान तें पोळ्याचें पिठ तरी फुकट जातां नये.

" भटा, तूं आहेस तरी कोण ? " दामोदर एकदम म्हणाला, " जा लौकर, मग रात्र फार होणार ! पाऊस नाहीं तसे जाऊन येऊं. "

" काय रे चंदानी, " चंद्रकान्तानें प्रश्न केला. " आजोबा मरून एक तास झाला असेल ? "

" अरे डॉक्टर, बसला तसाच मरून गेला. मग खुर्चीवरून नेला पाहिजे म्हणून मी तेला शिधा आडवा केला. म्हाताराला कोण बी नाय, बिचाऱ्याला गांजा आणि अफू हीं दोनच लय आवडत. कोजागरी पोर्णिमेला किती छान घोटा केला होता ! माझा आजोबा, गेलास तूं. आतां खिमा आजि पुलावा कोण करेल रे ? "

चंदानी हेल काढून रडूं लागला. माधवानें त्याच्या पाठीवर भला मोटा आवाज काढला.

" अच्छा, चल चंदू, " माधव म्हणाला, " सगळी तयारी करा हं. आम्ही लगेच येतों. "

चंद्रकान्त आणि माधव इराण्याच्या हॉटेलांत गेले. छगनलाल, विश्वंभर व बच्चू अंत्यविधीचें साहित्य आणण्याकरितां गाडीनें निघाले.

सुमारें अकरा वाजतां सर्व मंडळी परत जमली. छगनलालनें शास्त्रोक्त पद्धतीनें साटी तयार केली. एवढ्यांत विश्वंभर डोकीला पंचा बांधून तेथें आला.

" शाबास भटा, तुम्हां भटांतसुद्धां अशा जाती केल्या पाहिजेत कीं एक भट दहनविधीलाच बोलवायचा; दुसरा लग्नाला, तिसरा मुंजीला आणि विश्वंभर, तूं त्या पहिल्या जातीचा मूळ पुरुष. "

" दाम्या लेका, आम्हा भटाशिवाय तुमचें पान हालायचें नाहीं. तुझ्यासारख्या बाटग्या हिंदूला एकही भिक्षुक मिळायचा नाहीं. त्यापेक्षां तूं धर्मान्तर कर. "

" अरे, आतां भांडायचं नाहीं." चंद्रकान्त मध्येंच म्हणाला, " चला, छगन आणायचा ना आजोबाला ?"

" पण चंदू, तूं हे साहेबी कपडे काढ, धोतर नेसून ये ना."

" नाहीं बुवा," चंद्रकान्त म्हणाला, " उद्यां मला हा सूट कंपनींत टाकायचाच आहे."

एवढ्यांत माधवदेखील अगदीं प्रेतयात्रेचा पोषाख करून तेथें आला.

" Alright ( ठीक ) चला या."

सर्व मंडळी सैंपाकाच्या खोलींत गेली.

" काय रे विश्वंभर," दामोदर चेष्टेनें म्हणाला, " उद्यां त्या पिठाच्या पोळ्या होतील का रे?"

" अगदीं प्रेतावर भाकरी भाजून खाणारा बेरड आहेस!" विश्वंभर एकदम ओरडला.

" आजोबा, काय केला हे! आतां ते पुलावा कोण करेल ? ' छगनलाल रडण्याचा आविर्भाव करीत म्हणाला, " क्लबची शोभा होता तूं. आतां श्रीखंडांत पीठ कोण घालेल? ते भातांत पिठ घालणारा सैंपाकी आम्हाला आतां कसा मिळेल ? आजोबा, तुझ्या ह्या जेवणामुळें बायकोला बी मी विसरलों होतों."

" ए मवाली हॅम्लेट," विश्वंभर ओरडला, " चल लवकर. धर पाय, दामू, तूं पकड मधें. हं उचला."

आजोबाला सर्वांनीं एकदम उचलला.

" अरे चंदू," माधव म्हणाला, " आजोबा अजून नरमगरम कसा रे? म्हाताऱ्याचें हाड वजनदार दिसतें. बराच जड आहे."

" मध्या, काय असा खराब बोलते?" छगनलाल आर्जवानें म्हणाला.

" हं, ए छगन, बाकी हा घी न डब्बो कसा न्यायचा रे ? मला वाटतें, तुला एखादी गोदींतील लॉरीच आणली पाहिजे. छगन, तुझं वजन सहज एकदोन टन असेल नाहीं ?" माधव पुढें म्हणाला, " काय रे, शामळुभाई, सोनापूरची ही तुझी पहिली आणि शेवटची सफर होणार का रे ? कधीं एवढा चालला आहेस का?"

" मध्या, तूं बी मरून जा. आजोबाबरोबरच झोंप इथें. मी एकटाच बघ तुला घेऊन जातें. घाटी, समजला काय तूं?"

" ए भांडतां काय?" दामोदर म्हणाला, " चंदू, तूं लाग पुढें. मी इथें, मध्या तूं धर पाठीमागें. ए सेक्रेटरी, बघतोस काय? पकड. हं उचला."

सर्वांनीं आजोबाचा देह खाटीवर घालून खांद्यावर घेतला. चंद्रकान्तानें साहेबी थाटाचा पोशाख केला होता. चंदानी आपला झोंपण्याचा पट्टयाचा पायजमाच घालून निघाला होता. माधव आणि दामोदर मात्र अगदीं सनातन्याप्रमाणें उघडे बोडकेच प्रेतयात्रेला निघाले होते.

" थांबा हं," असें म्हणून विश्वंभर आंत गेला व पाण्याचें माट घेऊन सिगारेट फुंकित तो पुन्हा बाहेर येऊन म्हणाला, " चला, मडकं पण मिळालें. गळतें आहे तें आणि हा अग्नि पण आहे, म्हणा, जयराम, श्रीराम."

" ए भटा, " छगनलाल मध्येंच म्हणाला, " तिथं संध्या करायला पळीपंचपात्री कुठं घेतलीस ? "

" लेका ! " विश्वंभर एकदम खेंसकटून म्हणाला, " तिथं काय तुझं लग्न आहे ? खरंच दाम्या, आजोबा जर चार तास अगोदर खलास झाला असता तर सलुनांत जाऊन गोटा करून शास्त्रोक्त उपर्णी घेऊन आलों असतों." सर्व मंडळी वसतिगृहाच्या फाटकाबाहेर पडली.

" आतां वात्रटपणा नको हं. " चंद्रकान्त म्हणाला, " रस्त्यावर आपण आलों. अरे, मृत्यूबद्दल कांहींतरी गांभीर्य दाखवा."

सर्व मंडळी कांही वेळ निमूटपणें चालली होती. थंडगार वारा वहात असल्यामुळें रस्त्यावर बरीच सामसुम झाली होती. यावेळीं अकरा वाजून गेल्यामुळें इराण्यांच्या हॉटेलशिवाय बहुतेक दुकानें बंद झालीं होतीं. विश्वंभर अतिशय गंभीर मुद्रा करून आसपास कोणीही दिसतांच रामनामाचा मोठ्यानें उच्चार करीत होता. खाटी चालतांना धक्यामुळें सारखी करकरत होती. आजोबांचें डोकें इकडे तिकडे हेलखावे खात आहे हें पहातांच दामोदर म्हणाला,

" ए आजोबा, या अवेळीं गेलास तो गेलास. आणखी अशी मान काय हलवतोस ? "

" दाम्या, " माधव त्रासिक स्वरांत म्हणाला, " चहा घेतला पाहिजे होता रे येतांना. एकही हॉटेल उघडें नसणार. "

" मग घेऊंया कीं. " विश्वंभर थांबत म्हणाला.

" भटा, चल बघूं निमूट. " चंद्रकान्त म्हणाला, " आणि आजोबाची वाट काय ? "

" त्याला पण चहा पाजूं. " विश्वंभर लगेच उत्तरला, " कदाचित् उठून बसला तर बसला. नाहीं तर फुटपाथवर आमची वाट बघत राहील, तूं आला आहेस ऑमलेट दाबून. "

सर्वांनीं चंद्रकान्तचा व माधवचा नकार असतां चहा घेण्याचा बेत निश्चित केला. नाक्यावरच्या इराण्याच्या हॉटेलच्या बाजूस त्यानीं साटी टेवली व सर्वजण आंत चढले.

" ए सेक्रेटरी, " दामोदर चंदानीस उद्देशून म्हणाला, " या चहाचे पैसे क्लबवर घालायचे हं. ए बॉय, आठ चहा लाव. "

" अरे आठ कोणाला ? " चंद्रकान्त म्हणाला, " आजोबा कांहीं घ्यायचा नाहीं. "

" अच्छा, मी विसरलोंच, सात चहा लाव. "

चहा घेतांना सर्वांच्या गोष्टी सुरू झाल्या. प्रत्येकानें सिगारेट पेटविली. गप्पागोष्टीच्या रंगांत सहज अर्धा तास लोटून गेला. बाहेर शेजारचा सिनेमा सुटल्यामुळें आजोबाभोंवतीं भयंकर गर्दी लोटली होती.

" आतां कसं करायचें ? " चंद्रकान्त चिन्तातुर होऊन म्हणाला, " गर्दी आमची पुरी फजेति करणार. "

" थांबा, मी व्यवस्था करतों. मध्या आणि दाम्या, माझ्याबरोबर या. " असें म्हणून विश्वंभर गर्दींत घुसला. रागाचा आविर्भाव करून धांपा टाकीत तो शेजारच्या गृहस्थास उद्देशून म्हणाला, " काय बदमाष लोकहो, म्हाताऱ्याला कोणी वारसी, गोत्री, आप्तेष्ट नाहीं म्हणून चाळींतल्या चार लोकांना विनवून आणलें. पण इथंच टाकून बदमाश पळाले. तुमच्यापैकीं कुणी जरा हात लावाल का ? "

विश्वंभरची विनंती ऐकतांच गर्दी एका क्षणांत इकडे तिकडे फांकली. अजूनही रेंगाळणाऱ्या एकदोन रिकामटेकड्या गृहस्थांकडे त्यानें मदतीच्या

अपेक्षेनें पहातांच त्यांनींही आपले पाय उचलले. चंद्रकान्त, चंदानी, छगनलाल व बच्चू हॉटेलमधून उतरले. चटकन् साटी उचलून ते हंसें आवरून झपझप चालूं लागले. विश्वंभर रामनामाचा सारखा मोठ्यानें उच्चार करीत चालला होता.

यावेळीं क्वीन्स रोडवर बरीच शांतता होती. मधून मधून अतिशय जोरानें एखादी मोटार जात होती. समुद्रावरून वहाणारा थंडगार वारा अंगाला झोंबत होता. आकाशांत ढगांची गर्दी होत होती व वाराही जोरानें वाहूं लागला; यामुळें लवकरच पाऊस येईल असें वाटूं लागलें; पण ही मंडळी मोटमोठ्यानें गप्पा मारीत व हास्यविनोद करीत चालली होती.

एवढ्यांत दामोदर एकदम उभा राहिला व समोरून चौपाटीच्या पुलावरून येणाऱ्या एका तरुणीकडे पहात म्हणाला,

" मध्या, अरे ही आपल्या क्लासमधली कमला कुलकर्णी आणि बरोबर कोण रे तो ? "

दामोदर पुढें म्हणाला, " चंदू, मी जरा जाऊन येतों. कुठं जाते ती पहातों. "

" नको नको. " विश्वंभर त्याला ओढित म्हणाला, " जाऊं दे तिला कुठं सोनापुरांत. इकडे खांदा लाव अगोदर. अरे, प्रेतयात्रेचें कांहींतरी गांभीर्य राखा. "

इतक्यांत झीमझीम पाऊस पडण्यास सुरवात झाली.

" चला लवकर. " चंद्रकान्त झपझप पावलें उचलीत म्हणाला, इतके दिवस आजोबाला एकसारखा त्रास दिलात; पण त्याचा मेल्यावर तरी त्यानें चांगलाच सूड घेतला. "

" खरंच " माधव म्हणाला, " प्राणाचें वजन कमी झाल्यामुळें मनुष्य हलका झाला पाहिजे. पण हा काय उलटाच प्रकार दिसतो ? मला वाटतें, उद्यां आपल्याला पायसुद्धां हलवायला यायचे नाहींत. "

बोलत बोलत सर्वजण सोनापुराच्या फाटकापाशीं आले. पावसामुळें सर्वांचे कपडे भिजून चिंब झाले होते.

" छगन, " दामोदर म्हणाला, " काय ती सर्व तयारी कर. तोंपर्यंत आम्ही स्टेशनवर जाऊन चहा घेऊन येतों. "

" जलदी ये. मला बी चहा घ्यायचा हाय. "

सर्व मंडळी स्टेशनकडे निघाली. छगनलाल आजोबाची माहिती सांगून परवाना घेत होता.

थोड्याच वेळांत सर्वजण चहा घेऊन परत आले. छगनलालनें सर्व तयारी केलीच होती. आजोबाला उचलून सर्वांनीं आंत नेला. माधव आंतील बांकावर पडून सिगारेट फुंकित होता. विश्वंभर नळावर पाण्याचें माट भरीत होता. एकदम कांहींतरी आठवण झाल्यासारखें करीत तो म्हणाला, " चंदू, तूं मंत्राग्नि दे. आजोबाचें तुझ्यावर फार प्रेम होतें. खरा ब्रह्मचारी तो होता; नाहीं तर त्यानें आपली मुलगी असती तर खात्रीनें तुला दिली असती."

" ए भटा, " मध्येंच दामोदर ओरडला, " तुला न्यायला तुझा जातवाला एकदेखील यायचा नाहीं, तेव्हां इथं आला आहेस तसा विचार कर. पाहिजे तर सुक्याबरोबर ओलंही जाईल."

" अरे घाटी, तुमी हाय तरी कोन ?" छगनलाल चिडून म्हणाला, " Don't mock the death so rediculously " ( मरणाची एवढी थट्टा करूं नका. )

" I think, death is a delightful comedy. " ( मला वाटतें मरण हें एक हास्यकारक नाटकच आहे. ) माधव क्षणभर धुराच्या लोटा· कडे पाहत म्हणाला.

" Yes " चंद्रकान्त गंभीरपणें म्हणाला, " जीवित हें चार अंकीं आनंदपर्यवसायी नाटकच आहे. पहिल्या अंकांत नायकाचा जगाशीं गोड परिचय होत असतो. दुसरा अंक तारुण्यरसानें ओथंबलेला असतो; यांतच विवाहाचा शेवटचा प्रवेश असतो. यानंतर तिसरा अंक कांहींसा गंभीर असतो व त्यांत लहान मोठे दुःखकारक dramatic situations ( नाट्य प्रसंग ) असतात. यांतच नायक जीविताच्या एकच प्याल्याची धुंदि जाऊन जागृत होत असतो. या अंकांतच Climax येतो आणि या जीवननाटकाचा शेवट दुःखी होतो कीं काय अशी भीति व साशंकता मनाला वाटावी, तोंच चौथ्या एकच प्रवेशी अंकांत मृत्यूचा प्रसंग घडून नाटकाचा आनंदपर्यवसायी शेवट होत असतो. नाटकांत निसर्गाची कला अवर्णनीय आहे. "

" चंदू " दामोदर हंसत म्हणाला, " आणि या खेळांत प्रयोगाच्या सोईसाठीं वाटेल ते फेरफार केले जातात असें आपण पहातोंच. "

" ए दाम्या " माधव बांकावर उठून बसत म्हणाला, " जीवनाची एवढ्या बारीक रीतीनें चिकित्सा कधींच करूं नकोस. Smile on your life and mock at your death. " ( जीविताकडे आनंदानें पहा आणि मृत्यूची सारखी चेष्टा कर.)

इतक्यांत विश्वंभरच्या हातून पाण्यानें भरलेलें माट एकदम धाडकन् खालीं कोसळलें.

" ए भटा," दामोदर एकदम खेंचटून म्हणाला, " अगोदरच मोक्ष केलास काय ? "

पण विश्वंभरचा देह थरथर कांपत होता. तो भेदरलेल्या नजरेनें समोर आजोबाच्या देहाकडे पहात होता. सर्वांचें लक्ष साटीकडे गेलें. आजोबाचा उजवा हात वरखालीं होत होता. सर्वांच्या हृदयांत भूतचेष्टेच्या प्रकाराची कल्पना होऊन धडकी भरली. आजोबाचा डावा हातही चालना करतांना दिसूं लागला.

चंद्रकान्तानें धीरानें पाऊल पुढें टाकलें. आजोबाच्या जवळ जाऊन त्यानें त्याच्या छातीवर हात ठेवला व सर्वांकडे पाहून तो एकदम ओरडला, " Heart is working " ( हृदयक्रिया शाबूत आहे.) सर्वांनीं झटपट बंध तोडून आजोबाला उठवून बसविला. बच्चूनें स्टेशनवरून धांवत जाऊन कॉफी आणली.

थोड्याच वेळांत आजोबाची नाडी बरीच सुधारली. श्वासोश्वासही व्यवस्थित होऊं लागला. चंदानीनें बाहेर येऊन टॅक्सी बोलावली. माधव व दामोदर एकसारखे हंसत होते.

" दाम्या, पाहिलास माझा प्रभाव ? " विश्वंभर ऐटींत म्हणाला, " ही ब्राह्मणाची तपश्चर्या बरं. "

" होय, पुलावा आणि मुरगी खाऊन. " दामोदर पुढें म्हणाला, " ए भटा, तुझ्यासारख्या भ्रष्ट भटाच्या मंत्राग्नीनें मुक्ति मिळायची नाहीं म्हणून आजोबाच्या आत्म्यानें शरीरांत पुन्हा संचार केला असावा.

इतक्यांत सर्वांनीं उचलून आजोबाला बाहेर आणून मोटारींत घातला. मोटार अल्पावधींतच वसतिगृहांत आली. चंद्रकान्तानें एक इन्जेकशन् देऊन इतर उपचार करतांच आजोबा सावध झाला.

" काय आजोबा, " दामोदर म्हणाला, " कसं वाटतं आतां ? "

" नाहीं साहेब " आजोबा शरमून म्हणाला, " तुम्ही जेवलां नसाल."

" नाहीं. " माधव हंसत म्हणाला, " आज काय घाई नाहीं. पोळ्या तेवढ्या करा आजोबा. चुलीवर भात झाला असला तर तो खालीं उतरून टाका. "

इतक्यांत भिंतीवरील घड्याळांत एकाचा ठोका पडला. आजोबानें वर पाहिलें व तो अगदीं शरमून गेला.

" आजोबा, " विश्वंभर म्हणाला, " सबंध पगाराची गांजा आणि अफू खाल्लीस वाटतं ? "

" नाहीं शेट, " आजोबा शरमून म्हणाला, " थोडाच खाल्ला. पण काल एकादशीचा उपास केला होता त्यामुळं जरा भोंवळ आली."

" ही बरी तुझी मरणाची भोंवळ. " चंद्रकान्तानें उत्तर केलें.

" पण आजोबा, खरं सांग " विश्वंभर पुन्हां म्हणाला, " पगार किती आटवलास तो—"

" खरंच नाहीं शेट, अजून चंदानीसाहेबांनीं या महिन्याचा पगारबी नाहीं दिला. "

सर्वांनीं चंदानीसाठीं मागें पाहिलें. पण त्यानें कधींच पळ काढला होता. आपल्या खोलींत जाऊन त्यानें गच्च दार मिटून घेतलें होतें.

विश्वंभरानें " ए पिकदाणी चंदानी, दार उघड. " असें म्हणून दार कितीही ठोकलें म्हणून तो तें थोडेंच उघडणार होता ?

# गोड पोरगी.

" रमाकान्त, अलीकडे तूं ऑफिसांत उशिरां कां येतोस रे? कुठं कांहीं नाहीं ना?" दामोदरनें प्रश्न केला.

" छट्! चिट्पाखरूं देखीलनाहीं."

" अरे, कुणाला गप्पा द्या? माझ्या कानावर सगळ्या बातम्या येताहेत."

रमाकान्त स्मित करीत स्तब्ध राहिला. दामोदर पुढें म्हणाला,

" अजाण मुला, मुंबईच्या पोरींवर बिलकुल विश्वास ठेवूं नकोस. अरे, ह्या पोरी शाळेच्या रस्त्यावर तुझ्यासारख्या किती लोकांना गांठत असतील त्याचं वेळापत्रक असतं. दरदिवशीं रविवारशिवाय साडेदहा वाजतां ठाकुरद्वार नाका—रमाकान्त, पोर्तुगीज नाका—दामोदर, ऑपेरा हाऊस कॉर्नर—सुध्या नाईक आणि शेवटीं शाळेच्या दरवाजावर जिम्नॅ-शियम् टीचर्."

" अकालीं वृद्ध झालेल्या तरुण पुरुषा," रमाकान्त हंसत म्हणाला, " मी अगोदर पोरींच्या मागं आहें म्हणून तुला कुणीं सांगितलं?"

" लेका, मला बनविण्याचा व्यर्थ प्रयत्न करूं नकोस. काल आणि आज तुला पाहतों आहें मी—आठ आणि सहा दोन्ही नंबरच्या ट्रॅम्स तूं सोडतोस. थांब, आतां सर्व ऑफिसभर पुडी सोडतों."

" खरंच दामू," रमाकान्त हलकेच म्हणाला, " कुणाला सांगा-यचा नाहींस तर सांगतों."

" अवश्य सर्वांना सांगणार. तुला सांगायचं असेल तर सांग."

दामोदरला रमाकान्ताचा स्वभाव चांगलाच माहीत होता. असली कसलीही गोष्ट तो आपल्यापासून फार काल दडवून ठेवूं शकत नाहीं हें त्याला माहीतच होतं.

" सांगितलंस तर ठार मारीन. " रमाकान्त पुढं म्हणाला, " नेहमीं दहा पस्तीसला एक गोड पोरगी जाते. अजून पत्ता लागला नाहीं. ठाकुर-द्वारालाच कुठं तरी राहते. हंसते किती गोड ! नुसता नेत्रकटाक्ष फेंकून ओंठ दाबून स्मित केलंन् कीं तो कुणीही असो घायाळ झालाच पाहिजे. "

" कोट काढ बघूं. कितीशी खोल जखम झाली आहे ती पाहतों. हो खरंच रमा, आमचे हेडक्लार्क तात्या पण परवां ठाकुरद्वारला घायाळ झाले ते तिचेच पराक्रम वाटतं ! "

" दाम्या, नेहमीं चेष्टा काय ? " रमाकान्त आर्जवानें म्हणाला.

" तूंच अगोदर भूतचेष्टेचा प्रकार सांगितलास. नाहीं तर नजरेनं मनुष्य घायाळ कसा होईल ? मला वाटतं दंग्यांत हिनं पुष्कळ मुसलमान घायाळ केले असतील. "

" शुद्ध गाढव आहेस झालं. " रमाकान्त त्याच्या पाठीवर एक गुद्दा चढवीत म्हणाला.

" गाढव आहे म्हणूनच तर तुझ्या सॅटीन् डगाचं एवढं ओझं नेतों. बरं, आतां मी काय केलं पाहिजे तें सांग. मित्रासाठीं एकवेळ मी चपलसुद्धां खाईन. "

" मग उद्यां मी तुला दाखवतों ती. बरोबर दहा पंचवीसला ठाकुरद्वारच्या नाक्यावर भेट. मग तूं त्या हॉटेलांत बस आणि पहा मौज. "

" अच्छा. पण ती उंचशी आहे का ? भरपूर गोरी असून आणखी पावडर लावते का ? लांब शेपटा सोडते आणि गुंडाळून नेसते का ? आणि हें बघ केंसाचे झुबके मुद्दाम सोडते ना ? एकदम काम Flirt ( नखरेबाज ) आहे ना ? अरे ती काय ! अरेरे दुर्दैवा, असा घात साधलास ! मित्रा रमा, तीच कशी तुझ्या वांट्याला आली ? "

दामोदरनें कपाळावर हात मारला. रमाकान्तानें त्याच्या पाठीवर भला मोटा आवाज काढला. ऑफिसांतील सर्व लोक हंसूं लागले.

" दाम्या, उगाच फाजिलपणा नको. कोण ती ? "

" मग सर्व भूतचेष्टा बरोबर आहेत. " दामोदर मान डोलवीत पुढें म्हणाला, " अरे ती तर चौपाटीपासून महालक्ष्मीपर्यंत आणि दक्षिणोत्तर किंग्ज सर्कलपासून अपोलो बंदरपर्यंत अखिल जगाला ठाऊक आहे. "

" नांव काय तिचं ? " रमाकान्तानें उत्सुकतेनें प्रश्न केला.

" मी समजलों आतां. मला नांव मात्र ठाऊक नाहीं. पण उद्यां नाहीं तर परवां मी तिची सर्व माहिती तुला पुरवितों. रमा, अगदींच मूर्ख कसा रे तूं ? तुला वाटतं का ती तुझ्यावरच खूष आहे ! "

" अलबत्. "

" शरम नाहीं वाटत 'अलबत्' म्हणायला ? म्हणे माझ्यावर कांदेवाडींत दुसऱ्या खिडकींत बसणारी खुष आहे ! तुला एक मंत्र सांगून ठेवतों. ह्या मुंबईच्या पोरींच्या कधीं नादीं लागू नकोस. फार तर तेवढ्यापुरतं हंसावं, पुढं दुसरं कोण मिळालं तर पुन्हा हंसावं. ऑफिसांत आलं कीं काम करावं. झालं ! फुकट मुंबईत चार पावसाळे घालविलेस ! "

" दाम्या, कुठं तरी तुला थप्पड बसली असावी. "

" मला ? अरे माझ्यामागं किती पोरी असतात. पण मी बिलकूल तिकडे लक्ष देत नाहीं. पोरी पोरी त्या काय ? कुठल्याही मुलींच्या शाळे-वरून जाण्याची सोय नाहीं. कारण माझ्या पाठीमागं हा तांडा लागतो. पोरींचें महत्त्व तुला. मला त्याचं कांहींच वाटत नाहीं. "

" बस्स कर तुझे प्रताप ! तरी त्या दिवशीं चौपाटीवर त्या तिघा पोरींनीं जिरवली म्हणून बरं. पण दामू, खरंच तिच्याबद्दल जो आपलेपणा वाटतो तेवढा कुणाच्याचबद्दल वाटला नाहीं." रमाकांत कळकळीनें म्हणाला.

" हें बघ, उन्हाळ्याची सुटी होऊन ती दिसेनाशी झाली मग मला पुन्हा भेट आणि सांग तुझा तो प्रेमभाव कीं आपलेपणा आहे किंवा आटून गेला तो. प्रणयभंगामुळं जीव देण्यास निघालेले वाटेंत कुठल्या तरी पोरीच्या मागं लागून आपला आत्महत्येचा निर्धार पूर्ण विसरून जातात. स्वानुभव बोलतों आहे हा ! समजलास ? "

दामोदरच्या भाषणाकडे रमाकान्ताचें बिलकूल लक्ष नव्हतें. तो पुन्हा म्हणाला,

" खरंच दामू, I will marry her any moment. " ( मी तिच्याशीं कधींही लग्न करीन. )

" अगदींच पागल बनलास. One more victim to woman's flirtations. ( स्त्रीच्या प्रणयचेष्टांना हा आणखी एक बळी ) सारी स्त्रीजात—"

एवढ्यांत रमाकान्तानें त्याच्या पाठीवर जोरानें असा एक गुद्दा ठेवून दिला कीं दामोदर कळवळून " अय्योयो " असें मोठ्यानें ओरडला. अद्याप हेडक्लार्क आले नव्हते यामुळें ऑफिसांत एकदम हंशा पिकला.

" काय रे, कसल्या गोष्टी चालल्या आहेत ? " बनुभाऊंनीं समोरची फाईल उघडीत प्रश्न केला.

" अहो, दुसरं काय ? पोरींच्या गोष्टी असणार. दोन तरुण माणसांना दुसऱ्या कसल्या गोष्टी आठवणार ? " डोंगरे मधेंच म्हणाला.

" अहो वृद्ध, " दामोदर त्याला चिडवीत म्हणाला, " डोंगरासारखा दिसतोस तेवढाच. आपली कन्यका उपवर व्हावयाला अजून तरी निदान दहा पंधरा वर्षे आहेत. तेव्हां तूर्त आपण निर्धास्त असा. आमचं अजून वय आहे. चालायचंच असं. "

एवढ्यांत साहेब येत असल्याची हवालदारानें वर्दी दिली. यामुळें सर्वत्र एकदम धांदल झाली. अजूनपर्यंत टेबलावर पाय टाकून सुपारी चघळणारे किंवा खुर्चीवर रेलून वामकुक्षी करणारे कारकुन घाईघाईनें कागद उघडून कामांत गर्क असल्याप्रमाणें स्तब्ध झाले. बाजूला टाईपरायटरचा खडखडाट सुरू झाला.

" घरांत बायकोलादेखील तुम्ही असेच घाबरत असाल. " दामोदरनें निष्काळजीपणानें म्हटलें.

संध्याकाळीं ऑफिस सुटल्यानंतर रमाकान्तानें व दामोदरनें उद्यां दहा वीसला ठाकुरद्वारच्या इराणी हॉटेलांत भेटण्याचा बेत निश्चित केला.

रमाकान्तानें त्याला अगदीं न चुकतां येण्याबद्दल पुन्हा पुन्हा बजावल्या-नंतर दोन्ही मित्र आपल्या घरीं गेले.

दुसऱ्या दिवशीं कधीं एकदां ऑफिसांत जाण्याची वेळ होते असें रमाकान्ताला झालें होतें. ती आपल्याला पहातांच किती गोड हास्य करील, मानेला किती सुंदर मुरड देईल, हंसतांना तिच्या गालाला किती मोहक खळी पडते, रस्ता ओलांडण्याच्या निमित्तानें थांबून आपल्याकडे ती कशी पुन्हा पुन्हा पहाते, या साऱ्या गोष्टी त्याच्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. दामोदर तिला पहातांच आपलें अभिनंदन करून प्रोत्साहन देईल या मधुर कल्पनेमुळें तो अतिशय अस्वस्थ झाला होता.

एवढ्यांत जेवणाची वेळ झाली. घाईघाईनें जेवतांना पाहून आईनें त्याला प्रश्न केला तेव्हां तो अतिशय ओशाळून गेला. त्याच्या मनात अनेक विचारांचें काहूर चाललें होतें. ‘ जर कदाचित् ती आज शाळेंत गेली नाहीं तर ’ या विचारानें क्षणभर तो अस्वस्थ झाला. पण अशा कल्पनेस मनांत त्यानें बिलकुल थारा दिला नाहीं.

थोड्याच वेळांत जेवण आटपून तो आपल्या खोलींत गेला. कालच कंपनींतून आणून घातलेला हनावाचा सूट बदलून त्यानें चायना सिल्कचा सूट चढविला. गळ्याभोंवतीं बांधण्याकरतां उचललेली प्रत्येक दुटल् टाय् बदलून शेवटीं एक रंगसंगति साधेल अशी टाय् त्यानें बांधली. केंसाचा झोंकदार भांग पाडून त्यानें ब्रशानें केंस मागें सारून व्यवस्थित बसविले.

समोर उभ्या असलेल्या कपाटाच्या आरशांत आपला पेहराव आणि रुबाब पहातांना तो आपल्याशींच हंसत होता. कपाटाच्या खणांतून त्यानें पाविया लोशनची बाटली काढली व त्याचे चार थेंब हातरुमालावर उडवून त्याची घडी करून तो त्यानें वरच्या खिशांत ठेवला.

इतक्यांत रमाकान्ताची धाकटी बहीण इंदिरा कॉलेजांत जाण्याची वेळ झाल्यामुळें पुस्तकें गोळा करण्याकरतां आली. खोलींत सुटलेला अत्त-राचा सुवास आणि रमाकान्ताचा सर्व रुबाब पाहून ती हलकेच हंसत म्हणाली,

“ दादा, ऑफिसांसच चाललास ना ? ”

रमाकान्त एकदम चपापला. चाललेली आपली सजावट ताईच्या लक्षांत आली हें जाणून तो तत्काळ म्हणाला,

" हो, कां ? आपल्याला कॉलेजांत चाललों असं वाटलं कीं काय ? बी. ए. होऊन मला दोन वर्षे झालीं, समजलीस ? तुझं पहिलंच वर्ष आहे. जरा सांभाळूनच हं ताईसाहेब !"

" दादा, हें कांहीं साहेबावर खास इम्प्रेशन नाहीं. मला वाटतं साहेबाची छोकरी ऑफिसांत येत असावी. "

एवढं बोलून इंदिरा तेथून निसटली; नाहीं तर रमाकान्तानें एक चांगलीच थप्पड लगावली असती.

थोड्याच वेळांत रमाकान्तही बाहेर पडला. रस्त्यांत भेटणाऱ्या परिचित लोकांस दुरूनच हात वर करून सलामी देत त्यानें ठाकुरद्वारचें नाकें गाठलें. समोरच्या इराणी हॉटेलांत त्याची दृष्टि गेली. सुदैवानें रस्त्याचा विस्तृत भाग जेथून दिसतो त्याच टेबलाजवळच्या खुर्च्या रिकाम्या होत्या.

रमाकान्तानें आंत जाऊन एका खुर्चीवर आपली हॅट टेवली व जवळच दुसऱ्या खुर्चीवर बसून दामोदरची तो वाट पाहूं लागला.

" कंब साब आपकु कॅ चाहिये ? " इराणी जवळ येऊन म्हणाला.

" दो नारींगी लाव. " रस्त्याकडे पहात रमाकान्त उत्तरला.

" दो नारींगी ? "

" नै, नै, एक लाव. " रमाकान्त भानावर येऊन म्हणाला.

वेळ जसजसा जाऊं लागला तसतसा रमाकान्त उत्सुकतेनें दामोदरची वाट पहात होता. दहा वीस होऊन गेले तेव्हां तर त्याला दामोदर अजून आला नाहीं म्हणून अतिशयच राग आला.

इतक्यांत समोरून दामोदरची स्वारी येतांना दिसली.

" दाम्या, सव्वा दहा झाले नाहींत वाटतं ? "

" अरे सव्वा दहा झाले काय आणि अकरा वाजले काय हिशोब एकच. " दामोदर गंभीर मुद्रा करून पुढें म्हणाला, " अरे त्या शाळेच्या

प्रिन्सिपॉल हार्ट फेल होऊन कालच वारला; त्यामुळं आज रजा आहे. खरंच खोटं नाहीं सांगत ! माझी शपथ, तुझी सगळी तयारी फुकट गेली. प्रिन्सिपॉलचं आणि तुझं कांहीं भांडण होतं का रे ? नाहीं तर त्यानं हाच दिवस कशाला शोधून काढला ? एक दिवसदेखील त्यानं मुलांना फुकट रजा दिली नसती. खात्रीनं रविवारच पसंत केला असता. बरं आतां काय ! Don't be discouraged. Better luck next time. ( निराश होऊं नकोस. दुसऱ्या वेळीं निःसंशय यश. ) "

रमाकान्ताचा चेहरा एकदम उतरला. क्षणार्धांत कल्पनेनें बांधलेले सुंदर मनोरे धसकन् खालीं आले. सर्व परिस्थितीचा त्याला अतिशय तिटकारा वाटला व यापुढें तिचा पूर्णपणें नाद सोडायचा असा त्यानें आपल्या मनाशीं निर्धार केला. जणूं काय हा सर्वस्वी तिचाच अपराध होता, असेंच त्याला वाटत होतें. खिन्न चेहरा करून तो खुर्चीवरून उठला.

" अरे ए, चाललास कुठं ? तें drink तर घे खरं. In hot moments it keeps you cool ( अस्वस्थ मनोवृत्तींत तेंच चित्तवृत्ति शांत ठेवतें.)" दामोदरला त्याच्या त्या केविलवाण्या मुद्रेकडे पाहून राहवेना.

" रमा, इतका पागल कसा झालास रे तूं ? घाबरूं नकोस. शाळेला रजा नाहीं कांहीं नाहीं." दामोदर इराण्यास उद्देशून पुढें म्हणाला, " ए बॉय, और एक नारींगी लाव. "

" दाम्या, भलत्याच वेळीं थट्टा काय करतोस ? " रमाकांताच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य झळकलें. ग्लासांतील पेयाचा घोंट घेऊन तो पुढें म्हणाला, " ती बरोबर दहा पस्तीस ते दहा चाळीसपर्यंत या बाजूनं अशी जाते. तूं इथं बस. मी त्या स्टँडकडे उभा राहतों. बघ कशी गोड पोरगी आहे, ती कशी गोड हंसेल ! "

" आणि मी काय करूं इथं ? वेड्या, अगदींच कसा रे गाढव झालास ? ज्या पोरीचं तुला नांव माहीत नाहीं, गांव माहीत नाहीं, पण तिला मात्र सारा गांव ओळखतो आहे, अशा पोरीच्या नखऱ्याला आणि चेष्टांना भुलणारा लंबकर्ण मी पाहिला नव्हता कधीं. तुझी बिलकूल ओळख नसतांना तुझ्याशीं फिदी फिदी हंसणाऱ्या पोरीच्या मोहांत सांपडतोस तेव्हां काय म्हणावं तुला ? "

" दाम्या, खरोखर आतां ग्लास फेंकीन. काय म्हणशील तें म्हण. पण I am going to marry her. " ( मी तिच्याशीं लग्न करणार. )

" Hearty condolences " (अनिष्ट चिंतन करतों.) दामोदर हस्तान्दोलन करीत म्हणाला.

" लेका, लक्षांत ठेव. लग्न झाल्यानंतर तूं तिला काय म्हटलंस तें सर्व कांहीं तुझ्यासमक्ष तिला सांगणार."

" अरे मग पदरीं पडलं, पवित्र झालं. शिवाय मी तुला तिच्याशीं लग्न करूं देईन तर ना ? "

" बरं. इथं तूं बस, ती येईल एवढ्यांत. " असें म्हणून रमाकांत हॉटेलच्या बाहेर पडला.

साडेदहा वाजून गेल्यामुळें ऑफिसमध्यें आणि शाळेमध्यें जाणाऱ्या गृहस्थांची व विद्यार्थ्यांची जिकडे तिकडे रहदारी आणि घाई चालली होती. त्या धांदलींत रमाकांतकडे विशेष कुणाचें लक्ष जात नव्हतें. तरी देखील सर्व लोकांचें आपल्याकडे लक्ष आहे असेंच त्याला वाटत असल्यामुळें तो सभोंवार साशंक नजरेनें पहात होता.

एवढ्यांत समोर बस उभी राहिली. कंडक्टर, रमाकांताला आंत चढायचें आहे ह्या अपेक्षेनें दोरीला हात घालून वाट पाहूं लागला. रमाकांतानें दुसऱ्या बाजूला नजर वळविली. बस पुन्हा चालू झाली. आपल्या कृतीचें त्याला अतिशय वैषम्य वाटलें.

थोड्या वेळांत दहा पस्तीस वाजून गेले. तरी ती येते कीं नाहीं या विचारानें रमाकांत अतिशय अस्वस्थ झाला. वेळ जसजसा जाऊं लागला तसतसा आतुरतेनें तो तिच्या रस्त्याकडे पाहूं लागला. दूर दिसणारी प्रत्येक तरुणी तीच असावी अशा कल्पनेनें क्षणमात्र त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण उत्सुकता दिसत असे. पण अल्पावधींतच त्याची पुन्हा निराशा होत होती.

या सुमारास शाळेंत जाणाऱ्या बहुतेक सर्व मुली निघून गेल्या. तेव्हां मात्र रमाकांत एकदम हताश झाला. त्याचा प्रेमभंग झाल्याप्रमाणें त्याची

चर्या उदासीन झाली व यापुढें त्या पोरीचा सर्वस्वी नाद सोडायचा असा पुन्हा एकवार त्यानें मनाशीं निर्धार केला.

इतक्यांत समोरून पोपटी रंगाचें जॉर्जेट नेसून येणारी तरुणी त्याला दिसली !

रमाकान्ताचा चेहरा एकदम आरक्त झाला. तिचा रुबाब आज विशेषच दिसत होता. तिनें लांब काळ्याभोर केसांची सुंदर वेणी पाठीवर सोडली होती. बिनबाह्यांचा पिस्ता रंगाचा ब्लाउझ अंगांत असल्यामुळें तिचा गौरकांति गोंडस मांसल बाहू त्या रंगामुळें विशेषच उठावदार दिसत होता. कानांत घातलेले डूल हालत असतांना सारखे चमकत होते. शाळेची वेळ झाल्यामुळें डाव्या हातानें पदर कम्बरेशीं लपेटून चालतांना तिच्या बांधेसूद शरीरसौष्ठवाची कल्पना येत होती.

रमाकान्तानें आपले चेहऱ्यावरील विकार दडविण्याकरतां कीं काय हातरुमालानें तोंड पुसलें व क्षणभर लक्ष नसल्याप्रमाणें तो दुसरीकडे पाहूं लागला. पण अगदीं न कळतच त्याची मान तिच्याकडे वळली. परस्परांचें नेत्रमीलन होतांच किंचित् अधर दाबून धरून तिनें गोड हास्य केलें व तिच्या गालावर मोहक खळी पडली.

रमाकान्ताच्या हृदयांत विलक्षण कालवाकालव झाली. त्यानें हंसण्याचा किंचित् प्रयत्न केला. परंतु तो अगदीं गोंधळून गेला होता.

ती शाळेच्या रस्त्याकडे वळतांना दोन वेळां मागें बघून दृष्टीआड झाली. तेव्हां रमाकांत पुन्हां हॉटेलांत आला.

“ काय दामू, पाहिलीस ना ? कशी आहे पोरगी ? दे चहा आतां. ”

पण दामोदरचा चेहरा एकदम गोरामोरा झाला होता. क्षणभर शून्य दृष्टीनें तो रमाकान्ताकडे पहात होता.

“ काय दाम्या, कसा आहे माझा Choice ! ” ( निवड ) रमाकान्त त्याला गदगदां हलवून म्हणाला.

“ She is my younger sister, Mina. ” ( ती माझी धाकटी बहीण मीना. ) दामोदर अगदीं ओशाळून खालीं पहात म्हणाला.

रमाकान्ताला काय बोलावें हेंच सुचेना. लाजेमुळें त्याचा चेहरा एकदम लाल झाला होता. समोरून जाणाऱ्या धांवत्या ट्रॅममधें त्यानें पटकन् उडी मारली आणि घरचा रस्ता धरला.

दामोदर आश्चर्यानें त्याच्याकडे पहात उभा होता.

त्या दिवसापासून रमाकान्तानें प्रकृति ठीक नसल्याच्या निमित्तानें आठ दिवस किरकोळ रजा मागून घेतली.

त्याच्या रिकाम्या खुर्चीकडे पाहून दामोदर रोज आपल्याशींच हंसत असे !

# पूर्व आणि पश्चिम.

लिला लहानपणापासून आपल्या वडीलांबरोबर वाटगडांतील मिशनऱ्याकडे जात येत असे. यामुळें तिला गोऱ्या लोकांविषयीं विशेष मोठेपणा असा वाटत नसे. घरीं येऊन ती आपल्या आईला म्हणत असे,

" आई, साहेबलोकांसारखे आम्ही चमच्यानें टेबलावर जेऊं या ग. आणि आई, उद्यांपासून मी फ्रॉक घालणार हं. मला परकर नको बाई. आई, होय ना ? "

शारदाबाईंचें लक्ष लिलेच्या बोलण्याकडे बिलकुल नव्हतें. पण लिला त्यांच्या मांडीवर बसून त्यांचें तोंड फिरवून लडीवाळपणें पुन्हा म्हणाली,

" आई, म्हण ना होय म्हणून. "

" मग पहातें काय तें. " शारदाबाईंनीं निष्काळजीपणें उत्तर केलें.

" तसें नको बाई. होय म्हण ना आई. " लिला आर्जवानें म्हणाली.

" हो, हो, हो. तूं त्यांच्याकडेच रहा. इकडे येऊंच नकोस."

" आई, रागानें सांगूं नकोस. हो ना ग ? " लिला केविलवाण्या मुद्रेनें त्यांच्याकडे पहात म्हणाली.

" रागानं नाहीं, खरंच सांगत्यें होय म्हणून. जा आतां खेळायला."

लिला आनंदानें उड्या मारीत बाहेर गेली. एवढ्यांत नानासाहेब तिथें आले.

" काय चाललं होतं लिलुचं ? "

" लिलुला त्या मिशनऱ्याकडे घेऊन जातां अन् घरीं मला ती त्रास देते. काल त्या मिशनऱ्याच्या पोरीनं—जोन्नें तिला तें चॉकलेट दिलं आणि तुझ्या आईला दिलं आहे असं सांगितलं. ही आली, मला एकसारखा आग्रह करूं लागली. मी किती सांगितलं तूंच खा म्हणजे मला पोहोंचलं.

पण छे ! मग शेवटीं जेव्हां कुठं थप्पड दिली तेव्हां गेली खेळायला. त्या चॉकलेटला तरी काय सुवास येत होता म्हणून सांगूं ! माझं डोकं अद्याप दुखतं आहे त्या मेल्या घाणीनं ! ”

शारदाबाईंचें हें त्राग्याचें भाषण ऐकून नानासाहेब हंसत म्हणाले, “ तुला पण तें चॉकलेट खायला काय झालं होतं ? पण तुम्ही या अशाच—”

“ त्या बाटग्याकडचं कोण खाईल हो ? तुम्हीच तिकडे चहा, केक् आणि काय तें खा. मात्र लिलेला तिकडे घेऊन जात जाऊं नका. उगाच लोकांत बडबड व्हायची. ”

“ खुशाल बडबडूं द्या लोकांना. पांच वर्षांच्या पोरीला कसली शुद्धि आणि कसली जात ! सर्वांना म्हणावं आमची लिली ख्रिश्चनकडे जेवली आहे. कोणी जात टाकली तर टाकली. ”

“ तुम्हाला काय, सर्वच सारखं. ” शारदाबाई रागाचा आविर्भाव करून म्हणाल्या, “ पोरीचं लग्न तर करायचं आहे ना ? ”

“ नाहीं का होईना ” नानासाहेब बेफिकीरपणें हंसत म्हणाले, “ तीच जमविल आपलं लग्न. त्यांत कुठं बिघडलं कांहीं ? ”

शारदाबाईंना पतीच्या ह्या भाषणामुळें थोडंसं वाईट वाटलें व त्यांनीं निरखून त्याच्याकडे पाहिलें. नानासाहेब हंसत पत्नीच्या समाधानासाठीं पुन्हा म्हणाले,

“ अग, त्याची येव्हांपासून काळजी कशाला ? तोंपर्यंत जग काय पालटेल याची कल्पना तरी आहे का तुला ? ”

इतक्यांत लिलेनें धांवत येऊन नानासाहेबांच्या कम्बरेस मिठी घातली व मान वर करून लडिवाळपणें पित्याकडे पहात तिनें प्रश्न केला,

“ नाना, आज जोननें आणि जॉननं खेळायला बोलावलं आहे. न्याल का मला तिकडे ? ”

“ चल, वेडी पोर. माझं सांगितलेलं ऐकत नाहींस. मी तुझ्याशीं बोलणारसुद्धां नाहीं. ” नानासाहेब तिची मिठी सोडविल्यासारखें करीत म्हणाले.

" अहं, नाहीं नाना, आजपासून ऐकेन. अगदीं. पण न्याल ना ?" लिला काकुळतीनें म्हणाली.

" न्या तिला आणि तिकडेच ठेवा. नाहीं तर त्या जॉनशीं लग्न करून द्या. परत कधींच येऊं नकोस तूं." शारदाबाई रागाचा आविर्भाव करीत कौतुकानें म्हणाल्या.

लिला ही त्या दोघांची नवसाची एकुलती एक मुलगी होती. लिलेच्या जन्मापासूनच नानासाहेबांच्या वकीलीचा उत्कर्ष सुरू झाला होता व ते लोकप्रिय व विद्वान् म्हणून समाजांत गणले जात होते. ते कुठेही सभेस किंवा समारंभास जातांना लिलेला बरोबर नेत असत. यामुळें ती सभाधीट झाली होती. नानासाहेब अध्यक्ष असतांना व्यासपीठावर बसले तरी लिला मात्र आपल्या प्रथमच्या जागींच न घाबरतां बसत असे. ती आपल्या आईप्रमाणेंच रूपवान आणि गोरी होती. सुशिक्षणामुळें तिच्या चेहऱ्यावर सौजन्य आणि आनंद स्पष्ट दिसत असे.

नानासाहेबांची व मिशनऱ्यांची ऐकमेकांकडे फारच ये जा होती. त्यांचें हिंदुस्थानच्या सामाजिक, राजकीय आणि आध्यात्मिक परिस्थितीवर संभाषण चालत असे. त्यावेळीं लिला, जोन आणि जॉनशीं समोरच्या बगीच्यांत खेळत असे. लिला त्याच्याच शाळेंत शिकत होती. यामुळें तिला कांहीं इंग्रजी शब्द व वाक्यें समजत होतीं. त्यावेळीं जोन बारा वर्षांची, जॉन दहा वर्षांचा व लिला सात आठ वर्षांची होती. जोन व जॉनला मराठी बोलण्यास फार हौस वाटे व तीं दोघें आपल्या बटलरशीं व दाईशीं मराठींत बोलत असत. यामुळें लिलेशींदेखील त्यांचा मराठींत संवाद चालत असे.

" आमची मॅम व पपा उटकमंडला जाणार आहों. तुम्ही येशील का लिली?" जोननें प्रश्न केला.

" नाहीं; माझी आई मला परवानगी देणार नाहीं." लिलेनें उत्तर केलें.

" परवानगी म्हणजे परमिशन् काय?" जोननें पुन्हां विचारलें.

" होय, आमची भाषा चांगली बोलायला तुम्हाला पुष्कळ वेळ लागेल."

“ होय ” जोन पुढें म्हणाली “ तुमची भाषा चांगली नाहीं. त्यांत बराच खराब आहे, हें तुमचे पपा माझ्या मॅमला सांगत होते. ”

लिलेला काय उत्तर द्यावें हेंच कळेना. ती विषय बदलण्याकरतां म्हणाली,

“ जोन, तुम्ही उटकमंडहून परत कधीं येणार ग ? ”

“ आम्ही येणार जूनच्या दहा तारखेला. पपा इथेंच रहाणार. ”

“ जॉन तूंसुद्धां जाणार का ? रहा ना माझ्याबरोबर खेळायला ? ” लिला विनवित म्हणाली.

“ आम्हाला इकडे फार गरम होतें.” जॉन बुटाचे दोरे बांधित उत्तरला.

याप्रमाणें त्यांचा संवाद चाले व नंतर तीं लहान सायकलवर बसून बंगल्याभोवतीं फेऱ्या घालीत असत.

कांहीं दिवसांनंतर उन्हाळ्याची रजा संपवून उटकमंडहून पुन्हा जोन व जॉन परत आलीं. प्रथम प्रथम लिला त्यांच्याशीं अनोळखीपणें वागूं लागली; पण कालान्तरानें पुन्हा त्यांचा स्नेह झाला. लिला मराठी शिक्षण पुरें करून इंग्रजी शाळेंत गेली. यामुळें त्यांचा स्नेह उत्तरोत्तर वाढत गेला. लिलेनें पहिली यत्ता करून दुसरींत उडी घेतली. तिला पुष्कळच चांगलें इंग्रजी बोलूं येऊं लागले.

दिवसामागून दिवस जात होते. जोन आतां मोठी झाली होती. लवकरच तिला उत्तर हिंदुस्थानांतील साहेबांच्या मुलांच्या शाळेंत पाठविण्याचें तिच्या आईबापांनीं ठरविलें. तिचा निघण्याचा दिवस आला.

“ गडे जोन, मला विसरूं नकोस हं. ” लिलेनें तिचा हात धरून स्निग्ध स्वरांत म्हटलें.

“ कां बरं विसरणार ? ” ती आपल्या भाऊला उद्देशून म्हणाली, “ जॉन, मला लिलीविषयीं लिहिण्यास विसरूं नकोस हं ? ”

दोघींचा करार झाला. जोनची निघण्याची वेळ झाली. तिच्या आईनें तिला कांहीं उपदेश केल्यावर तिचा मुका घेतला. नंतर जोन व

एक साहेबीण मोटारींत बसली. मोटार फडफडूं लागली. जॉननेंही मोटारच्या पत्र्यावर उभें राहून तिचा मुका घेतला.

मोटार चालू झाली. सर्वांनीं हात हालवून 'Good-bye' असें म्हणून निरोप दिला. लिलेचा कंठ दाटून आला. तिच्या डोळ्यांत पाणी आलें होतें, तें पुसून ती खिन्न स्वरांत म्हणाली,

"जॉन, तुम्हाला जोन गेली म्हणून वाईट वाटत नाहीं काय ?"

"कशाला ? ती गेली शिकायला आणि वाईट कां वाटणार ?"

"आमच्याकडे असं कोणी जाऊं लागलं कीं रडतात व आम्हाला फारफार वाईट वाटतें."

"Therefore you are Indians." (म्हणूनच तुम्ही हिंदि.) जॉननें तात्काळ हंसत उत्तर केलें; पण लिलेनें तिकडे लक्ष न देतां फाटकां-तून बाहेर जाणाऱ्या मोटारकडे नजर लावली.

"चल लिली, आपण सायकलवर बसूं. जोनची सायकल आहे तुला." असें म्हणून त्यानें लिलेचा हात धरला व ती खेळण्यास नाखुष असतांही तो तिला घेऊन गेला.

दिवसामागून दिवस गेले. महीने गेले. कांहीं वर्षेंही उलटलीं. शारदाबाईंना नव्हे तर नानासाहेबांसही आतां लिला जरा मोठी वाटूं लागली व यामुळें ते आतां लिलेला विशेष मिशनऱ्यांकडे नेत नव्हते. जॉनदेखील मसुरीस शिकावयास गेला होता. यामुळें तिलासुद्धां तिकडे विशेष जावें असें वाटेना. परंतु क्वचित् प्रसंगीं साहेबीणीनें आग्रहाचें बोलवणें पाठविलें म्हणजे ती नानासाहेबांबरोबर जात असे. साहेबीण तिला नेहमीं विचारीत असे, "लिली, तूं काय होणार?"

लिला मंद हास्याशिवाय कांहींच बोलत नसे. मग बाई नानासाहेबांस वळून म्हणे, "मिस्टर नाना, तुम्ही हिला कॉलेजांत पाठवा. ही पोर चलाख आहे. माझ्या मुलाहून हिची बुद्धि मला जास्त तीक्ष्ण दिसते."

"तुम्ही म्हणतां हें जरी खरं असलं तरी मुलीला शिकविणं आम्हास फार कठीण जातें. पहिलें म्हणजे त्यांच्या विवाहाला बिकटपणा येतो. दुसरा त्यांच्या शीलाचाही प्रश्न असतो, आणि तिसरं म्हणजे सांपत्तिक अडचण

होय. शिवाय कॉलेजमधल्या मुलींत कांहींतरी शारीरिक व्यंग असावं, नैतिक आचरण संशयास्पद असावं आणि सुगृहिणी आणि सुमाता होण्यास त्या नालायक असाव्या असा सर्वसाधारण समज असतो. ”

“ मिस्टर नाना, आमच्याकडे ह्या अडचणी केवळ मुली शिकल्या म्हणून कधींच भासत नाहींत. ”

“ बरोबर आहे ” नानासाहेब पुढें म्हणाले, “ तुमच्या समाजाचं जरी आम्ही अनुकरण करण्याचा प्रयत्न केला व वरकरणी आम्ही आमचें आचरण तसं दर्शविलं तरी मानसिक बदल आमच्यांत बिलकुल झाला नाहीं. ”

“ मि. नाना, मग तुम्ही आमच्याकडे चहा घेतां यासाठीं तुमचा समाज तुम्हाला दोष देतो काय ? ”

“ नाहीं. याचं कारण आज रोटीव्यवहारास निदान चहा घेण्यानं समाजास विशेष कांहीं वाटत नाहीं. पण चार दिवस मी जर तुमचा पाहुणा म्हणून राहिलों तर मात्र पुराणमतवादी लोक कुजबुजूं लागतील. फार कशाला, लिलीला मी इकडे आणतों म्हणून घरांतून माझ्याशीं वाद-विवाद होत असतात. ”

“ कां, तुमची बायको अशिक्षित आहे काय ? ” साहेबीणीनं प्रश्न केला.

“ तसें नाहीं. पण लिलीला मी इकडे घेऊन येतों यामुळें तिचा विवाह जमविणं कठीण होत जातं हें खरं आहे; कारण साहेबांच्या मुलाबरोबर खेळली–खिदळलेली मुलगी नवऱ्याच्या मनाप्रमाणें कशी वागेल आणि हिंदु कुटुंबांत कशी नांदेल असंच आमच्या समाजास वाटतं. शिवाय ह्या शिकलेल्या मुली स्वतःच्या हक्काच्या जाणीवेमुळें आमच्या हिंदु विवाहसंस्थेस विघातक होतात. ”

“ तुमच्या ह्या अडचणी काल्पनिक आहेत असं मला वाटतं. ” बाई म्हणाली.

“ बिलकुल नाहीं. तुम्ही लिलीचेंच चरित्र पहाल पुढें. तिची आई म्हणते तें बरोबर आहे असंच मला वाटतं. परंतु तिचे लग्न झालें

नाहीं तर ती जीवनक्षम असली पाहिजे एवढ्याचसाठीं मी तिला शिक्षण देत आहें."

इतक्यांत जेवणासाठीं घंटा झाली. त्या घंटेची सूचना नानासाहेबांनींही घेतली.

थोड्याच वेळांत नानासाहेबांनीं मिसेस डन्लेशीं हस्तान्दोलन करून निरोप घेतला.

तो दिवस रविवारचा होता. दोनप्रहरचा चहा घेऊन नानासाहेब Modern Review चा अंक घेऊन आरामखुर्चीवर वाचीत पडले होते. जवळच्या दुसऱ्या खुर्चीवर बसून शारदाबाई मराठी कादंबरी वाचित होत्या. टेबलावर पडलेल्या निमंत्रणपत्रिकेकडे पाहून त्या म्हणाल्या "विचारणार होतें. लिलेच्या लग्नाची कुठं चौकशी चालली आहे का ? तिला सोळावं वर्ष पुरं होत आलं. लिला अधिक शिकली तर तिच्या शिक्षणाला शोभेसा नवरा नको का मिळायला? आपल्याजवळ एवढा पैसा तरी कुठं आहे ? "

"करतों आहें तपास. उगाच आम्ही कुठं तरी ठरवायचं आणि तिला आपलं जन्माचं नुकसान केलं असं वाटायचं यात काय अर्थ आहे ? "

शारदाबाईनीं उसासा टाकला व आलेले अश्रू दडविण्याकरतां त्या आंत उठून गेल्या. इतक्यांत लिला तिथें आली व म्हणाली,

"नाना, मिसेस् डन्लेनीं मला जोनकडून आलेलें पत्र दिलें. तिला मी हें उत्तर लिहीलें आहे. पहातां का जरा तपासून ?"

नानासाहेबांनीं पत्र वाचलें. एखादी चूक दाखवून ते म्हणाले,

"पण जॉनविषयीं कांहींच चौकशी केली नाहींस ती?"

लिलेला काय उत्तर द्यावें तेंच समजेना. क्षणभर गोंधळून 'लिहीतें' एवढेंच म्हणून ती खोलींत गेली. नानासाहेब कांहींशा चमत्कारिक दृष्टीनें तिच्याकडे पहात होते.

संध्याकाळीं नानासाहेबांनीं तिला फिरायला येतेस का म्हणून प्रश्न केला. त्यावेळीं त्यांना कांहीं तरी आपल्याशीं बोलायचें आहे हें तिनें तात्काळ ताडलें.

कांहींवेळ फिरल्यावर बोलतां बोलतां दोघेंही आगगाडीच्या रुळाच्या फाटकाशीं आलीं.

जवळच असलेल्या बगीचांतील बांकावर बसून नानासाहेबांनीं प्रश्न केला,

" लिले, मॅट्रीक झालीस; मग पुढें काय विचार आहे ? तुझी आई तर लग्नासाठीं एकसारखी घाई करते आहे. "

" आईला लागलं आहे वेड ! " लिला लाजून म्हणाली, " येव्हां-पासून लग्नाची घाई कशाला ? माझ्या सुखासाठींच ना विवाह जमवायचा?"

" लिले, तिचें म्हणणं बरोबर आहे. " नानासाहेब क्षणभर गोंधळून पुढें म्हणाले, " तीच मला म्हणाली कीं तुला जॉनचें कांहीं तरी पत्र आलं आहे. "

" हो, आपल्या कॉलेजचें वर्णन केलं आहे त्यांत. तो व जोन आतां लवकरच हिंदुस्थानात कांहीं दिवस रहाण्यासाठीं येणार आहेत. " लिलेच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे गांभीर्य होतें.

" अस्सं. पण लिले, तुला जॉननें शाळेच्या पत्त्यावर पत्रं पाठविलीं हें आमच्या समाजाला आवडणार नाहीं व कांहीं लोक कुजबूज करूं लागले आहेत. "

" पण नाना," लिला खिन्न मुद्रा करून रागानें म्हणाली, " जॉनचीं सर्व पत्रं मोकळ्या सरळ मनानं लिहिलेलीं असतात. "

" लिली, मी तसा बिलकूल संशय घेत नाहीं; पण तुझ्या लग्नाला यामुळं अडचण येते आहे. "

" पण मी कुठं पर्वा करतें ? " तिनें रागानें प्रत्युत्तर केलें, " ज्यांचीं मनं एवढीं क्षुद्र आहेत त्यांच्याशीं विवाह करून मी तरी थोडीच सुखी होईन ? "

लिलेनें डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु पुसले. कांहीं वेळ कुणींच कांहीं बोललें नाहीं. शेवटीं नानासाहेब गंभीरपणें म्हणाले,

" लिली, तुला अजून जगाचा अनुभव यायचा आहे. "

थोड्याच वेळांत घरीं जाण्याकरतां दोघेंही निघालीं. नानासाहेब कांहीं तरी बोलत होते; पण होकारापेक्षां लिलेकडून क्वचितच विशेष उत्तर आलें असेल.

कांहीं दिवस गेल्यानंतर मिसेस डन्ले आज आपल्या दोन्ही मुलांसह शारदाबाईंना भेटायला आल्या होत्या. जॉन आतां सतरा अठरा वर्षांचा उमदा तरुण दिसत होता. त्याची उंच शरीरयष्टी, रुंद छाती, पाणीदार निळे डोळे आणि बळकट पीळदार बाहु यांमुळें तो अतिशय आकर्षक वाटत होता. जोनदेखील आतां अगदीं नाजूक सडपातळ आणि सौंदर्य-संपन्न तरुणी दिसत होती.

शारदाबाई बाहेर येतांच डन्लेबाई मिशनरी हास्य करीत म्हणाली,

" नमस्कार शारदाबाई, तुम्ही आमचेकडे फार दिवस नाहीं आला? तुम्हाला आमची भाषा येत नाहीं. पण आम्हालें मराठी समजतें. तेव्हां आमच्याकडे भेटायला येण्याला हरकत नाहीं असें आम्हाला वाटतें. मला तुमच्या चालीरीती समजून घ्यायच्या आहेत."

इतक्यांत लिलाही तेथें आली.

" या लिली, जॉन-जोन तुम्ही ओळखलें का ?" डन्लेबाईनें हंसत प्रश्न केला.

जॉननें उठून हात पुढें करीत म्हटलें. " Good morning Lily."

" Good morning Joan. "

डन्लेबाई शारदाबाईंशीं संभाषण करीत होत्या व लिला आणि जॉन–जोन यांचा इंग्रजींत संवाद चालला होता.

" लिली, तूं बरीच मोठी झालीस." जोन तिचा हात धरीत प्रेमळ-पणें म्हणाली.

" कां, हिंदुस्थानांतील मुलींनीं मोठं होऊं नये वाटतं ?" लिलेनें हंसत प्रश्न केला.

" जॉन, लिली एकदम बरीच मोठी झाली नाहीं ? " जोननें त्याला पुन्हा विचारलें.

" मुळींच नाहीं; आणि तसं पाहिलं तर मीसुद्धां मोठा झालों आहे. पण लिली मात्र आतां जास्तच सुंदर दिसते. " जॉन मिष्किलपणें हंसत म्हणाला.

" लिली, माझ्या भाऊला तरुण मुलींच्या सौंदर्याबद्दल फार कुतूहलता वाटत असते. "

ही थट्टा ऐकूनदेखील जॉन मोठ्यानें हंसला. पण लिला मात्र अतिशय ओशाळून गेली. तिनें शारदाबाईकडे साशंक दृष्टीनें पाहिलें. त्यादेखील तिच्याकडे भेदक नजरेनें पहात होत्या. पण आईला इंग्रजी समजत नाहीं हें लिलेला माहीत होतें.

डन्लेबाई आपल्या मुलांना डोळे वटारून खुणवून पुन्हा हंसत शारदाबाईंना म्हणाल्या,

" तुमच्या लिलीला तुम्हीं जरूर कॉलेजांत पाठवा; म्हणजे तिला चांगला नवरा मिळेल. " शारदाबाईंनीं केवळ औपचारिक हास्य केलें.

" लिली " जोन हळु म्हणाली, " हिंदुस्थानांत आल्यापासून आम्हाला कोणी एक सोबती नाहीं. यामुळें तुझी संगत आम्हाला आणि मुख्यतः जॉनला फारच सुखकर वाटते. "

यावर जॉन हंसत म्हणाला,

" लिली, तुला एखादा चुलतभाऊ वगैरे कुणी नाहीं का? त्याची व जोनची संगत तशीच आनंददायक होईल. "

लिलेला त्यांच्या ह्या भाषणाचा अचंबा वाटला व ती हंसत म्हणाली, " अमेरिकेहून आल्यावर तुमच्या बोलण्यावागण्यांत बराच फरक झालेला दिसतो. "

" पण तूं मात्र पूर्ववत् लाजाळू मुलगी आहेस. " जॉन हंसत उत्तरला.

" लिला, अमेरिकेंतील मुली किती धीट असतात हें पहायला येतेस का? तेथें तुला शिकॅगोच्या विश्वविद्यालयांत उच्च शिक्षण घेतां येईल. "

" पण जॉन, एवढा पैसा कुठून आणायचा ? " लिला मध्येंच म्हणाली,

" म्हणजे ? " जॉननें आश्चर्यानें प्रश्न केला, " तुझे पपा तुला शिक्ष-णाची आवड असतांही पैसा पुरविणार नाहींत काय ? "

" जॉन, " लिला कांहींशा खिन्न स्वरांत म्हणाली, " तुमचा समाज आणि आमचा समाज यांत महदंतर आहे. हिंदुस्थानांतील आर्थिक स्थितीची तुम्हाला काय कल्पना ? आमच्या देशांत कोट्यावधि लोकांस धड पोटभर अन्न मिळत नाहीं. "

" मग लिली, तूं देशाची सेवा करणार असें दिसतें. " जॉन अर्ध-वट स्मित करीत म्हणाला.

याप्रमाणें संभाषण चाललें असतां डन्लेबाई जाण्यासाठीं उभ्या राहून विनयानें म्हणाल्या,

" बरं शारदाबाय, येत्या शनिवारीं माझ्या जॉनचा अठरावा वाढ-दिवस आहे. तुम्ही अवश्य आलं पाहिजे. लिली, मी आमची मोटर पाठविणार. आईला पण आणायची हं. "

" थांबा, मिसेस् डन्ले " लिला हंसत म्हणाली, " आम्ही आमच्या हिंदु चालीप्रमाणें जातांना स्त्रियांना कुंकूं लावतों. "

शारदाबाई लिलीकडे कौतुकानें पहात होत्या. तिनें घरांतून कुंकवाचा करंडा आणला.

" तुमच्यांत विधवा कुंकूं लावित नाहींत ना ? " जोननें चौकशी केली.

" पण माझी आई व बहीण कांहीं विधवा नाहींत." जॉन हंसत म्हणाला.

शारदाबाईंना कांहींच समजलें नाहीं. लिलेला मात्र त्या विचित्र भाषणामुळें हंसूं आलें.

" आम्हीदेखील तुम्हांला परत कुंकूं लावतों. " असें म्हणून त्या बाईनें दोघींनाही कुंकूं लावलें.

" आई, मीदेखील लिलीला कुंकू लावतों. " असें म्हणून जॉननें पिंजरीची चीमट घेऊन ती सांभाळून तिच्या डोक्याला लावली.

लिला अतिशय ओशाळली. शारदाबाई 'जळ्ळं मेलं ह्याचं वागणं' म्हणून मनांत जळफळत होत्या.

थोड्याच वेळांत मंडळी जाण्यास निघाली. तेव्हां डन्लेबाई मराठींत म्हणाल्या,

" नमस्कार, शारदाबाय. जॉनच्या वाढदिवसाला आलं पाहिजे हं."

" Good eveing Lilv. " जॉन लिलेशीं हस्तोन्दोलन करीत म्हणाला.

मोटार चालू झाली. जातां जातां डन्लेबाई जॉनशीं रागानें बोलत आहेत हें त्या दोघांनीं पाहिलें.

त्या दिवशीं जॉनचा वाढदिवस होता. घरीं मोटार आल्यामुळें शारदाबाई व लिला मिशनऱ्याच्या बंगल्यावर गेल्या. त्यांचें स्वागत करून डन्लेबाईनें त्यांना वरच्या मजल्यावर नेलें. तेथें जॉन पियानोवर बसून सूर काढीत होता. जोन पियानोला टेकून गात होती. शारदाबाई तें संगीत ऐकून आपल्याशींच हंसत होत्या. डन्लेबाईनीं त्यांना पलिकडल्या दालनांत नेलें. तेथें एका मोठ्या टेबलावर फळफळावळ व खाण्याचे इतर जिन्नस मांडून ठेवले होते.

" बसा शारदाबाय, " डन्लेबाई खुर्ची किंचित् मागें ओढित म्हणाल्या, " आम्ही घडविलेले पदार्थ तुम्ही खाणार नाहींत. पण फळें खाऊन सरबत घेण्यास कांहीं हरकत नाहीं. "

" आई, थोडं कांहींतरी खा. नाहींतर वाईट दिसतं तें. " लिला हलकेच म्हणाली.

" शारदाबाय, तुम्ही तयार केलेले पापड आम्हांला फार आवडतात. तुम्ही इतके पातळ कसे करतां ते ? "

" हातांनीं लाटून करतों. "

" काय हातांनीं एवढे पातळ करूं शकतां ? तुम्ही फार कलावंत

अहांत शारदाबाई. मला शिकवाल का ? "

शारदाबाईंनीं हास्य केलें.

" आई, खा ना कांहींतरी. " लिला पुन्हा आग्रहानें म्हणाली.

शारदाबाईंचा नाईलाज झाला. त्यांनीं नारिंगाच्या चार शिरा व कांहीं द्राक्षें तोंडांत टाकलीं व सरबत घेतलें.

थोड्याच वेळांत कांहीं कामाचें निमित्त सांगून घरीं त्या जाण्यास निघाल्या तेव्हां डन्लेबाई म्हणाली,

" लिलीला कांहींवेळ आमच्याकडे राहूं द्या. अजून कांहीं पाहुणे यायचे आहेत. त्यांना हिची ओळख झाल्यास आनंद वाटेल. तिचे वडीलही अद्याप यायचे आहेत. बरं, शारदाबाय, तुम्हाला येण्याचे त्रास पडले. "

बाईंनीं मिष्टा हास्य करून शास्त्रोक्त रीतीनें हात जोडून निरोप दिला.

" लिले, " शारदाबाई तिला जवळ बोलावून हलकेच म्हणाल्या, " फार वेळ राहूं नकोस हं. आतां त्यांच्याकडे पुष्कळ लोक येतील, दारू वगैरे पितील. तेव्हां लवकरच ये बरं. "

" बरं " एवढेंच म्हणून ती डन्लेबाईबरोबर मागें फिरली. जॉन् तेथें उभा होताच.

" लिली, चल तुला वाढदिवसासाठीं आलेल्या देणग्या दाखवितों."

माडीवर नेऊन आलेल्या वस्तू दाखवित तो म्हणाला, " लग्नाच्या-वेळीं आम्हाला फारच भेटी येतात. लिली, जोनचें आतां लवकरच लग्न जमणार असं दिसतं कारण शिकॅगोमध्यें तिला एका विवाहित तरुणा-बरोबर फिरतांना अनेकवेळ मी पाहिलें आहे. तो तरुण जर जोनचें प्रेम संपादन करूं शकला तर लवकरच ती विवाहित होणार. "

जोन हास्य करून लिलेकडे पहात म्हणाली, " लिली हिंदुस्थानांतील मुलींचीं लग्नें लवकर होतात असें मी ऐकलें आहे. मग तुझ्या लग्नाचें काय ? "

लिला खिन्नपणें हंसून म्हणाली, " माझं लग्नच होणार नाहीसं वाटतं. मला नवरा मिळणं कठीण होणार. "

" काय ? " जॉन आपल्या भाषेंत म्हणाला, " आमच्या अमेरिकेंत अनेक तरुण तरुणीच्या प्रेम संपादनासाठीं अत्यंत मेहनत करीत असतात. पण तुझ्यासारख्या सुंदर तरुणीला चांगला नवरा मिळायला काय हरकत आहे ? "

" आमचा समाज आणि तुमचा समाज यात पूर्व आणि पश्चिम एवढा भेद आहे. सुधारक आणि सुशिक्षित मुलीशीं विवाह करायला हिंदु तरुण तयार नसतात. "

एवढ्यांत जोनला आईनें बोलाविलें म्हणून ती खाली गेली.

" लिली, हे पहा माझे फोटोज्. " असें म्हणून फोटोच्या आल्बम-मधील फोटो दाखवीत तो पुढें म्हणाला, " ह्या मुलीनें असा फोटो मुद्दाम काढून घेतला हं. "

जॉननें लिलेकडे आर्द्र दृष्टीनें पाहिलें. लिला अतिशय ओशाळली होती.

" लिली, मी तुझ्यावर अतिशय प्रेम करतों. " असें म्हणूत जॉननें तिच्या दोन्ही बाहूंना धरून जवळ ओढली व तिचें चुंबन घेतलें. लीलेनें झटकन् आपली सुटका करून घेतली व ती एकदम मागें सरकली. तिचें सारें शरीर कांपत होतें. घाबरून तिनें चारी दिशेला पाहिलें.

" जॉन—जॉन-तूं ... " ती अडखळत म्हणाली.

इतक्यांत कोणीतरी चढत असल्याप्रमाणें बूट वाजले. वर येऊन शिपाई म्हणाला,

" मिस्टर आणि मिसेस् गिलबर्ट आले आहेत तेव्हां तुम्हाला मॅमसाहेबानीं बोलावलें आहे."

जॉन कांहीं न बोलतां त्याच्या मागोमाग खालीं उतरला.

थोड्या वेळानें लिला घरीं गेली. तिचा चेहरा अगदीं खिन्न झाला होता. शारदाबाई रागांत होत्याच. लिलेला पहातांच त्या म्हणाल्या,

" लिले, मिशनऱ्याच्या घरीं विशेष कधीं जायचं नाहीं. साहेबांचीच पोरें तीं. विचार आचार यांची कसलीच चाड नाहीं त्यांना. सबंध गांव तुझ्याएवढ्या वाढलेल्या पोरीचें साहेबाकडे जाणं येणं पाहून टीका करताहेत. म्हणून म्हणत्यें आपण तिकडे न जाणंच बरं."

लिला हुंकार देऊन खोलींत गेली. दाराला कडी घालून तिनें पलंगावर अंग टाकलें व ती हुंदके देऊन रडूं लागली.

पुष्कळ दिवस लिला डन्लेसाहेबांच्या घरीं गेली नाहीं. एके दिवशीं ती शाळेच्या फाटकांतून बाहेर पडत असतांच डन्लेबाईची मोटार आली.

" Good Morning. "

" Good Morning Lily. " साहेबीण पुढें म्हणाली, " लिली आमच्याकडे पुष्कळ दिवस आली नाहींस तूं ? "

" मॅट्रिकची परीक्षा जवळ आली ना ? " लिला दिलगिरीपूर्वक म्हणाली.

" दोन दिवसानी आम्ही मुंबईस जाणार व जॉन अमेरिकेस जाणार आहे. त्याला पोहोंचवून येणार आहों. उद्यां तूं आणि तुझे वडील अवश्य आलं पाहिजे हं. "

" बरं " असें म्हणून तिनें निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशीं ती व नानासाहेब मिशनऱ्याच्या बंगल्यावर गेली. लिलेला पहातांच जॉनच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा उमटली. जोननें त्याच्याकडे पाहून हलकेंच हास्य केलें. लिलेनें जॉनकडे भेदक दृष्टीनें पाहिलें. पण तो अगदीं मोकळेपणानें पहात हास्य करीत होता. कांहीं वेळानें जोन म्हणाली,

" लिली, वडील माणसांना गोष्टी बोलूं द्या. चल आम्ही माडी-वर जाऊं. "

त्या दोघी वर गेल्या.

" माझा भाऊ लवकरच शिकॅगो युनिव्हरसीटीचा पदवीधर होईल. मग तो तिकडे नोकरी न मिळाल्यास इकडे येणार आहे. लिली आमच्या-कडे मुलगा मोठा झाला कीं स्वतंत्र होतो व याप्रमाणें जॉनलादेखील स्वतंत्र रहावें लागणार. "

एवढ्यांत जॉन तेथें आला. जोन कांहीं कामानिमित्त म्हणून हंसत खालीं गेली. जॉन लिलेजवळ येऊन हंसत म्हणाला, " लिली, गेल्यावेळीं मी जें वर्तन केलें तें आमच्या समाजांत वावगं नाहीं. तुला राग आलेला दिसतो. पण माझं तुझ्याबद्दलचें प्रेम मी व्यक्त तरी कसं करूं ? "

" जॉन, आम्हाला लग्न कुठं करतां येणार आहे ? "

" कां नाहीं ? "

" जॉन, आमच्या समाजाला ती गोष्ट सहन होणं अशक्य आहे. नाना आणि आई मी घात केला असा आकांत करतील. "

" मुळींच नाहीं. " जॉन जोरानें म्हणाला, " कुणाशीं लग्न करावें हें सांगणारे ते कोण ? "

" जॉन, हा वादविवादाचा प्रश्न नाहीं. हिंदु मुलीच्या मनोवृत्ति तुला समजायच्या नाहींत. "

जॉननें चटकन् पुढें होऊन लिलेच्या खांद्याजवळ धरून तिच्या भालप्रदेशाचा मुका घेतला व तो आर्त स्वरांत म्हणाला, " लिली, मी तुझ्या-वर प्रेम करतों आणि यासाठीं मी वाटेल तें करीन. तूं माझ्यावर प्रेम करीत नाहींस का ? "

लिलेनें चटकन् त्याच्या हातांतून आपल्याला सोडवून घेतलं. तिच्या भेदरलेल्या नेत्रांत अश्रु आले होते. तिनें डोळे पुसले व ती एकटीच जीना उतरून खालीं गेली. जॉनही तिच्या मागोमाग खालीं आला. लिला पुढल्या खणांत गेली तों तेथें डन्लेबाइ बसली होती.

" लिली, तूं पुढें शिकायला शिकॅगोला जातेस का ? " तिनें विचारलें.

" आई, " जॉन मध्येंच म्हणाला, " लिलीचे तरुण विद्यार्थ्यांबरोबर वागतांना फार हाल होतील. "

डन्लेबाईनें डोळ्यानें जॉनला दाबलें. पण तो हंसतच होता.

थोड्या वेळानें लिला घरीं जाण्यास निघाली तेव्हां तो हलकेच तिला म्हणाला,

" लिली, उद्यां मला पोहोंचवायला तुला स्टेशनवर आलें पाहिजे. त्यावेळीं तुझा होकारही मला मिळाला पाहिजे. Good Evening."

लिला अतिशय उदास झाली. उद्यां जॉनला निरोप देण्यास जायचें म्हणजे उत्तर दिलें पाहिजे. ती सारखा विचार करीत होती. आपण होकार कसा द्यावा ? आपण जॉनशीं विवाह केला तर आपले आप्तेष्ट आपल्याला ओळखणार नाहींत. अमेरीकन् समाजांतही मला दर्जा मिळावयाचा नाहीं. आई काय म्हणेल, नानांस काय वाटेल ? विचार करतां करतां तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

दुसरा दिवस उजाडला. लिलेनें जॉनला निरोप देण्यास न जाण्याचें ठरविलें होतें. तरी पण तिच्या हृदयांत विलक्षण कालवाकालव होत होती. नानासाहेबांस त्या दिवशीं कोर्ट होतें यासाटीं अकरा वाजतां जेवायला ते जात होते.

" लिले, " त्यांनीं प्रश्न केला, " तूं नाहीं का जेवायला येत ? जॉनला पोहोंचविण्यासाठीं तूं स्टेशनवर नाहीं का जाणार ? "

" नाहीं. " लिला एकदम निश्चयानें म्हणाली.

" कां नाहीं ? " नानासाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें.

" मला बरं वाटत नाहीं आहे. "

" अस्सं. " नानासाहेबांस तिचें उत्तर खरें वाटलें. पण ते पुढें म्हणाले, " जॉनला तूं गेलीस नाहींस तर वाईट वाटणार. तो अगदीं हुशार आणि सरळ मुलगा आहे. "

लिलेला रडें आवरेना. ती चटकन् आपल्या खोलींत गेली.

जॉनची गाडी साडेअकराला सुटणार होती. नानासाहेब कोर्टांत गेले होते. घड्याळाचा कांटा जसजसा पुढें जाऊं लागला तसतशी लिला अतिशय अस्वस्थ होत होती. साडे अकराला दहा मिनीटें राहिलीं होतीं. लिलेनें पलंगावर धडकन् अंग टाकून रडण्यास प्रारंभ केला. तिनें पुन्हा टेबलावरील घड्याळाकडे पाहिलें. साडे अकरा वाजण्यास पांचच मिनीटें राहिलीं होतीं.

एकदम उठून लिलेनें डोळे पुसले. ती लगबगीनें घराच्या बाहेर पडली. जवळच टांगा उभा होता. घाईनें आंत चढून ती गाडीवाल्याला कसबसं म्हणाली, " जलदी कर. तें तुरुंगाच्या रस्त्यावर रेल्वेचें फाटक आहे तेथें गाडी हांकव. स्टेशनवर गाडी मिळणार नाहीं. "

थोड्याच अवधींत गाडी फाटकापाशीं उभी राहिली. समोरून मेल-गाडी येत असल्यामुळें फाटक बंद झालें होतें. लिला खालीं उतरून उत्कंठेनें गाडीकडे पहात होती. तिचें शरीर थरथर कांपत होतें. हृदय धडधडत होतें. गाडी शीळ फुंकून धडधड असा आवाज करीत समोर आली.

" जॉन, जॉन, " लिला सेकंडक्लासमध्यें खिडकीवर हात टेकून खालीं पहात असतां जॉनला ओरडली. पण गाडीच्या आवाजांत ती हांक कुणालाच जाणवली नाहीं. आलेला हुंदका दाबून ती गाडींत चढली. आगगाडीचा आवाज अस्पष्ट होत होता.

" चल मागें. " दाटलेल्या कंठांतून कसेबसे शब्द बाहेर पडले.

घरीं येऊन तिनें पलंगावर पडून रडून आपलें दुःख हलकें करण्याचा प्रयत्न केला.

संध्याकाळीं जोन लीलेला भेटायला आली.

" लिली, तूं स्टेशनवर भेटायला आलीस नाहीं म्हणून जॉनला फार वाईट वाटलें. तीन वर्षांनीं परत आल्यावर आपणास भेटण्याचा योग येईल एवढंच तो म्हणाला. लिली, त्याचं व तुझं लग्न झालं पाहिजे. "

लिलेला रडें आवरेना. जोनला गच्च मिठी मारून ती स्फुंदून रडूं लागली. जोन तिच्या केसावरून हात फिरवून प्रेमळपणें म्हणाली, " उगि रहा. लिली, आपण आशावादी असावं. "

" कसली आशा ! " असें म्हणून लिलीनें हुंदका दिला.

जोन तिच्या पाटीवरून हातानें थोपटून तिचें सांत्वन करीत होती.

# अकलेचे कांदे.

" इंदू, " प्रभाकर एकदम तिच्या खोलींत येऊन ओरडला, " तुझी मैत्रिण असली म्हणून का मी तिच्याशीं लग्न करावं ? "

" तुला सांगितलं आहे कोणी ? " इंदुमती शांतपणें हंसत म्हणाली, " माझ्या एकाही मैत्रिणीशीं विवाह करण्याची तुझी लायकी नाहीं. "

" म्हणूनच भाऊआईजवळ पद्मा वैद्यची एवढी शिफारस केलीस! लबाड कोठली ? तिला एखादा कॉलेजांतला भाऊ असेल म्हणून हा अदलाबदलीचा प्रयत्न वाटतें ? "

" दादा, तिला भाऊ नाहीं. आईनें मला विचारलें, पद्मा वैद्य तुला माहीत आहे ? मी हो म्हटलं. दोन वर्षांपूर्वी ती माझ्या बरोबर होती आणि पुढं अहमदाबादेस तिचे वडील मिल मॅनेजर म्हणून गेले तेव्हां ती पण तिकडे गेली. गेल्या वर्षी माझ्याबरोबरच ती मॅट्रिक झाली आणि कॉलेजांत गेली. चांगली सुंदर आहे. श्रीमंतदेखील आहे. "

" तें मी तुला विचारलें नाहीं. " प्रभाकर चिडल्याचा आविर्भाव करून म्हणाला, " मी अशी श्रीमंतीला भीक घालीत नाहीं. भाऊंनीं माझ्या पाठीमागें हें निष्कारण टुमणं लावलं आहे कीं तुला घेऊन अहमदाबादेला तिला बघून ये. इंदू, तुला मैत्रिणीला भेटायचं होतं तर तूं जाऊन ये ना! आणखी माझ्यापाठीं हा प्रवासाचा त्रास कशाला ? पोरी बघायला काय जायचं ? पावडरनं तोंड रंगवून पुढ्यांत येतील. लाजल्यासारखा नखरा करतील. एखादा प्रश्न विचारला तर मुरडून मुरडून तोंडांतल्या तोंडांत उत्तर देतील. झाली वधुपरीक्षा. मुलगी पसंत. मुहूर्त ठरला, हुंडा घ्या. झालं लग्न. इंदू, असले हे बाहुलीचे खेळ मला नको आहेत. पण भाऊ सांगताहेत कीं आपण रावसाहेब वैद्यांना शब्द दिला आहे, तेव्हां मुलगी बघून तरी ये. मग वाटल्यास नकार दिलास तरी चालेल. इंदू, तूं आणखी तिला शब्द दिला नाहींस ना ? "

" दादा, " इंदुमती दिमाखानें म्हणाली, " कांहीं कुणाचा आग्रह नाहीं. पद्माला वाटेवरचा वाटसरू घेऊन जाईल. तिच्यासारखी बायको मिळायला भाग्य लागतें. "

" आणि ताई, पोरींनासुद्धां माझ्यासारखा नवरा मिळायला भाग्य लागतं. इंदू, लवकरच मी डबल ग्रॅजुएट होईन. आहेस कुठं ? "

" ही इथंच. " इंदुमती चेष्टेनें टाईम्सचें जाहिरातीचें पान उघडून हंसत म्हणाली, " दादा, ह्या पाहिल्यास पदवीधरांसाठीं किती जागा रिकाम्या आहेत ? "

" आणि ह्या पहा " असें म्हणून प्रभाकरनें लगेच टेबलावरील केसरीचा अंक उघडून 'वधू पाहिजे' अशा जाहिराती दाखविल्या व तो पुढें म्हणाला, " पाहिलंस तुमच्यासाठीं ह्या किती सोईस्कर जागा आहेत त्या ? बघ ह्या जागेसाठीं अर्ज करतेस तर कर. 'उच्च वर्णीय, सुंदर, देखणी, सुदृढ, सुशिक्षित वधु विधुर वरासाठीं पाहिजे. वराचें वय बेचाळीस; सालीना उत्पन्न २०० रुपये. फोटोसह पत्र-व्यवहार करावा.' इंदू, स्थळ चांगलं आहे. मी भाऊंकडे गोष्ट काढूं का ? "

" दादा, बघ हं. वात्रट कोठला ! तूं माझ्याशीं बोलूंसुद्धां नकोस. " इंदुमती उसन्या रागानें म्हणाली.

" इंदू, पण एवढी लाजलीस कशाला ? पण तें राहूं द्या. मग एकदां अहमदाबादहून जाऊन येण्याचा उद्योग केला पाहिजे. येत्या रविवारीं रात्रींच्या गाडीनें निघूंया ? "

इंदुमतीनें होकार दिला.

पांच सहा दिवस कधीं गेले हें इंदुमतीला समजलेंच नाहीं. प्रभाकरदादाचा पद्मेशीं आपण विवाह निश्चित जुळवून आणणार ह्या गोड कल्पनेमुळें ती अगदीं अस्वस्थ झाली होती. मनांत कल्पिलेले बेत कसे सिद्ध करतां येतील, या विचारांत तिला रात्रीं धड झोंपसुद्धां लागत नव्हती. पण प्रभाकर मात्र अगदीं निष्काळजी होता. इंदुमतीनेंच त्याचा सिल्क सूट धुवायला कंपनींत टाकला होता. प्रभाकरदादाला पद्मेला बघायला जात आहों म्हणून उत्साह वाटत नाहीं म्हणून ती क्षणभर

हताश होत होती. पण त्यानें तिला बघितल्यावर, तिच्याशीं चारदोन तास संभाषण केल्यावर तो कुठला नकार देतो असें तिला वाटत होतें.

रात्रीं जेवण झाल्यावर इंदुमती चॉकलेट रंगाचें जॉर्जेट नेसली. काळा सिल्क सॅटीनचा ब्लाऊझ तिनें अंगांत घातला व हातांत लोकरीचा स्वेटर घेऊन ती प्रभाकरच्या खोलींत गेली.

"या ताईसाहेब," प्रभाकर कपडे बॅगमध्यें भरीत होता. इंदुमतीच्या पेहरावाकडे बघून तो एकदम आश्चर्यानें पुढें उद्गारला, "इंदू, ही विलायतची सफर आहे वाटतं? आज सबंध दिवस मैत्रिणीला एवढ्याचसाठीं भेटायला गेली होतीस वाटतं? अग, मला वाटतं, मी मुलगी पहाण्यास जात नसून तूं नवरा पाहायला जात आहेस. इंदू, खरं सांग तिला भाऊ आहे कीं नाहीं?"

"मला नाहीं माहीत." इंदुमती फणकाऱ्यानें म्हणाली, "दादा, गाडीला अवघा तास राहिला असेल आणि तुझी अजून बिलकुल तयारी नाहीं! मी भरतें बॅग. तूं कपडे कर अगोदर."

"माझे कपडे हे असेच." प्रभाकर आपल्या कपड्यांकडे पाहात म्हणाला, "हा पायजमा कांहीं मळला नाहीं आणि गाडींत कपडे खराब होणारच."

"अशा कपड्यांनीं मी कांहीं तुझ्याबरोबर यायची नाहीं!" इंदुमती त्राग्यानें म्हणाली.

"बरं तर; कॅशमिरचा सूट करतों. पण इंदू, मला गाडींत चांगले कपडे करून काय करायचं आहे? अहमदाबादला मुलगी बघायची आहे!"

इंदुमती कांहीं तरी प्रत्युत्तर करणार होती. पण तिनें एकदम तोंड मिटलें व आपण कांहीं तरीच बोलत होतों अशा विचारानें तिच्या चेहऱ्यावर मधुर हास्य झळकलें.

तीं दोघें सेंट्रल स्टेशनवर पोहोंचलीं त्यावेळीं गाडीला अजून अर्धा तास होता. हिंवाळ्याचे दिवस असल्यामुळें स्टेशनच्या आवारांत थंडगार वारा अंगाला सारखा झोंबत होता. गाडीला विशेष गर्दी नसल्यामुळें हेलकरी आपले रुमाल अंगाभोवतीं गुंडाळून प्लॅटफॉर्मवर बसले होते. दर

डब्यासमोर चारदोन आप्तेष्ट डब्यांत बसलेल्या स्त्री-पुरुषांचा त्याच त्याच भाषणांनीं निरोप घेत होते.

प्रभाकरानें दोन इन्टर क्लासचीं तिकीटें काढून तो इंदुमतीसह प्लॅट-फॉर्मवर आला. डब्याच्या वर्गाचे आंकडे पहात तो पुढें चालला होता. इन्टरचा डबा दिसतांच बुटाचे टपटप आवाज करीत तो जवळ गेला.

" इंदू, इथंच बसूं या. " फ्लॅनेलच्या तुमानीच्या खिशांत हात घालून उभा रहात प्रभाकर म्हणाला.

" दादा, पुढं जागा पाहूं या अगोदर. " असें म्हणून इंदुमती चालूं लागली.

पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे दोन तीन डबे ओलांडल्यावर पुन्हा इन्टरचा डबा दिसला. इंदुमती क्षणभर गोंधळून म्हणाली, " पुढें हा एकच डबा. "

प्रभाकराचें लक्ष समोर गेलें. डब्याच्या दारापाशीं एक तरुण उभा होता. प्रभाकरच्याच वयाचा तो दिसत होता. कपड्याच्या फॅशनवरून व चेहऱ्यावरील दिसणारी तेजस्वी खेळकर वृत्ति पाहून तोदेखील तरुण कॉलेजमधील विद्यार्थी असावा हें स्पष्ट दिसत होतें. तो आंत बसलेल्या तरुणीशीं डब्याच्या खिडकीला रेंगून बोलत होता. प्रभाकरच्या बुटाचा आवाज थांबतांच त्यानें मागें पाहिलें. आंत बसलेल्या तरुणीच्या चेहऱ्यावरही प्रवासांत चांगली सोबत मिळाली अशा विचारानें हास्य उमटलें. ती इंदुमती व प्रभाकर यांच्याकडे त्यांनीं आंत चढावें या अपेक्षेनें पहात होती.

" हं ताई, तुला अगोदर सुगावा लागला होता वाटतं? कोण हा गृहस्थ ?"

" मला माहीत नाहीं. " प्रभाकराच्या हाताला धक्का देऊन इंदुमती पुढें म्हणाली, " चल हवा तर मागच्या डब्यांत. माझी तयारी आहे."

" आतां नको. " प्रभाकर पुढें होत म्हणाला.

" हं समजलं मला. " इंदुमती मिष्कीलपणें हलकेच उत्तरली.

इंदुमती आणि ती तरुणी एकमेकांस चांगलीच सोबत मिळाली म्हणून समाधानानें परस्परांकडे पहात हास्य करीत होत्या. प्रभाकरचाही

चेहरा सस्मित दिसत होता. त्यानें दोन बांकावर बिछाने सोडले. बॅगस् वर लावून घेतल्या. डोक्याची फेल्ट हॅट काढून त्यानें बिछान्यावर टाकली.

कांहीं वेळ एकमेकांकडे पाहून हास्य केल्यावर तो तरुण प्रभाकराला म्हणाला, " Excuse me. How far you are going please ? ( आपण कुठं चाललां ? ) "

" Up to Ahmedabad (अहमदाबादला). आपण कुठं निघाला ? " प्रभाकरानें चेहऱ्यावर उमटणारें हास्य दडवित प्रश्न केला.

" No, I am not going. My sister is also going to Ahmedabad. Please just look to her. She is alone." (नाहीं. मी नाहीं जात; माझी बहीण जाते आहे. जरा कांहीं लागलं तर मदत करा हं. ती एकटीच आहे.) "

" Never mind. She has got the company of my sister. ( कांहीं हरकत नाहीं. माझ्या वहिणीची तिला सोबत आहे. ) "

" Thanks " त्या तरुणानें आभारप्रदर्शनार्थ म्हटलें.

" ताई, तुझा बराच हीरमोड झाला असेल. होतं असं कधीं कधीं. " प्रभाकर हलकेंच म्हणाला.

इतक्यांत गाडीची घंटा झाली. समोरचा तांबडा दिवा विझून सिग्नलचा हिरवा दिवा पेटला. गाडीनें शीळ फुंकली व इन्जिननें धांपा टाकीत गाडीचें ओझें खेंचण्यास सुरवात केली.

" अच्छा ताई, बाबांना म्हणावं कीं ही कॉलेजची मॅच झाली कीं चार आठ दिवसांत येतों. पोहोंचल्याचं पत्र पाठव हं. " त्या तरुणानें तिचा निरोप घेतला.

गाडी स्टेशनच्या आवाराबाहेर पडली. प्रभाकरनें कोट काढून उशीजवळ ठेवला. वरच्या फळीवर ठेवलेली बॅग उघडून त्यानें स्वेटर काढला. प्रवास आतां अगदीं मजेंत होईल या विचारानें पुन्हा पुन्हा चेहऱ्यावर उमलणारें हास्य दडविण्याचा तो व्यर्थ प्रयत्न करीत होता.

एवढ्यात इंदुमती आणि त्या तरुणीचा चांगलाच परिचय झाला होता. एकाच बिछान्यावर बसून त्या हंसत गोष्टी करीत होत्या.

“ दादा, तुझा परिचय करून देतें. ” इंदुमती हंसत पुढें म्हणाली, “ ह्या कमल देशपांडे. अहमदाबादला कॉलेजांत असतात. आणि हा माझा भाऊ प्रभाकर. एम्. ए. चा अभ्यास करतो आहे. ”

प्रभाकरानें अगदीं सविनय शास्त्रोक्त नमस्कार केला. कमल मात्र ओशाळून गेली.

“ इकडे मुंबईला आलां होतां वाटतं ? ” प्रभाकरानें शिष्टाचारास अनुसरून प्रश्न केला.

“ हो, दिवाळीची रजा पडतांच आलें होतें मामांकडे. पण घरीं पाहुणे मंडळी यायची असल्यामुळें बाबांनीं बोलावलं आहे. पुन्हा कदाचित् येईन मुंबईला. ”

प्रभाकर कमलेच्या सौंदर्याकडे कुतूहलतेनें पहात होता. तिची सडपातळ बांधेसूद शरीरयष्टी, निर्मल अंगकान्ती, निळसर प्रणयाकर्षक डोळे, किंचित् लांब हनुवटी, कांहींशा बारीक पण काळ्याभोर भुंवया, यामुळें प्रभाकर सारखा चोरून तिच्याकडे पहात होता. हसतांना तर तिची दंतपन्ति लाल अधराच्या सान्निध्यामुळें मोत्याप्रमाणें शोभत होती. डोळे किंचित् बारीक होऊन ते कांहींसे आर्द्र झाल्यासारखे दिसत होते.

कमलेचेंही लक्ष प्रभाकराकडे नकळतच वळत होतें. त्यानेंही आपला पेहराव व्यवस्थित केला होता. काळ्याभोर केंसांचा झोंकदार भांग पाडून कानामागें त्यानें ते वळविले होते, यामुळें त्याचा भालप्रदेश अधिकच रुंद व आकर्षक वाटत होता. नाकाची ठेवण त्याच्या लांब चेहऱ्याला शोभेशी दिसत होती. विशाल डोळे त्याच्या उदार आणि आनंदी वृत्तीची साक्ष देत होते. त्याच्या उंच शरीरयष्टीला भरीव खांदे, विस्तृत छाती आणि पिळदार बाहु सुंदर साज चढवित होते. प्रभाकरानें अंगांत त्याच्या कांहींशा गोऱ्या अंगकान्तीला शोभेल अशा रंगाचा बिनहाताचा स्वेटर चढविला होता. दाट निळ्या रंगाचा मफलर त्यानें मानेभोवतीं गुंडाळला होता.

इंदुमती दोघांच्या हालचाली निमूटपणें पहात आपण चोरी पकडीत आहों अशा अर्थानें गर्भित स्मित करीत होती. कांहीं वेळानें संभाषणाच्या उद्देशानें प्रभाकर कमलेस उद्देशून म्हणाला,

" अहमदाबाद शहर कसं काय आहे ? "

" आहे आपलं साधंसं. " कमला स्मित करून स्निग्ध स्वरांत म्हणाली, " मुंबईत राहिलेल्या लोकांना तें काय बरं वाटणार ! "

" असं का ? " इंदुमती मध्येंच म्हणाली, " प्रत्येक शहराला त्याचं विशिष्ट सौंदर्य असतंच ना ? "

" तुम्ही अहमदाबादेस उतरणार कुठं ? " कमलेनें प्रभाकरकडे पहात हलकाच प्रश्न केला.

" तें अजून ठरलं नाहीं. " प्रभाकरनें किंचित् गोंधळून उत्तर केलं.

" पण बहुतेक " इंदुमती हंसें आवरून म्हणाली, " रावसाहेब वैद्य म्हणून दयाभाई मिलचे मॅनेजर आहेत त्यांच्याकडे जाऊं. "

" अस्सं, " कमला लडीवाळपणें हंसत म्हणाली, " सहजच चाललां वाटतं अमदाबादला ? "

" हो, हो, " प्रभाकर घाईनें एकदम उद्गारला, " सहज जातों आहों. "

पण इंदुमती थोडीच गप्प रहाणार होती ? ती लगेच हंसत म्हणाली,

" अहो, खरं म्हणाल तर दादाला मुलगी बघायला आम्ही चाललों आहों. रावसाहेब वैद्यांचीच मुलगी सांगून आली आहे. "

" इंदू, " प्रभाकर चिडल्याचा आविर्भाव करीत म्हणाला, " उगाच त्यांचा माझ्याबद्दल गैरसमज करून देऊं नकोस. मिस् देशपांडे, मी वडीलांच्या आग्रहास्तव आणि हिला आपल्या मैत्रिणीला भेटायला मिळेल एवढ्यासाठींच जातों आहे. हा मुलगी बघण्याचा तमाशा मला बिलकुल आवडत नाहीं. मला ह्या कॉलेजांतल्या मुलींचं मोठं आश्चर्य वाटतं. आपल्याला बघायला येणार असं सांगायला यांना अभिमान वाटतो का हो ? प्रेमविवाह करायला ह्या शिकणार तरी कधीं ? अजून यांना आईबापानीं भरवलं पाहिजे का हो ? "

कमलेला प्रभाकरचें भाषण कांहीसें अपमानकारकच वाटलें. कॉलेज–कुमारिकांवर एवढी निर्भीड टीका त्यानें आपल्या समक्ष करावी हें तिला थोडेंसें चमत्कारीक वाटलें. पण इतक्यांत इंदुमती चिडून म्हणाली,

" दादा, तुम्हाला अशी मुलगी बघायला सांगतो कोण ? तुला शिवण-काम येतं, गातां येतं, वाचून दाखव वगैरे हुकूम मुलीला करायला तुम्हाला कांहीं वाटत नाहीं ? मुलींच्या पारतंत्र्याचा तुम्ही पुरुष अगदीं दुष्ट फायदा घेतां. "

" ताई, उद्यां मी मुलीच्या बापाला स्पष्ट नकार कळविणार आहें. धड पाहिली नाहीं, जिच्याशीं घटका बोलण्याचा प्रसंग आला नाहीं, तिच्याशीं केवळ सुंदर बाहुली आहे म्हणून मी कधींच विवाह करणार नाहीं. "

" बरं उद्यां काय तें सांग. " इंदुमती चेष्टेनें म्हणाली.

इतक्यांत पालघर स्टेशन आलें. तिघेंही खिडकीवाटे बाहेर पहात होतीं. कमलेचें लक्ष नाहीं असें पाहून इंदुमती प्रभाकरास उद्देशून हलकेच म्हणाली,

" दादा, हिच्याहून पद्मा जास्त सुंदर आहे हं."

" मग असेल, मला काय करायचं ?" प्रभाकर निष्काळजीपणें उत्तरला.

कमलेला तें भाषण स्पष्ट ऐकूं आलें. तिच्या चेहऱ्यावर लाजेनें आरक्तता आली होती.

कांहीं वेळ गेल्यावर तिला ऐकूं यावें या उद्देशानें प्रभाकर कांहींसें मोठ्यानें म्हणाला, " इंदू, तुझ्यापासून मी एक गोष्ट दडविली होती. माझा प्रेमविवाह ठरला आहे."

कमला एकदम दचकली. प्रभाकरबद्दल मनांत उत्पन्न होणाऱ्या प्रेम-भावनेला एकदम मुळावर घाव बसल्यासारखें तिला वाटलें. तिचा चेहरा एकदम फिक्कट झाला. शून्यदृष्टीनें ती प्रभाकरकडे पहात होती. इंदुमतीही आश्चर्यानें स्तंभित होऊन त्याच्याकडे पहात होती. तिला एकदम रडूं कोसळलें.

कांहीं वेळानें आंवढा गिळून आर्द्र स्वरांत तिनें विचारलें,

" खरंच का हें ? "

" तुला हवा तर तिचा फोटो दाखवितों. इंदू, मी तुला अगोदरच सांगणार होतों. पण मग तूं भाऊंच्या कानावर घालशील आणि अहमदाबादेला आपल्याला जायला यायचं नाहीं, म्हणून मी ही गोष्ट गुप्त ठेवली होती." असें म्हणून प्रभाकरनें बॅग उघडून एक छायाचित्र बाहेर काढलें.

फोटो पहातांच इंदुमतीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. चित्रांतील स्त्री सौंदर्यसंपन्न होती; पण त्याचें महत्त्व तिला बिलकूल वाटलें नाहीं. कमलेला तर रडें आवरणें अशक्य होऊन तिनें बिछान्यावर अंग टाकून मूक रुदनास सुरवात केली. प्रभाकर मात्र मनाला कोणत्याच प्रकारें वैषम्य न वाटूं देतां त्या फोटोंतील स्त्रीकडे पहात स्मित करीत होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रथम प्रभाकर जागा झाला. समोरच्या बांकावर कमला अजून झोंपली होती. कदाचित् रात्रभर तळमळून पहांटेसच तिला झोंप लागली असावी. प्रभाकर तिच्याकडे सारखा पहात होता.

इतक्यांत बडोदें स्टेशन आलें. गडबडीमुळें इंदुमती जागी झाली.

" ताई, झोंप तूं; अजून वेळ आहे. बडोदं आलं. " प्रभाकर हंसत म्हणाला.

त्या भाषणानें कमलाही जागी झाली. आपल्याकडे हास्य करीत प्रभाकर पाहतो आहे हें समजतांच ती दुसऱ्या बाजूला तोंड फिरवून पडूनच राहिली. तिला प्रभाकरचा अतिशय राग आला होता. पण प्रभाकर मात्र तिच्याकडे कुतूहलानें पहात हास्य करीत होता.

एवढ्यांत इंदुमती बिछान्यावर उठून बसत म्हणाली, " ददा, आपण इथंच उतरूं. उगाच अहमदाबादेला कशाला जायचं ? "

" म्हणजे ? " प्रभाकर आश्चर्यानें म्हणाला, " आणि भाऊंना काय सांगायचं ? शिवाय तूं एवढी आली आहेस, तशी मैत्रिणीची भेट होईल. दुपारीं पक्वान्नाची मेजवानी झोडूं आणि मग रात्रीं परत निघूं. "

कमलेनें चटकन् तुच्छतादर्शक दृष्टीनें प्रभाकराकडे पाहिलें. पण तिच्या नजरेंतील तिरस्कार आपल्याला समजलाच नाहीं अशा अर्थानें हास्य करीत तो तिला म्हणाला,

" काय हो, तुमच्या अमदाबादेला कोणतीं प्रेक्षणीय स्थळं आहेत?"

" कांहीं नाहीं." कमला फणकाऱ्यानें म्हणाली, " त्यापेक्षां इथं उतरलां तर पशुसंग्रहालय तरी पहातां येईल."

" पशु काय पहायचे?" प्रभाकर थट्टेनें म्हणाला, " रोज आपण गाईम्हशी का थोड्या पहातों?"

कमलेला प्रभाकरचा एकदम अतिशय राग आला. त्यांच्या संभाषणांत भाग न घेतां इंदुमती खिन्न मुद्रा करून बाहेर पहात होती.

थोड्याच वेळांत प्रभाकरनें नळावर जाऊन तोंड धुतलें. त्याला परत आलेला पहातांच कमला त्याला टाळण्यासाठीं मुद्दाम लगेच तोंड धुण्याकरतां गेली. ती तोंड धुवून आली तेव्हां प्रभाकरनें तीन स्पेशल चहाची आर्डर दिली होती.

चहा बनवून त्यानें कमलेच्या पुढें केला. पण ती रागानें म्हणाली,

" नको मला."

" कां, चहा घेत नाहीं वाटतं?"

कमलेनें बिल्कुल उत्तर केलें नाहीं. प्रभाकर दुसरा पेला तयार करून इंदुमतीला देत म्हणाला,

" इंदू, रावसाहेब वैद्यांची मोटार असेल नाहीं? मग आपल्याला सर्व शहर एका दिवसांत फिरतां येईल. साबरमतीलाही जातां येईल."

" दादा, कांहींतरी लाज बाळग. त्यांची मुलगी नाकारायची आणि त्यांची मेजवानी खायची, मोटार फिरवायची. कांहींतरी स्वाभिमान?"

" इंदू," प्रभाकर चेष्टेनें हंसत म्हणाला, " त्यांत कसला स्वाभिमान? त्यांना अगोदर स्वाभिमान असता तर आपली मुलगी बघायचें आमंत्रण त्यांनीं केलं नसतं. डॉक्टर रोगी बघायला गेला तर फी घेतो. वकील खटल्यांतील जागा पहायला मोटारनें जातो आणि पैसे घेतो; मग आम्ही स्थळ पाहायला गेलों तर आम्हाला नको का फी मिळायला?"

" पुरे झाला वात्रटपणा." इंदुमती चिडून म्हणाली.

इतक्यांत गाडी बडोद्याहून सुटली. सूर्याचे किरण खिडक्यांतून आंत

येत होते. कमला विविध–वृत्ताचा अंक हातात घेऊन त्रस्त मुद्रा करून तो वाचण्याचा प्रयत्न करीत होती. प्रभाकर खिडकीपाशीं बसून आनंदानें कसलें तरी गोड गाणें गुणगुणत होता. इंदुमती कंगवा घेऊन केंस सारखे करीत होती. इतक्यांत मध्येंच कसली तरी आठवण झाल्यासारखें करीत प्रभाकर म्हणाला,

" काय हो मिस् वैद्य, I mean (नाहीं) मिस् देशपाण्डे, रावसाहेब वैद्य कुठं राहातात ?"

" मला माहीत नाहीं. " कमलेनें सरळ प्रत्युत्तर केलें.

" कांहीं डोकं वगैरे दुखतं आहे का ? " प्रभाकर साधेपणाचा आव आणून म्हणाला.

" नाहीं, पोटांत दुखतं आहे. " कमला चिडून मुद्दाम उत्तरली.

" प्रवासाचा कांहीं लोकांना असा त्रास होतो खरा. " प्रभाकर तिच्या भाषणाचा अर्थ न समजल्याचा बहाणा करून म्हणाला.

एवढ्यांत गाडी अहमदाबादेस पोहोंचण्याची वेळ झाली. प्रभाकर बिछाने बांधित आहे असें पाहून कमला आणि इंदुमती हळुहळु संभाषण करीत होत्या. प्रभाकर मात्र हंसें आवरण्याकरतां दोरी गच्च खेंचण्याच्या निमित्तानें ओंठावर ओंठ दाबून हास्य दडवित होता.

" दादा," इंदुमती मध्येंच म्हणाली, " ह्या मला घरीं बोलावताहेत. मी ह्यांच्याबरोबर जातें. तूं स्टेशनवरच्या हॉटेलांत रहाशील ना ! मी थोड्या वेळानें परत येतें. "

" अच्छा, आपली मर्जी. " प्रभाकर म्हणाला.

इतक्यांत गाडी स्टेशनच्या आवारांत शिरली.

" दादा, आम्ही आमच्या बॅग घेऊन जातों. यांचा बिछाना पण तुझ्याबरोबर असूं द्या. "

असें म्हणून इंदुमती व कमला गाडी थांबतांच खालीं उतरल्या व झपझप पावलें उचलून त्या फाटकाबाहेर पडल्या. प्रभाकर डब्याच्या दारापाशीं उभा राहून रावसाहेब वैद्य कुठं दिसताहेत का पहात होता. तोंच

समोरून ते येतांना त्याला दिसले. प्रभाकर त्यांना सामोरा जाऊन नमस्कार करीत म्हणाला,

" नमस्कार, रावसाहेब. "

" नमस्कार प्रभाकरपंत, प्रवास ठीक झाला ना ? " वडीलकीच्या हक्कानें त्याच्या पाठीवरून हात फिरवित ते पुढें म्हणाले, " आमची पद्मा पण याच गाडीला यायची होती. "

" हो, आली आहे. आमच्याच डब्यांत होती. माझी वहीण इंदू आणि ती आतां पुढें गेल्या. तुमचे चिरंजीव गाडीवर आले होते. त्यांनींच कांहीं गरज पडली तर मदत करायला सांगितली होती. "

" वा प्रभाकरपंत, मग गाडींतच वधु–परीक्षा झाली म्हणायची. " रावसाहेब मोठ्यानें हंसत म्हणाले.

" हो, योगायोग खरा. विवाह ह्याच मुळीं योगायोगाच्या गोष्टी आहेत. " प्रभाकर विनयपूर्वक हास्य करीत म्हणाला, " पण रावसाहेब, जरा सामानाकडे रहा. मी त्यांना सांगतों नाहीं तर त्या जातील. "

असें म्हणून प्रभाकर रावसाहेबांनीं शिपाई पाठविण्यापूर्वी आपणच धांवत गेला.

इंदुमती आणि पद्मा मोटारींत बसत होत्या. प्रभाकरनें हांक मारली.

" अहो, मिस् देशपांडे I mean (नाहीं) मिस् वैद्य—"

पद्मेनें चटकन् आश्चर्यानें मागें वळून पाहिलें. प्रभाकर हंसत पुन्हा म्हणाला,

" अहो, तुमचे वडील आले आहेत. "

त्या दोघी एकमेकींकडे आश्चर्यचकित होऊन पहात होत्या.

" इंदू, मला फसवायचा तुमचा बेत तुमच्याच अंगाशीं आला. इंदू, " प्रभाकर हसें आवरून म्हणाला, " अग, दोन नाहीं चार वर्षांपूर्वीचीदेखील एवढी सुंदर तुझी मैत्रिण कोण हें माहीत करून घेतल्याशिवाय मी राहिलों असतों काय? शिवाय त्यांच्या बॅगवरील लेबलवरील 'पद्मा वैद्य' हें नांव गाडींत चढल्याबरोबरच मी वाचलें होतें. आणि त्याचे बंधुराजही

पण मी ओळखतों. कॉलेजच्या क्रिकेटच्या सामन्यांत मी त्याला खेळतांना पाहिलं आहे. ”

पद्मा अतिशय लाजल्यामुळें एकदम आरक्त झाली होती. प्रभाकर तिच्याकडे प्रेमळपणें पहात पुढें म्हणाला,

“ इंदू, गाडींत तुला जरा चीड यावी म्हणून मी तो उद्यम टॉकीज्च्या कॉलेज-कुमारी ह्या आगामी चित्रपटांतील नायिकेचा फोटो घेतला होता. एवढ्या क्षुल्लक दारूगोळ्यांत ही एवढी मोटी शिकार मिळेल ही कल्पनासुद्धां नव्हती. इंदू, पुरुषांना फसवायला अजून तुम्हांला दोनतीन वर्षं आमच्या कॉलेजांत काढलीं पाहिजेत. ”

“ बरं बरं, माहीत आहे अकलेचे कांदे अहांत ते ! ” इंदुमती वेडावून म्हणाली.

पद्मा मात्र हळूच चोरून लडिवाळपणें प्रभाकराकडे पहात मधुर स्मित करीत होती.

“ पण मिस् देशपांडे, I mean ( नाहीं )—मिस् वैद्य ” प्रभाकर स्निग्धपणें तिच्याकडे पहात म्हणाला, “ तुम्हाला मात्र निष्कारण त्रास दिल्याबद्दल Excuse ( क्षमा करा हं. ) ”

“ इश्श,” असें हळूच म्हणून पद्मेनें मानेला मोहक मुरड दिली, “ मीच कांहीं तरी बोलल्याबद्दल माफी मागायला पाहिजे.”

इतक्यांत रावसाहेब सामानासह बाहेर आले.

“ चला प्रभाकरपंत, ” रावसाहेब म्हणाले.

“ माफ करा. मी हॉटेलांतच राहतों. ”

“ काय प्रभाकरपंत, आतां कसला संकोच ? वधु—परीक्षा तर गाडींत झालीच. ” रावसाहेब उभ्या असलेल्या मोटारीकडे त्याला नेत म्हणाले.

“ बाबा, ” पद्मा मध्येंच हंसत म्हणाली, “ यांना आपल्या मोटारींतून अहमदाबाद व साबरमती बघायची आहे. ”

“ उगाच रावसाहेब मी यांची थट्टा केली. दोन वर्षांपूर्वी आमच्या कॉलेजच्या टीममधून मी इथं आलों होतों त्यावेळीं सर्व कांहीं पाहिलं होतं. ”

पद्मा आणि इंदुमती एकमेकींकडे पहात हास्य करीत होत्या.

मोटार चालू झाल्यावर रावसाहेबांनीं प्रश्न केला, "मग काय प्रभाकरपंत, आमची पद्मा पसंत पडली ना ?"

"वडील माणसांच्याच मार्फत संमति कळविणें योग्य नाहीं का ?" प्रभाकरनें हळूच प्रत्युत्तर केलें.

रावसाहेब मोठ्यानें खदखदां हंसले. पद्मा लाजेनें ओशाळली होती. आनंदाच्या उमाळ्यानें तिला गुदमरल्यासारखें होत होतें. प्रभाकरची आणि तिची नेत्रपल्लवी सारखी चाललीच होती.

# शुक्राची चान्दणी.

‘ Star of love’s soft interviews,
Parted lovers on thee muse;
Their remembrancer in Heaven
    Of thrilling vows thou art,
Too delicious to be riven,
    By absence, from the heart. ’

—T. Campbell.

“ ती पहा शुक्राची चान्दणी. ” समोरच्या फाटकांतून हॅंगिंग-गार्डनमध्यें शिरणाऱ्या चंद्रकलेकडे बोट दाखवीत दामोदर म्हणाला,

“ कुठं आहे ? ” विश्वंभर आकाशाकडे पहात म्हणाला.

“ ती काय ? अरे शुक्राची चांदणी म्हणजे साखऱ्यांची चंद्री ! ” दामोदर उत्तरला.

“ हं, हं; ही का बयाबाई ? आणि खरंच ही पण मोटी मौज आहे, कीं ही चंद्रीसुद्धां सूर्यास्त झाल्याबरोबर शुक्राच्या चान्दणीप्रमाणं वर फिरायला येते व अगदीं थोड्याच वेळांत पुन्हां खालीं उतरते. ”

गजाननाचा हा विनोद ऐकतांच सर्वजण मनसोक्त हंसले. दामोदर इकडे तिकडे पाहून थट्टामस्करीला विषय पहातच होता. इतक्यांत फिरत असलेल्या दुसऱ्या तीन मुली त्याच्या दृष्टीस पडल्या.

“ अरे गजा, पाहिलंस का ? ती बघ भिग्बाळी येते आहे. मधल्या मोत्याच्या दाण्याला पाणी जरा कमी आहे, पण बाजूच्या दोन्ही दाण्यांमुळं तो शोभून दिसतो आहे. अरे, पण हें काय ? मोहन आणि शशिकान्त अद्याप शुक्राच्याच चान्दणीकडे पहाताहेत. का मोहनराव, पहिल्याच भेटीला प्रेम जडलं कीं काय ? ”

" छे रे बाबा ! हिच्याशीं, आणि प्रेम ! अरे गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' ह्या कवितेची आठवण होऊन मला कसंसंच वाटूं लागलं आहे." मोहन शहारे आल्यासारखें करीत म्हणाला.

" बाबा, चोरटेपणांतच प्रेमाची खरी लज्जत आहे." दामोदर हातरुमालाचें पुढील टोंक कोटाच्या जास्त बाहेर काढीत म्हणाला.

" बस्, पुरें करा बुवा हा गोविंदाग्रजांचा गचाळ गडबडगुंडा. रामगणेशानं चोरून जातांना एखादी थप्पड खाल्ली नव्हती म्हणून हें प्रेम-तत्त्वज्ञान." विश्वंभर म्हणाला.

" हं, शशिकान्त, तत्त्वज्ञान सुरू झालं आहे. बोला आता, प्रेमाचा आत्म्याशीं काय संबंध येतो ? मी म्हणतों, तत्त्वज्ञान व प्रेम अगदीं परस्पर-विरोधी आहेत. एक भाव तर दुसरा अभाव. कारण प्रेम हें मुळीं तत्त्वच नव्हे."

शशिकान्तानें किंचित् हास्य केलें व तो तिरस्कारानें म्हणाला, " दामू, तुला काय ? शाळाकॉलेजांतील मुलींची माहिती मिळविणं हें तुझं तत्त्वज्ञान व सर्वस्व आहे."

" होय बाबा; बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर मग वधूपरीक्षा द्यायची, आणि मग तुझ्यासारख्या तरुणांना श्रीमंत मुलींचे पत्ते आणून देण्याचा धंदा करायचा माझा विचार आहे." दामोदरनें उत्तर दिलें.

" चल, कबूल आहे. तुला हुंड्याच्या रकमेंत दर रुपयामागं एक पै कमिशन." विश्वंभर मध्येंच म्हणाला.

" हं, अरे तूं वधू-परीक्षा पास होशील, पण तुझ्या बाबतींत कोणी तरी पोरगी वर-परीक्षा द्यायला तयार असली पाहिजे ना ? मला नाहीं बुवा हें शक्य वाटत." गजाननानें प्रत्युत्तर केलें.

" बघा बघा, मोहन व शशिकान्त, तुमच्याकडेच शुक्राच्या चान्दणीचं तेज फांकतं आहे. मोहन, काय हरकत आहे ? करून टाक ना ! सुंदर आहे, श्रीमंत आहे, ठीक आहे. होऊन जाऊं द्या." दामोदर डोळे मिचकावीत म्हणाला.

" होय तर ! बाबा, दिसतं तसं नसतं. वाटतं किती गरीब; पण गोगलगाय आणि पोटांत पाय. तुम्हांला एक एक गोष्ट सांगेन तर आश्चर्य वाटेल."

"काय आहे असं? ऐकूं दे तर खरं." सर्वजण मोहनला उद्देशून म्हणाले.

सर्वांनीं उत्सुकतेनें वांकून मोहनकडे दृष्टि लावली. मोहननें तोंडावरून हातरुमाल फिरवून सांगण्यास सुरवात केली.

ह्या वेळीं संध्याकाळ झाली होती. संधिप्रकाशांत बगीच्यांतील झाडांचीं पानें सुवर्णमय दिसत होतीं. समोंनार फुललेलीं सुंदर व सुवासिक फुलें अत्यंत आकर्षक दिसत होतीं. वाऱ्याच्या शीतळ झुळुकेबरोबर जिकडे तिकडे मधुर दरवळ पसरत होता. आकाशांत पश्चिम दिशेला भडक रंगाचें संमिश्रण झाल्यामुळें मनामध्यें गंभीर विचार येत होते. काळोख होऊं लागल्यामुळें दिवे पेटले तरीहि चंद्राच्या चांदण्याची रमणीय शोभा मनाला आल्हाद देत होती. बागेंतील मध्य-वर्तुलांत बॅंड वाजत होता. हॅंगिंग-गार्डनमधील लोक हळूहळू मागें फिरूं लागले. चंद्रकलाही आपला शेवटचा फेरा पुरा करून खालीं उतरली. दामोदर, मोहन वगैरे मंडळी बांकावर बसून अजून बोलतच होती. मोहन म्हणाला,

"माझ्याबरोबर मॅट्रिकच्या क्लासमध्यें एन्. डी. पिळकर नांवाचा एक विद्यार्थी होता. ही चंद्रकला साखरेहि त्याच्या शेजारींच गिरगांवांत मदन-बिल्डिंगमध्यें रहात होती. पुढं एके दिवशीं हिची आई व वडील बाहेर कुठं गेलीं असतां ही एकटीच खोलींत राहिली. त्या वेळीं पिळकरला आला संशय! इथं कांहीं तरी पाणी मुरतं आहे. त्यानं मुद्दाम कुठं बाहेर न जातां नजर ठेवली. कांहीं वेळानं तिच्याकडे एक तरुण आला. नंतर परत जातांना हा lover (प्रेमपात्र) कुठं जातो तें पहाण्याकरितां आमचा एन्. डी. त्याच्या-मागून गेला. तों ही स्वारी ग्रॅंटरोड स्टेशनवर गेली. योगायोग असा कीं, अचूक ही स्वारी आपल्या हातांतील पुस्तक प्लॅटफॉर्मवरील बांकावर विसरली व गाडींत बसली. पिळकरनं तें पुस्तक घेतलं. त्यांत त्याला एक चंद्रकलेचं पत्र सांपडलं. त्या पुस्तकावर "With best love to Chandra-kala." ( चंद्रकलेस सर्वोत्कृष्ट प्रेमानें ) असं लिहिलं होतं."

"पण त्या पत्रांत काय होतं?" दामोदरनें मध्येंच प्रश्न केला.

"थांब, सांगतों." मोहन म्हणाला, "तें पत्र पिळकरनं वाचलं. त्यांत असं होतं कीं, 'आज आई बाहेर जाणार, तरी मला अवश्य भेटावं.' वगैरे वगैरे."

" हें असें नाहीं. आणखी काय काय लिहिलं होतं—सर्व कांहीं सारखें सांग ना ! "

" लेका गजा, अगदींच हा आहेस तूं ! " दामोदर हातवारे करीत म्हणाला, " मूर्खा, पत्रांत काय असतं म्हणून विचारतोस तें काय ? पत्रांतील भाषा, एकजीव होऊन व हृदयाच्या तारा पिळून लिहिलेली असते. प्रत्येक शब्दांत पहिल्या kiss चं ( चुंबनाचें ) माधुर्य असतें. "

" तुला रे हा अनुभव कसा ? " गजानन दामोदराच्या तोंडापुढें हातवारे करीत म्हणाला.

" तें काय विचारतोस ? अरे love-letters ( प्रेमपत्रिका ) लिहिण्यांत माझा हात धरणारा कोणी त्रिभुवनांत मिळणार नाहीं, समजलास ! " दामोदर मिशीला पीळ दिल्याचा आविर्भाव करीत म्हणाला.

" म्हणजे ! इतक्या जलद लिहितोस कीं काय ? " गजानें साधे-पणाचा आव आणीत विचारलें.

" अलवत्. जलदहि लिहितों. त्या वेळीं सर्व कांहीं काव्यमय असतं. रसवंती वाग्देवी त्या वेळीं माझ्या बोटांमध्यें संचार करते; प्रेमदेवता माझ्या हृदयांत डोलत असतात; व गानदेवता माझ्या जिभेवर नाचत असतात. ह्याशिवाय माझ्याजवळ मधल्यामध्यें पकडलेल्या अनेक प्रणयपत्रिका आहेत. त्यांचा मी Encyclopedia (ज्ञानकोश)प्रमाणं उपयोग करतोंच."

" बंद, बस्स. गप्प, पुरे कर Silence. Shut up! हा प्रणयाचा व पत्राचा पोरखेळ आणि काव्याचा कंठशोष एकदम बंद करा. मोहन चालूं दे. पुढं काय . झालं ? " विश्वंभर अध्यक्षाप्रमाणें अधिकारयुक्त वाणीनें कानांवर हात टेवीत ओरडला.

मोहन किंचित् छाती पुढें काढून म्हणाला, " तेव्हां हा असा त्यांचा कार्यक्रम होता. पण असल्या गोष्टी जास्त दिवस दडून रहात नाहींतच. एकदां अशींच संध्याकाळीं तीं दोघेंहि एकटीं होतीं व तिची आई कुठं तरी बाहेर गेली होती. चंद्रकलेला वाटलं कीं आपली आई आतां बराच वेळ येणार नाही. पण कसा दैवयोग आहे पहा. तिची आई एकाएकीं घरीं आली. चंद्री घाबरून गेली; पण करणार काय आणि त्याला दडविणार

तरी कुठं ? मग काय ? आईनं त्याला अगोदर घालवून दिला आणि मग हिलो इतकं कांहीं बोलली व मारलंहि ! ही सारखी दोन तास रडत होती."

"तिचे वडील नव्हते का घरीं ?" दामोदरानें चौकशी केली.

"होते अगर नव्हते, त्याचं काय तुला ?" विश्वंभर एकदम ओरडला.

"मग पुढं काय झालं, मोहन ?"

"तेव्हांपासून तो प्राणी बरेच दिवस आला नाहीं. तरी पण म्हणतात ना– न भयं न लज्जा. अलीकडेच ऐकलं कीं तो पूर्ववत् तिथं जाऊं लागला आहे. मी पुष्कळ वेळां त्याला पाहिला आहे. इकडे मधून मधून गार्डनमध्यें येत असतो. मला विशेष आश्चर्य वाटतं तें हें, कीं त्याचं बहुतेक लग्न झालं आहे. कारण कालच तो एका दुसऱ्या तरुणीबरोबर चौपाटीवर फिरायला आला असतां पिळकरनं मला दाखविला. तात्पर्य, असल्या चंद्रीशीं लग्न करून काय करूं ? हं, आतां केलं असतं लग्न–पण पैसा असता तर. पण तसंही कांहीं दिसत नाहीं."

"मग एखाद्या दहा हजारांच्या नोटीशीं लग्न लाव कीं लेका." गजानन एकदम ओरडला.

"अरे, पण शशिकान्त गप्प कां बुवा ? अहो पंडित, चंद्रकलेचं उसनं चादणं तर तुम्हांला तापदायक होत नाहीं ना ? शशिकान्त, बाकी जर तुझं प्रेमच तिच्यावर असेल तर लग्न करून टाक ना. सध्यांच्या यांत्रिक युगांत सत्य आणि शील ह्यांचा विचार न करणंच ठीक. आणि प्रेम असलं तरच तूं तिच्याशीं लग्न करशील ! कारण प्रेम आधळं असतं आणि दैवी इच्छा पण हीच दिसते. कारण चंद्रकला म्हणजे शशिकला व शशिकलेचा नाथ किंवा कान्त तो शशिकान्त ! काय, जमलं कीं नाहीं ? Simple logic (साधें तर्कशास्त्र)."

दामोदराच्या ह्या पाणचट बडबडीचा शशिकान्ताला राग येऊन तो जोरानें म्हणाला, "कृपा करून जरा ही बडबड बंद कर बघूं. Shameless man ( निर्लज्ज मनुष्य ! )"

ह्यावेळीं गजाननाला रहावेना. तो फाजीलपणानें गंभीर चेहरा करून आकाशाकडे पहात म्हणाला, "अहाहा, ह्या वेळीं मला प्रेम

आठवूं लागलं आहे. ब्रह्मांडाचं प्रेम आठवूं लागलं आहे. ब्रह्मांडाचं प्रेम जगतांत विरून अद्वैतरूपी असा जो अमर आत्मा त्याचं उत्क्रान्ति-तत्त्वा-प्रमाणं मिसळून जाणं चाललं आहे."

" हें झालं कृष्णमूर्ती—व्याख्यान." मध्येंच विश्वंभर उद्गारला.

" थांबा, पुढं ऐका." गजानन दोन्ही हात पुढें करीत म्हणाला, " चंद्रकले, चतुर्थीच्या चंद्राच्या चंदनी चांदण्यांतून चौपाटीवरून चिरा-बाजाराकडे चंद्रकळा नेसून चमकत चमकत चालतांना तुला पाहून माझं जीवनसाफल्य झालं, मग तुझा प्राणनाथ— "

" कीं प्राणघातक ?" दामोदर मध्येंच ओरडला. सर्वजण मोठ्यानें हंसले.

" हत् गाढवा, मध्येंच बोलून माझ्या स्फूर्तीचा भंग केलास. काव्य-देवतेचा अपमान, उपमर्द, अवहेलना, insult सर्व कांहीं तूं केलंस."

शशिकान्ताला ह्या घाणेरड्या अचकटविचकट बोलण्याचा अतिशय राग आला होता. इतका वेळ त्यानें तें सर्व निमूटपणें ऐकून घेतलं होतें; पण आतां मात्र त्याच्यानें रहावेना. डोक्याला टोपी घालून तो बाकावरून उठत म्हणाला,

" बरं मनोहर, मी जातों. तूं येतो आहेस का ?"

दामोदराचा फाजीलपणा वाढत चालला होता. तो म्हणाला,

" वा शशिकान्त ! पांच मिनिटं बस कि रे. हे बघ, सप्तऋषी अरुंधती-सह वर आले. आतां त्या कोनांतील बांकावर बसतील. पण आज Black and White Union (काळी पांढरी टोळी) कुठं आली नाहीं ती ? हं शशिकान्त, अगदींच एकेरीवर आलास कि रे. चंद्रकलेचं चांदणं फार थोडे दिवस असतं. दर पंधरा दिवसांनीं तिच्यांत बदल होतो. त्यापेक्षां ह्या समोर असलेल्या अमावास्येंतच आनंदी असलास तर काय वाईट आहे ?"

" Shut up (बंद कर)." शशिकान्त दांत चावीत ओरडला, " चल, मनोहर, I don't want to stay here even for a minute (मी एक क्षणसुद्धां इथें राहूं इच्छीत नाहीं)."

दोघेहि उठून चालूं लागले. गजानन मोठ्यानें म्हणाला, "प्रेम आंधळं, पांगळं, लंगडं, बहिरं, मुकं सर्व कांहीं असतं."

सर्वांनीं उपहासानें मनसोक्त हास्य केलं.

शशिकान्त व मनोहर कांहीं न बोलतां खालीं उतरत होते. त्याच वेळीं दोन पोक्त गृहस्थहि बागेंतून खालीं उतरत होते. त्यांचा संवाद चालला होता,

"पाहिलंत वामनराव, कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्यें एक प्रकारची Vulgar mentality (अश्लील मनोवृत्ति) येत चालली आहे. मला वाटतं त्यांना जबाबदारी कांहींच वाटत नसावी."

"हें तर झालंच; पण आप्पासाहेब, मला वाटतं कीं, यांच्या शिक्षणांतच कांहीं तरी दोष असावा. ह्या मुलांच्या सात्त्विक भावना अगदीं नाहींशा झाल्या आहेत. असल्या विद्यार्थ्यांच्या कॉलेजात आपली मुलगी पाठविणं म्हणजे तिचे Marriage Prospects (वैवाहिक अनुकूलता) नासविण्यासारखं आहे. कुठच्याच बाबतींत कॉलेजचे विद्यार्थी Sincere (स्थिरचित्त) नसतात. मौज व चैन हेंच त्यांचं Ideal (ध्येय). अभ्यास करतात कुठं, कांहीं तरी करून पास होतात. पण आईबापांना यांच्या इतर ढंगाची काय कल्पना? पाहिलंत, मघाशीं ते Students (विद्यार्थी) किती घाणेरड्या व अश्लील गोष्टी बडबडत होते."

त्या दोन पोक्त गृहस्थांचें तें भाषण ऐकून शशिकान्ताला अतिशय वाईट वाटलें. "मनोहर," त्याचा गळा दाटून आला. पण कांहीं वेळानें तो पुन्हां म्हणाला, "मनोहर, ऐकतो आहेस ना हें? खरोखरच मला असं वाटूं लागलं आहे कीं, कॉलेजांत आपल्या उच्च विचारांचा व तत्त्वांचा अधःपात होतो. पहा त्या दामोदराची व गजाननाची स्थिति! अभ्यास करतील व पासहि होतील. कुठं तरी नोकरी पण मिळेल. यांत कुठं काय बिघडलं, असा सवाल कुणीहि करील. पण काय रे मनोहर, मिस् साखरेविषयीं मोहन सांगतो तें खरं असूं शकेल का रे? मला नाहीं वाटत तसं. ती किती चांगली, सौम्य Good-natured girl (सुस्वभावी मुलगी) दिसते."

"यांत काय अर्थ आहे?" मनोहर लगेच म्हणाला, "अरे बाबा, माझाहि असाच समज होता; पण मी ह्या मुंबईत अशा कांहीं गोष्टी

ऐकल्या, व पाहिल्याहि पण, कीं त्यामुळं असंच वाटतं, कीं जगांत कुणा-बद्दल कुणी हमी देऊं नये. मींसुद्धां पूर्वी कुणाकडून तरी तिच्याविषयीं असंच कांहीं तरी ऐकलं होतं. तुला कांहीं वाटो, पण मला मात्र असं वाटतं कीं ती खात्रीनं तशीच कांहीं तरी असली पाहिजे. तिचा चेहराच सांगतो. ह्या तरुण पोरी एखाद्याला असं भासवितात कीं त्याच्यावरच आपलं सर्वस्वीं प्रेम आहे ! व मग ऐन वेळीं सारखंच तोंडघशीं पाडतात. ”

“ मला नाहीं वाटत असं असेलसं. ” शशिकान्त खिन्नपणें म्हणाला.

“ कुणाला अगोदर तसं वाटतं ! ” मनोहर त्रस्तपणें गंभीर आवाजांत उत्तरला.

कुणींच कांहीं बोललें नाहीं. दोघेहि जाऊन चौपाटीच्या बांकावर बसले व निमूटपणें चांदण्यामुळें दिसणाऱ्या समुद्राची शोभा पहात राहिले. कांहीं कालानें मनोहर मनगटावरील घड्याळाकडे पाहून म्हणाला, “ चल, शशि, आठ वाजायला झाले. जाऊं या ना ? ”

दोघेहि बांकावरून उठले. इतक्यांत शशिकान्त मनोहराच्या हाताला धरून थांबत म्हणाला,

“ थांब जरा. ती कटकट पुढं जाऊं द्या. ”

तोंच गजाननानें मागें पाहिलें व तो मोठ्यानें ओरडला, “ ओहो या शशिकान्त, मनोहरपंत, पुढं येऊन विशेष काय केलंत ? ”

“ जीव दिला ! तुला काय करायचं आहे ? ” शशिकान्त रागानें खेंसकटला.

“ शान्तं पापम्, शान्तं पापम्. शशी, काय झालं ? आपल्या कोपाचं प्रयोजन काय ? आपणास चंद्रकलेचीं पत्रं वाचावयास पाहिजेत काय ? ” मोहननें मान हालवीत प्रश्न केला.

“ होय; मला दाखविशील ? ” मनोहरनें मध्येंच विचारलें.

“ अलबत्, वाटेल त्या वेळीं ये. एखादं पत्र तुला बक्षीससुद्धां देईन. माझा विचार आहे, तिच्या लग्नदिवशीं हीं पत्रं पाटवून देण्याचा. कारण लाजाहोमांत तिनं आपल्या पूर्वप्रणयाचा होम करावा, म्हणजे—”

“ अरेरे ! ती बघ, ती बघ ! ” विश्वंभर एकाएकीं मध्येंच ओरडला.

" असं काय एकदम ? " सर्वजण त्याच्या बोटाकडे पहात उद्गारले.

" हीच ती; आमच्या कॉलेजवर पिकेटिंग करायला आली होती. श्रीधर गाळवेनं तिला असं जिरविलं म्हणून सांगू! तिला सरळ विचारलं, कीं आपल्याशीं लग्न करून मला पोसशील तर कॉलेज सोडतों. "

" That's right ( ठीक झालें )." दामोदर म्हणाला, " जसं कांहीं ह्यांनाच स्वराज्य पाहिजे. आमच्या क्लासमधला एक विद्यार्थी तर असं ओरडला कीं, Miss, a kiss to miss a day "

"शाबास! एकंदरींत कमाल आहे." मनोहर तुच्छतेनें हंसून म्हणाला.

" अरे वा! पिकेटिंगची मजा काय और आहे! रोज तसंच चालेल तरी किती बहार होईल ! "

" पण लक्षांत ठेवा, म्हणूनच स्त्रिया परदेशी कापडाच्या दुकानावर पिकेटिंग करून तुरुंगांत जायला तयार असतात; पण कॉलेजवर पिकेटिंगला तयार नसतात. शिकल्यासवरलेल्या बैलांना विनविण्यापेक्षां बैलांच्या गाडी- पुढं पडून माल अडविणं त्यांना परिणामकारक वाटतं. "

शशिकान्ताच्या ह्या उत्तरानें सर्वांना जरा राग आला.

" अहो, पण महाराज, आपलीसुद्धां त्यांतच गणना होते आहे ना?" दामोदर हलकेच जीभ चावीत म्हणाला.

" मला तर कॉलेजस्टूडन्ट् म्हणून घ्यायला लाज वाटते. मी तुम- च्याशीं जास्त बोलूंच इच्छित नाहीं. मनोहर, मला ग्रँटरोडवर जायचं आहे. बरं मी जातों. "

" अच्छा. " हातांतील टोपी हालवून मनोहरनें निरोप दिला.

शशिकान्तनें झपझप येऊन स्टेशन गांठले. प्लॅटफार्मवरील बांकावर बसून तो गाडीची वाट पाहूं लागला. खिशांतून कागद काढून त्यावर त्यानें कांहीं लिहिलें व बंद करून तो कागद त्यानें घडी करून पुन्हा खिशांत टाकला. शशि- कान्ताच्या मनांत कांहीं तरी भयंकर विचार चालल्याचें त्याच्या व्यग्र चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतें. त्याचे डोळे मधून मधून पाण्यानें भरून येत होते. चेहऱ्यावर भीषण उदासीनता व कसला तरी भयंकर निश्चय स्पष्ट दिसत होता. एव- ढ्यांत स्टेशनवर गाडी उभी राहिली. डोळे पुसून शशिकान्त गाडींत चढला

व दारावरील दांडीला धरून तो उभा राहिला. कांहींशी गाडी जातांच समोरून येणाऱ्या गाडीकडे तो डोकावून पाहूं लागला. विरुद्ध दिशेनें दुसरी गाडी आपल्या दिव्यांचा प्रकाश समोर पाडीत जोरानें येत होती. शशिकान्तानें दोन्ही हात गच्च हृदयाशीं धरले. त्याच्या हृदयांत क्षणभर भयंकर कालवाकालव होऊन तो किंचित् मागें सरकला. येणाऱ्या गाडीचे आवाज जास्त जास्त स्पष्ट ऐकूं येऊं लागले. पुन्हां दृढनिश्चय करून त्यानें हात जोडले व डोळे मिटून समोरून येणाऱ्या गाडीच्या रुळावर धाड्कन् उडी मारिली. क्षणार्धांत धड्धड् थड्थड् करीत गाडी शशिकान्ताच्या अंगावरून निघून गेली. डब्यांतील इतर उतारूंनीं लगबगीनें सांखळी ओढली. दोन्ही गाड्यांनीं जोरानें शिटी मारली व हलके हलके त्या उभ्या राहिल्या. शशिकान्ताचा देह अगदीं छिन्नविच्छिन्न झाला होता. तात्काळ स्टेशनवर पंचनामा सुरू झाला. तपासाच्या वेळीं त्याच्या खिशांत ‘ कु. चंद्रकला साखरे हीस ’ असें लिहिलेला लखोटा मिळाला.

दुसऱ्या दिवशीं प्रेमभंगामुळें केलेल्या आत्महत्येची बातमी प्रसिद्ध झाली. चंद्रकलेच्या वडिलांनीं वेळींच वर्तमानपत्रांच्या कचेरींत जाऊन तिचें नाव प्रसिद्ध न करण्याबद्दल विनंति केल्यामुळें मात्र तिच्या नांवाचा विशेष बभ्रा झाला नाहीं. शशिकान्ताला कुणीच जवळचे आप्तेष्ट नव्हते. वडिलांनीं ठेवलेल्या पैशामुळें व शिष्यवृत्तीवर तो आपला अभ्यासक्रम चालवीत होता. थोड्याच दिवसापूर्वी पित्याच्या झालेल्या आकस्मिक निधनाच्या धक्क्यामुळें तो उदासच झाला होता. हुशार विद्यार्थी म्हणून कॉलेजच्या मासिकांतून त्याचें छायाचित्र व त्रोटक चरित्र आलें. परंतु कांहीं दिवसांनंतर लोक हलके हलके ही गोष्ट साफ विसरून गेले. चंद्रकला मात्र त्या दिवसापासून अद्याप कधीं हँगिंग गार्डनमध्यें आली नव्हती.

कांहीं दिवसांनंतर मोहन, दामोदर, गजानन व मनोहर वगैरे मंडळी पूर्वीप्रमाणें गप्पागोष्टी करीत गार्डनमध्यें बसली होती. ह्या वेळीं त्यांजबरोबर एक नवीन तरुण होता. त्याला उद्देशून दामोदर म्हणाला, “ काय वसंत, तुला नोकरी लागून एक महिना झाला, पण आम्हांस चहा दिला नाहींस तो रे बुवा ? ”

" त्याचं काय मोठंसं !" वसंत हंसत म्हणाला, "पण काय रे, गार्डनमध्येंच अलीकडे तुमचं कसं काय चाललं आहे ?"

" छट्! अलीकडे दिवस लवकर मावळतो, व थंड वारा पण फार असतो." दामोदर कोटाचीं बटणें लावीत म्हणाला, "तेव्हां विशेष कोणी येतच नाहीं. सर्व शुष्क होत चाललं आहे !"

यावर मोहन म्हणाला, "पण थांब, तुला आज एक Historic (ऐतिहासिक) व्यक्ति दाखवितों. हं, तीं बघ येताहेत. अगदीं समोर पहा. तीच चंद्रकला साखरे, जिच्या प्रेमामुळं शशिकान्तानं आत्महत्या केली ती आणि तिच्याबरोबर आहे तो तिचा lover म्हण, प्रेमपात्र म्हण, कांहींहि म्हण."

" हो ह्या वेळीं आणि ह्याच ठिकाणीं आमच्याकडून शशिकान्ताला तिचे Scandle (प्रणयचाळे) समजले होते." दामोदर म्हणाला.

वसंत बारीक नजरेनें समोर त्यांच्याकडे पहात होता. त्या दोन व्यक्ती कांहींशा जवळ येतांच तो एकदम उद्गारला, "चल, मूर्खा ! कोणी तरी ऐकेल. कांहीं तरी काय बडबडतोस ?"

" खरंच, सर्वांना विचार पाहिजे तर; तुला काय माहीत आहे ?" दामोदरानें हंसत उत्तर दिलें.

वसंतानें हास्य केलें व तो पुन्हा म्हणाला, "माझं ऐकशील तूं ? अरे, हा तर तिचा भाऊ !"

" कशावरून ?" सर्वांनीं एकदम आश्चर्यानें प्रश्न केला.

" अरे, माझ्याच ऑफिसांत आहे तो. मला त्याचा सर्व इतिहास माहीत आहे. इतकंच काय, पण तो माझा मित्रहि आहे." वसंतानें उत्तर केलें.

" मग तो हिला चोरून कां भेटतो व आपल्या आईबापांकडे कां नसतो ?" मोहननें अधिकच आश्चर्यानें प्रश्न केला.

" साहजिकच आहे." वसंत पुढें म्हणाला, "ह्यांची आई वारली. ही आहे ती सावत्र आई. जेव्हां याचं लग्न झालं तेव्हां सावत्र सासूसुनेचं पटेना, व म्हणून हा स्वतंत्र बिऱ्हाड करून खारला राहतो. यामुळं याची

सावत्र आई याला जवळ करीत नाहीं व चंद्रकलेलाहि भावाला भेटायला देत नाहीं. म्हणून हीं दोघं चोरून भेटतात."

वसंत इतरांस वाटत असलेल्या आश्चर्याबद्दल स्मित करीत होता.

"मला नाहीं वाटत असं." मोहननें स्तंभित होऊन उद्गार काढले.

"अरे, पण मला ह्यानंच सांगितलं ना? इतकंच नव्हे तर लग्नाला आतां ही कबूल नाहीं. पण हा भाऊ मात्र तिला सारखा सांगतो आहे."

इतक्यांत दोघेंहि जवळ आलीं. "नमस्कार, वसंतरावर."

"ओहो! नमस्कार, मि. सारवे आज काय इकडे फिरायल आलां?"

"हो, बहिणीला घेऊन आलों इकडे." चंद्रकलेकडे बोट दाखवीत तो वसंतजवळ जाऊन म्हाणला, "जरा आजारी आहे ती; आणि डॉक्टरनीं फिरायला घेऊन जायला सांगितलं आहे. तेव्हां यावं म्हटलं. आणखी काय खबर? ठीक आहे ना? बरं, येतों."

"या, नमस्कार." वसंत हात जोडीत म्हणाला.

बाजूला उभ्या असलेल्या चंद्रकलेची कान्ति कृष्णपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें क्षय पावत असल्याचें दिव्याखालच्या अस्पष्ट उजेडांतहि स्पष्ट दिसलें.

"बिचारीची धडगत फार दिवस दिसत नाहीं!" वसंत उसासा टाकीत म्हणाला.

मोहन, दामोदर व गजानन एकमेकांकडे साशंकपणें भेदक दृष्टीनें पहात होते.

कांहीं वेळानें मोहन म्हणाला, "मग शशिकान्ताचा समज चुकीचा झाला."

मनोहरनें पटकन् मान वळविली आणि तिरस्कारानें पहात तो एकदम रागानें ओरडला, "समज झाला कीं केला?"

कुणीच कांहीं बोललें नाहीं. क्षितिजावर चमकणारी चान्दणी चटकन् लयास गेली. बगीचा बंद करण्याची वेळ झाल्याची सूचक घंटा फाटकावरील हवालदारानें वाजविली.

'घण्, घण्, घण्, घण्!!'